महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

## महिला दिन विशेष

Vol : 52 | Issue : 06 | Mumbai | Marathi Monthly | March 2026 | Pages 84 | RNI No. 21352 | Price : Rs. 30 /-




पोलीस मदत केंद्र, बिनागुंडा: अबूझमाडच्या शिखरांना गवसणी, सीमा सुरक्षेला नवे बळ!



महिलांसाठी विविध योजनांची अंमलबजावणी




एक संवाद विद्यार्थिनींशी... पोलीस अधीक्षक, परभणी यांचा उपक्रम



महिलांनो, सावधान! चालताना त्रास होतोय?

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक...

## आता दक्षता पीडीएफ स्वरूपात
## महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर
## मोफत उपलब्ध!

**S.B.Collect**

छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी
https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php
*अथवा*
खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.




दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/-
वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त

**वेबसाईटवर दक्षता मासिक मोफत वाचण्यासाठी : https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**
अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

**https://www.mahapolice.gov.in/ dakshata-magazine**

YouTube
MAHARASHTRA POLICE HEADQUARTERS- DAKSHATA अंतर्गत नव्या यु-ट्युब चॅनलवर ऐका दक्षता मासिकातील दर महिन्याची उत्कृष्ट तपासकथा ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात.

पत्रव्यवहारासाठी पत्ता: महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१,
वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२०४९७०१, email: mpd.dakshata@mahapolice.gov.in

**पोलीस आणि जनता यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपणही सहभागी व्हा!**




मार्च २०२६। वर्ष ५२ वे। अंक ०६ वा

**मार्गदर्शन**

**सदानंद दाते**
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**मो. सुवेज़ हक**
पोलीस महानिरीक्षक
(नि. व स.)

**मुद्रक/ प्रकाशक/ सरसंपादक**
**विजय मनोहर खरात**
सहायक पोलीस महानिरीक्षक

**अंकरचना व अंतर्गत व्यवस्थापन**
**सुरेंद्र बनगे**
कार्यालय अधीक्षक

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
सरसंपादक दक्षता
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४००००१
दूरध्वनी:०२२ २२०४९७०१/२२८३४५११
mpd.dakshata@mahapolice.gov.in

**वितरण व्यवस्था**
वर्गणीसाठी संपर्क
दूरध्वनी : ०२२ २२०४९७०१

**मांडणी, मुद्रण व प्रकाशन**
विजय मनोहर खरात यांनी महाराष्ट्र स्टेट पोलीस वेल्फेअर फंड यांचेकरिता मे. प्रिंट प्लस प्रा. लि. २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस टी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे मुद्रित करून महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१ येथून प्रसिद्ध केले.

संपादक : **विजय मनोहर खरात**
१०२, आर विंग, मोहन पाम्स, चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगांव, बदलापूर,
जि. ठाणे
नागरिकत्व भारतीय

एकूण पृष्ठे ८४

*या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य पोलीस दल सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय...



दक्षताच्या सर्व वाचकांना सस्नेह नमस्कार. ८ मार्च २०२६ रोजी साजऱ्या होत असलेल्या महिलादिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा. या दिनाचे औचित्य साधून या अंकात त्या अनुषंगाने साहित्य देण्याचा प्रयत्न करत आहोत. ते आपणा सर्वांच्या पसंतीस उतरेल अशी आशा आहे.

माओवाद्यांना छत्तीसगड राज्यातून गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश करण्यास आळा घालण्याकरिता जिल्ह्याच्या भामरागड उपविभागाच्या अंतर्गत बिनागुंडा येथे दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले. या पोलीस मदत केंद्राच्या हद्दीतील नागरिकांसाठी पोलीस दादालोरा खिडकी उपक्रमाअंतर्गत भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी नागरिकांना विविध जीवनोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच वांगेतुरी पोलीस ठाण्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्‌घाटन, माओवादविरोधी अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सी-६० जवानांचा सत्कार असे अनेक कार्यक्रम संपन्न झाले. या सर्वांचा वृत्तांत अंकात सादर करण्यात आला आहे.

परभणी जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये तसेच वसतिगृहे यांमधील विद्यार्थिनींना सक्षम व आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने दिनांक ८ ते ११ डिसेंबर या कालावधीत 'एक संवाद विद्यार्थिनींशी-२' हा उपक्रम राबवला होता. यासंबंधीचे वृत्त अंकात प्रकाशित केले आहे.

विशेष कृती दल (STF), गुन्हे शाखा, लोहमार्ग मुंबई पोलीस आयुक्तालय यांनी मेल/एक्सप्रेसमध्ये बॅग व पर्स उचलून चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपीला अटक करून त्याच्याकडून ६ गुन्ह्यांमधील १४७ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या ६ लगडी व ५५ ग्रॅम वजनाची चांदीची लगड असा एकूण २१,०१,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. या प्रकरणाचा वृत्तांत अंकात सादर करण्यात आला आहे. तसेच महिला व बालकल्याण विभागाने महिलांसाठी कार्यान्वित केलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देणारा लेखही अंकात अंतर्भूत केला आहे.

याखेरीज श्री. सुरेश वांदिले, श्री. सुधाकर कुलकर्णी, श्री. शरद मनसुख, श्री. सुनील पाटील, डॉ. अनिल शर्मा, श्रीमती ऐश्वर्या साळवी, श्रीमती भारती सावंत यांचे माहितीपूर्ण लेख आहेतच. तसेच नेहमीप्रमाणे याही अंकात कथा, तपासकथा, शब्दकोडे ही सदरे आहेत. वाचकवर्ग अंकाचे स्वागत करेल ही अपेक्षा.

**आपला स्नेहांकित,**

**(विजय खरात)**
**सहायक पोलीस महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# विकासाच्या वाटेवर...



> गेल्या अनेक वर्षांपासून माओवाद्यांच्या वर्चस्वाखाली असलेला हा प्रदेश विकासापासून दूर होता. मात्र या भागातील आदिवासी बांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी तसेच माओवादी कारवायांना ठोस उत्तर देण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या बिनागुंडा पोलीस मदत केंद्रामुळे आता हे चित्र पालटेल असा विश्वास वाटतो.

दक्षताच्या सर्व वाचकांना सस्नेह नमस्कार.

येत्या ८ मार्च रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा होत आहे. त्यानिमित्त दक्षताच्या समस्त महिला वाचकांना हार्दिक शुभेच्छा. महाराष्ट्र पोलीस दल राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेकरिता सदैव कार्यरत असून महिलांच्या बाबतीतील छेडछाडीचे गुन्हे, कामाच्या ठिकाणी होणारा छळ, कौटुंबिक हिंसाचार, हुंड्यासाठी होणारा छळ अशा अनेक प्रकारच्या तक्रारींची तत्परतेने दखल घेतली जाते. निर्भया पथक, दामिनी पथक यांच्या माध्यमातून राज्यात महिलांना सुरक्षित वातावरण लाभेल याची तरतूद केली जाते. महिलांवरील गुन्ह्यांच्या संदर्भात महाराष्ट्र पोलीस दल शून्य सहिष्णुता धोरण राबवण्यास कटिबद्ध आहे.

परभणी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे अशा ठिकाणी **'एक संवाद विद्यार्थिनींशी - २.०'** हा जनजागृतीपर उपक्रम दिनांक ०८ ते ११ डिसेंबर २०२५ दरम्यान राबवण्यात आला. स्त्रियांशी संबंधित गुन्ह्यांना आळा घालण्याच्या आणि समाजातील अल्पवयीन मुली आणि तरुणी यांना सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थिनींशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी ऐकून घेण्यात आल्या. तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना कोणत्याही प्रकारच्या अन्यायाविरुद्ध निर्भयपणे तक्रार करण्यास प्रोत्साहित केले गेले. हा विशेष उपक्रम राबवल्याबद्दल जिल्हा पोलीस दलाचे हार्दिक अभिनंदन.

माओवाद्यांचा छत्तीसगड राज्यातून गडचिरोली जिल्ह्यात होणारा प्रवेश रोखण्याकरिता गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती प्रदेशात भामरागड उपविभागाच्या अंतर्गत बिनागुंडा येथे दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले आहे. सदर परिसर सीमावर्ती भागात अबूझमाडच्या पायथ्याशी असून तो घनदाट जंगलांनी वेढलेला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून माओवाद्यांच्या वर्चस्वाखाली असलेला हा प्रदेश विकासापासून दूर होता. मात्र या भागातील आदिवासी बांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी तसेच माओवादी कारवायांना ठोस उत्तर देण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या बिनागुंडा पोलीस मदत केंद्रामुळे आता हे चित्र पालटेल असा विश्वास




**वांगेतुरी पोलीस स्टेशनच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण व उद्घाटन**

वाटतो. याखेरीज, या पोलीस मदत केंद्रामुळे महाराष्ट्र व छत्तीसगड या दोन राज्यांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३८० (आलापल्ली ते नारायणपूर) चे बांधकाम लवकरच सुरू होणार आहे. तसेच लाहेरी ते बिनागुंडा यादरम्यानच्या गुंडेनूर नाल्यावरील पुलाचे काम प्रगतिपथावर आहे. ते पूर्ण झाल्यानंतर भविष्यात येथे एसटी महामंडळाची बस सेवा सुरू करणे शक्य होणार आहे. यामुळे बिनागुंडा आणि नजीकच्या गावांचा विकास होणार असून या पोलीस मदत केंद्रामुळे नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन त्यांची अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे.


या पोलीस मदत केंद्राच्या हद्दीतील नागरिकांसाठी पोलीस दादालोरा खिडकी उपक्रमाअंतर्गत भव्य जनजागरण मेळावा आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी नागरिकांना विविध जीवनोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. सदर मेळाव्याला परिसरातील ५०० पेक्षा अधिक नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे पोलीस आणि स्थानिक जनता यांच्यातील विश्वासाचे आणि परस्परसंवादाचे द्योतक आहे. यातूनच येथे विकासाचा नवा अध्याय सुरू होईल अशी खात्री आहे. या पोलीस मदत केंद्रात सुरक्षा बलांच्या सुविधेसाठी वायफाय सुविधा, ०८ पोर्टा केबिन्स, जनरेटर शेड, पिण्याच्या पाण्यासाठी आर ओ प्लांट, मोबाईल टॉवर, टॉयलेट सुविधा, पोस्ट सुरक्षेच्या दृष्टीने पायाभूत सुविधा इत्यादींची उभारणी करण्यात येत आहे. अवघ्या एका दिवसात उभारणी झालेले हे केंद्र म्हणजे पोलिसांची कार्यक्षमता आणि इच्छाशक्ती यांचे प्रतीक आहे.

तसेच जिल्ह्यातील उपविभाग हेडरी अंतर्गत वांगेतुरी पोलीस स्टेशनच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण व उद्घाटन पार पडले. सर्व आधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज असलेल्या या नवीन प्रशासकीय इमारतीमुळे अतिदुर्गम भागात कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना अधिक कार्यक्षमतेने काम करता येईल आणि नागरिकांनाही पोलिसांची सेवा तत्परतेने आणि सहजरीत्या उपलब्ध होईल, असा विश्वास वाटतो.

मार्च महिन्यात होळी, धुलीवंदन, श्रीरामनवमी, गुढीपाडवा, रमजान ईद, महावीर जयंती हे विविध सण साजरे होत आहेत. या सणांचा आनंद घेताना सामाजिक भान राखून आपण सर्वजण कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवाल आणि जबाबदारीने वर्तन कराल अशी अपेक्षा आहे. सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

जयहिंद!

**आपला स्नेहांकित,**



**सदानंद दाते**
**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अंतरंग

## मार्च २०२६

### पोलीस विशेष




१०. दुभंगलेल्या २७८ संसाराच्या रेशीमगाठी भरोसा सेल, हिंगोली यांनी बांधल्या

१७. एक संवाद विद्यार्थिनींशी: परभणी पोलिसांचा महिला सुरक्षेसाठीचा उपक्रम– **रविंद्रसिंह परदेशी, पोलीस अधीक्षक, परभणी**





२०. पोलीस मदत केंद्र, बिनागुंडा: अबूझमाडच्या शिखरांना गवसणी, सीमा सुरक्षेला नवे बळ! – **नीलोत्पल, पोलीस अधीक्षक, गडचिरोली**

५१. जळगाव पोलीस मुख्यालयातील महिला पोलीस अंमलदार पौर्णिमा चौधरी यांची नेत्रदीपक कामगिरी


### नवी दिशा... नवीन संधी




४२. मुलींनो, उद्योजक व्हा! – **सुरेश वांदिले**


### कविता


३८. तुझे अस्तित्व आणि मी – **बाळकृष्ण ठाणगे**

५२. 'ति'चं अस्तित्व – **मीरा सावंत**

६९. ना अबला महिला सबला तू – **दत्तात्रय जोशी**


### आरोग्यं धनसंपदा




३०. महिलांनो, सावधान! चालताना त्रास होतोय? – **ऐश्वर्या साळवी**

३६. हिवाळ्यात हार्ट अटॅक का वाढतात? – **डॉ. अनिल शर्मा**


### लेख




०७. महिला व बालकल्याण विभागातर्फे विविध योजनांची यशस्वी अंमलबजावणी

१४. महिला आणि आर्थिक नियोजन – **सुधाकर कुलकर्णी**

२७. युगस्त्री सावित्रीबाई फुले यांच्या पाऊलखुणा – **प्रा. शरद मनसुख**

३३. बाईपण कालपण, आजपण आणि उद्यापण... – **अनघा पाटील**

३९. जागतिक महिला दिन : कर्तृत्व, संघर्ष आणि समतेकडे वाटचाल– **सुनील पाटील**

४७. स्त्री आणि मुलींच्या हक्कांचे संरक्षण– **रोजमेरी दुधाट**

५३. ओढ लेकीच्या मायेची– **भारती सावंत**




### तपासकथा




५६. एक किंकाळी आणि... – **विद्या पाटील, पोलीस निरीक्षक, ठाणे शहर पोलीस ठाणे**

६०. अनिता गप्प का होती? – **वृषाली पाटील, पोलीस निरीक्षक, कोथरूड पोलीस ठाणे, पुणे**

६४. रॉंग नंबर – **श्रीकांत शिंदे, पोलीस निरीक्षक, खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई**

७०. भिंगरी – **दिनेश भदाणे, सहा. पोलीस निरीक्षक, शहादा पोलीस ठाणे, नंदुरबार**

७४. कोडे – **मोनिका जेजोट, पोलीस उपनिरीक्षक, दिंडोरी पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण**





७९. जानेवारी २०२६ दरम्यान निधन झालेल्या महाराष्ट्र पोलीस दलाच्या सेवानिवृत्त अधिकारी/अंमलदार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

८१. शब्दकोडे

लेख

# महिला व बालकल्याण विभागातर्फे विविध योजनांची यशस्वी अंमलबजावणी




## वन स्टॉप सेंटर

समस्याग्रस्त महिला व तिच्या कुटुंबियास न्याय मिळण्यासाठी तथा वैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक उपचार व मदत एकाच छताखाली मिळण्यासाठी केंद्र शासनाने Sakhi One Stop Centre ही योजना सुरू केली आहे. सद्यस्थितीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकूण ६७ केंद्रे कार्यरत आहेत. संकटातील महिलांना तातडीने मदत करण्यासाठी प्रत्येक केंद्रावर स्वतंत्र वाहन उपलब्ध आहे. संकटग्रस्त महिलांना खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही ठिकाणी एकाच छताखाली मदत देणे आणि आपत्कालीन तसेच गैरआपत्कालीन स्थितीमध्ये वैद्यकीय, कायदेशीर सुविधा, तात्पुरता निवारा, पोलीस साहाय्य तसेच कोणत्याही प्रकारच्या हिंसेविरोधात लढता येण्याकरिता मानसशास्त्रीय व समुपदेशनात्मक आधार यांसारख्या सुविधा ताबडतोब उपलब्ध करून दिल्या जातात.

## १८१ महिला हेल्पलाईन नियंत्रण कक्ष

केंद्र शासनाच्या मिशन शक्ती या एकछत्री योजनेच्या 'संबल' या उपयोजनेअंतर्गत केंद्र पुरस्कृत हेल्पलाईन योजनेअंतर्गत संकटग्रस्त महिला व बालकांसाठी राज्यात हेल्पलाईन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून हे नियंत्रण कक्ष महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे या कार्यालयाच्या परिसरात कार्यरत आहेत.

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागांतर्गत

कार्यान्वित असलेल्या महिला हेल्पलाईन १८१ आणि चाईल्डलाईन १०९८ हे दोन स्वतंत्र टोल फ्री क्रमांक Emergency Response Support System ११२ (ERSS-११२) या देशपातळीवरील हेल्पलाईनशी संलग्न करण्यासाठी केंद्र शासनाने Centre for Development of Advanced Computing (C-DAC) या संस्थेमार्फत संगणकीय कार्यप्रणाली आणि आवश्यक ते साहित्य पुरविले आहे.

## शासकीय महिला (राज्यगृह/ संरक्षणगृह)

महिला व बाल विकास विभागाअंतर्गत २२ शासकीय महिला राज्यगृह/ संरक्षणगृह कार्यरत आहेत. सदर वसतिगृहामध्ये १६ ते ६० वयोगटातील निराश्रित, परीत्यक्ता/ घटस्फोटित, कुमारी माता, लैंगिक अत्याचारग्रस्त, अनैतिक व्यापारात अडकलेल्या, सामाजिक संकटग्रस्त महिला, निराधार /निरश्रित विधवा महिलांना प्रवेश दिला जातो. सदर वसतिगृहांमध्ये महिला स्वेच्छेने, स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने, पोलिसांमार्फत तसेच न्यायालयाच्या आदेशाने दाखल होऊन वसतिगृहात २ ते ३ वर्षे राहू शकतात.

सदर वसतिगृहामध्ये महिलेने प्रवेश घेतल्यानंतर किमान ३० दिवसांच्या वास्तव्यानंतर तिला सुधारित माहेर योजनेअंतर्गत दरमहा १००० रुपये अनुदान दिले जाते. महिलेच्या बरोबर तिची लहान मुले असल्यास पहिल्या




मुलाला ५०० व दुसऱ्या मुलासाठी ४०० रुपये दरमहा अनुदान दिले जाते. सदरचे अनुदान जास्तीत जास्त एक वर्षासाठी देण्यात येते. संस्थेतील महिलांना मूलभूत गरजा, वैद्यकीय सेवा, समुपदेशन तसेच इतर आवश्यक त्या सर्व सेवा संस्थेमार्फत पुरविल्या जातात. स्वयंरोजगार प्रशिक्षण, शिक्षण, विवाह, नोकरी, कौटुंबिक पुनर्वसन याद्वारे संस्थेतील महिलांचे पुनर्वसन केले जाते.

सदरच्या नियंत्रण कक्षात राज्यातील पीडित महिलांसाठी १८१ ही राज्य महिला हेल्पलाईन १८ सप्टेंबर २०२३ रोजी २४/७ सुरू झाली. संपूर्ण महाराष्ट्रातून संकटग्रस्त व पीडित महिलांचे कॉल १८१ या टोल फ्री क्रमांकावर येतात. १८१ महिला हेल्पलाईन क्रमांकावर संकटग्रस्त/ पीडित महिलांचा कॉल आल्यानंतर त्यांच्या तक्रारीची नोंद ऑनलाईन पद्धतीने राज्य महिला हेल्पलाईन नियंत्रण कक्षामध्ये नोंदवली जाते. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मिशन शक्ती योजनेअंतर्गत वन स्टॉप सेंटर कार्यरत आहेत. त्यानंतर ज्या जिल्ह्यांची तक्रार असेल त्या संबंधित जिल्ह्यांना ऑनलाईन पद्धतीने सदरील तक्रार पाठवली जाते.

## नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह(सखी निवास)

देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतिशील बदलामुळे शहरी भागात नोकरीच्या शोधात अनेक महिला त्यांचे घर सोडून राहतात. अशा नोकरी करणाऱ्या एकट्या, अविवाहित, विधवा, घटस्फोटित, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या स्त्रियांची संरक्षणाच्या दृष्टीने राहण्याच्या जागेची सोय करण्यासाठी सदर योजना राबविली जाते. सदर वसतिगृहामध्ये एकल महिला, अविवाहीत, विधवा, घटस्फोटीत, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या महिला, प्रशिक्षणार्थी किंवा कुटुंबाचे सदस्य त्या शहरात वास्तव्यास नसतील अशा नोकरी करणाऱ्या महिला यांना प्रवेश देण्यात येतो. समाजातील वंचित घटकांतील महिलांना प्रथम प्राधान्य देण्यात येते. निवासाची कमतरता असल्यास दिव्यांग लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येते. सखी निवास या







घटक योजनेअंतर्गत महानगरामध्ये ५०,००० आणि इतर शहरांमध्ये ३५,००० रुपये पर्यंत मासिक वेतन उत्पन्न असणाऱ्या महिलांना प्रवेश देण्यात येतो. तसेच या महिलांकडून त्यांच्या मासिक पगाराच्या १५% सिंगल बेडरूमसाठी, प्रत्येकी १०% डबल बेडरूमसाठी आणि प्रत्येकी ७.५% डॉरमेटरीसाठी इतके भाडे आकारण्यात येते. लाभार्थी महिलेला १८ वर्ष वयापर्यंतची मुलगी किंवा १२ वर्षांपर्यंतचा मुलगा असल्यास त्यांच्या निवासाची व्यवस्था त्यांच्या आईसोबत करण्यात येते. तसेच अशा महिलांच्या मुलांसाठी डे–केअर सेंटरची सुविधा सखी निवासमध्ये उपलब्ध करून दिली जाते.

सद्यस्थितीत राज्यामध्ये जुन्या योजनेप्रमाणे ७१ तसेच नव्याने मान्यता मिळालेल्या सखी निवास योजनेंतर्गत एकूण २३ वसतिगृहे कार्यरत आहेत.

**शक्ती सदन- (स्वाधार व उज्ज्वला)**

राज्यातील वंचित, संकटग्रस्त महिलांसाठी केंद्र पुरस्कृत उज्ज्वला व स्वाधार या योजनांची अंमलबजावणी सन २०१६ पासून करण्यात येत आहे. केंद्र पुरस्कृत स्वाधार योजनेंतर्गत राज्यातील निराधार, निराश्रित, नैसर्गिक आपत्तीत/ कौटुंबिक हिंसाचारामध्ये बेघर झालेल्या महिला व त्यांच्या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय मदत, कायदेविषयक समुपदेशन तसेच हेल्पलाईनद्वारे मार्गदर्शन उपलब्ध करण्यात येते. तसेच अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी उज्ज्वला योजना राबवण्यात येत असून या योजनेंतर्गत लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या, वेश्या व्यवसायातून पोलिसांनी सुटका केलेल्या महिला व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण व प्रशिक्षण देऊन पुनर्वसन केले जाते.

आजवर २१ शक्ती सदन संस्थांना मान्यता देण्यात आलेली असून आवश्यकतेनुसार इतर निवडक जिल्ह्यांमध्ये नवीन २९ शक्ती सदन स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**मिशन शक्ती ॲप-**

संकटग्रस्त व गरजू महिलांना तातडीने आवश्यक असलेली मदत मिळण्यासाठी केंद्र शासनाने मिशन शक्ती ॲप (मोबाईल ॲप) ची कार्यप्रणाली विकसित केली असून ते सर्वांना मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक महिलेच्या मोबाईलमध्ये सदरचे ॲप उपलब्ध असणे अपेक्षित आहे, जेणेकरून संकटात असलेल्या महिलांना आवश्यक असलेली मदत तातडीने मिळू शकेल. या मोबाईल ॲपद्वारे महिला हेल्पलाईन क्रमांक १८१, आपत्कालीन साहाय्य क्र. ११२ या क्रमांकांवर संपर्क करणे, आपल्या नजीकच्या वन स्टॉप सेंटरचा शोध घेणे, वन स्टॉप सेंटरची Appointment बुक करणे, SHE-BOX वर कंप्लेंट व तक्रार नोंदविणे, बालविवाहाबद्दल तक्रार नोंदविणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर संपर्क सूची, संस्थांची सूची, योजनांची माहिती इ. आवश्यक सुविधा या एकाच मिशन शक्ती ॲपद्वारे महिला व नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. मिशन शक्ती ॲप प्ले–स्टोअर वरून मोफत डाऊनलोड करता येते. ■

# दुभंगलेल्या २७८ संसाराच्या रेशीमगाठी भरोसा सेल, हिंगोली यांनी बांधल्या



हिंगोली पोलीस अधीक्षक कार्यालय येथे भरोसा सेल सन २०२१ पासून कार्यरत आहे. भरोसा सेलमध्ये सन २०२५ मध्ये वर्षभरात एकूण ८७७ विवाहित जोडप्यांच्या कौटुंबिक वादाची प्रकरणे (तक्रार अर्ज) प्राप्त झाली होती. क्षुल्लक कारणावरून पती-पत्नी यांचेमधील वाद विकोपाला जाऊन संसाराची घडी विस्कटण्यापर्यंत प्रकरण जाते. अशा जोडप्यांचे संसार सुरळीत चालावे यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने पोलीस अधीक्षक डॉ. श्री. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली भरोसा सेल येथे दैनंदिन तत्त्वावर समुपदेशन करून जास्तीत जास्त प्रकरणांमध्ये तडजोड करून संसार सुरळीत करण्याचे प्रयत्न भरोसा सेल येथील अधिकारी व अंमलदार यांच्याकडून केले जातात. पीडित महिलांना विश्वासात घेऊन मानसिक आधार देण्याचे काम केले जाते. तसेच लैंगिक, मानसिक व आर्थिक शोषणास बळी पडलेल्या महिला व बालकांना पोलीस मदत, महिला हेल्पलाईन समुपदेशन, वैद्यकीय सेवा, मानसोपचार तज्ञ, विधी विषयक सेवा, पीडित महिलांचे पुनर्वसन, कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत संरक्षण आदींबाबत



सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन करण्याचे काम भरोसा सेलच्या माध्यमातून करण्यात येत आहे. कौटुंबिक वादाच्या प्रकरणांमध्ये जोडप्यांचे योग्य पद्धतीने समुपदेशन केल्याने सन २०२५ मध्ये योग्य समुपदेशन केल्याने उच्चशिक्षित, उच्चपदस्थ आणि वयस्कर जोडप्यांचे संसारसुद्धा सुरळीत झाल्याने भरोसा सेल हे नावाप्रमाणेच पीडित महिलांचा भरोसा म्हणून कर्तव्य बजावत असल्याचे सर्वसामान्य माणसांकडून मनोगत व्यक्त होत आहे...

पोलीस अधीक्षक डॉ. श्री. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक श्री. कमलेश मीना, उपविभागीय पोलीस अधिकारी (गृह) श्री. दत्ता केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली भरोसा सेल प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक प्रेमलता जगताप (गोमाशे), पोलीस उपनिरीक्षक इस्माईल शेख, पोलीस अंमलदार अरुणा पेंदोर, अनिता जाधव, सीमा पाटील, वर्षा शिंदे, रविना घुमनर हे सर्वजण भरोसा सेल येथे सामाजिक बांधिलकी जपत अतिशय संवेदनशीलतेने कर्तव्य बजावत आहेत. त्यामुळे विस्कटलेल्या संसाराच्या घड्या बसविण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे.

हिंगोली जिल्ह्यात इयत्ता ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्टुडंट पोलीस कॅडेड प्रोग्राम संपूर्ण वर्षभर भरोसा सेल व दामिनी पथकाद्वारे राबविण्यात येत आहे. एकूण ३२ शाळांमध्ये सदरचा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सायबर क्राईम, बालविवाह, महिला सक्षमीकरण, डायल ११२ अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येते. तसेच हिंगोली घटकात भरोसा सेल व दामिनी पथकामार्फत नमूद विषयावर पथनाट्य तयार करून १४.१०.२०२५ रोजी शिवाजी सभागृह, हिंगोली येथे मान्यवरांच्या उपस्थितीत व शालेय विद्यार्थ्यांच्या समोर सादर करण्यात आले.

शाळा, कॉलेज, महाविद्यालय, वसतिगृह, निरीक्षणगृह व गर्दीच्या ठिकाणी दामिनी पथकाने एकूण ८३२ भेटी पूर्ण वर्षभरात दिल्या आहेत. तसेच पथकाअंतर्गत शाळकरी विद्यार्थिनींना आत्मसंरक्षण व कायदेशीर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

हिंगोली पोलीस वर्धापन

**हिंगोली जिल्ह्यात इयत्ता ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्टुडंट पोलीस कॅडेड प्रोग्राम संपूर्ण वर्षभर भरोसा सेल व दामिनी पथकाद्वारे राबविण्यात येत आहे. एकूण ३२ शाळांमध्ये सदरचा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सायबर क्राईम, बालविवाह, महिला सक्षमीकरण, डायल ११२ अशा विषयांवर मार्गदर्शन करण्यात येते.**






सप्ताहाच्या निमित्त हिंगोलीतील समाजकल्याण वसतिगृह येथील विद्यार्थिनींनी पोलीस अधीक्षक कार्यालयास भेट दिली. या भेटीच्या निमित्ताने भरोसा सेल व दामिनी पथकाच्या वतीने विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा व त्यांना सुरक्षिततेबाबत जागरूक करता यावे, या उद्देशाने विशेष मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतच्या विविध शाळांमधील विद्यार्थिनींना भरोसा सेल व दामिनी पथकाची कार्यपद्धती समजावून सांगण्यात आली. तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची सविस्तर माहिती देण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीदरम्यान स्वतःचा बचाव कसा करावा, ताबडतोब मदतीसाठी १०९८ व ११२ या आपत्कालीन क्रमांकांचा योग्य वापर कसा करावा, याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बालविवाहाचे दुष्परिणाम या विषयावर विशेष भर देण्यात आला. कोणत्याही परिस्थितीत बालविवाह करू नये, बालविवाह केल्यास मुलींच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम तसेच संबंधित कुटुंबावर दाखल होणारे गुन्हे यांविषयी विद्यार्थिनींना सखोल माहिती देण्यात आली. पोलीस अधीक्षक डॉ. श्री. निलाभ रोहन यांनी उच्च शिक्षण परीक्षांना सामोरे जावे आणि समाजात सक्षमपणे उभे राहावे याबाबतचे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक डॉ. श्री. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलीस अधिकारी (गृह) केंद्रे यांच्यासह भरोसा सेल व दामिनी पथकातील सहा. पोलीस निरीक्षक प्रेमलता जगताप, पोलीस






उपनिरीक्षक शेख, अंमलदार सरनाईक तसेच महिला अंमलदार अरूणा पेंदोर, अनिता जाधव, सीमा पाटील, वर्षा शिंदे, आरती साळवे, नंदा धोंगडे, रविना घुमनर आदी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये सुरक्षा, कायदेविषयक जाणीव व आत्मविश्वास वाढल्याची भावना व्यक्त करण्यात येत असून महिला व मुलींच्या सुरक्षेकरिता हिंगोली दामिनी पथक सदैव तत्पर आहे.

पोलीस स्टेशन आ. बाळापूर जि. हिंगोली हद्दीत ०२.०२.२०२६ रोजी एका इसमाने अल्पवयीन मुलीला पळवून नेले. याबाबत अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला होता. त्या प्रसंगी बाळापूर येथील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक गणेश गोटके, महिला पोलीस अंमलदार सुनिता धुळे, विजय जाधव व सागर वाढोणकर यांनी ताबडतोब लोकेशन व इतर माध्यमाच्या साधनाद्वांरे सदर अल्पवयीन मुलीचा तेलंगणा राज्य, हैद्राबाद येथील चारमिनार येथून २४ तासांच्या आत शोध घेऊन पोलीस स्टेशन आ. बाळापूर येथे सुरक्षित आणले. तिला तिचे वय विचारले असता तिने तिचे वय १६ वर्ष ०४ महिने असल्याचे सांगितले. तिच्यावर अत्याचार झाले असल्याचे सदर मुलीने सांगितले, त्यावरून सदर गुन्ह्यात कलमवाढ करण्यात आली होती. त्यानंतर आरोपीला सदर पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे ताब्यात घेतले. सदर आरोपीला मा. न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडी सुनावली. त्यानंतर आरोपीला मा. न्यायालयाने एम. सी. आर. देऊन आरोपीला परभणी कारागृह येथे दाखल केले. सदर पथकाने २४ तासांच्या आत अल्पवयीन मुलीचा शोध घेऊन आई वडील यांच्या ताब्यात दिले. तसेच आरोपी विरोधात कायदेशीर कारवाई केली आहे. ■



सुधाकर कुलकर्णी
पुणे

# महिला आणि आर्थिक नियोजन

आपल्याकडे स्त्रीला शक्तीच्या रूपात पूजले जाते. या शक्तीच्या हातात आर्थिक नाड्या असतील तर फक्त कुटुंबाचेच नाही तर समाजाचेही भले होऊ शकते. पण त्यासाठी ती अर्थसाक्षर असणे महत्त्वाचे आहे. तिला अर्थसाक्षर कसे करायचे? तिची अर्थसाक्षरता वाढल्याने काय फायदे होतील? यावर या सदरात भाष्य करण्यात आले आहे.



जागतिक महिला दिन अर्थात ८ मार्च याचे औचित्य साधून आज आपण महिला आणि आर्थिक नियोजन याचे महत्त्व समजून घेऊ.

आता महिलांचा सहभाग सर्व क्षेत्रांमध्ये दिसून येत असून त्या पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. यामुळे शिक्षण, नोकरी, व्यवसाय, राजकारण, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रांमध्ये महिलांची भूमिका महत्त्वाची ठरत असल्याचे दिसून येते. असे असले, तरी बहुतांश घरांत आर्थिक निर्णय प्रामुख्याने पुरुष मंडळीच घेत असल्याचे आढळते आणि यामुळे कुटुंबाच्या आर्थिक नियोजनामध्ये महिलांचा सहभाग अनेकदा अभावानेच दिसून येतो. खरे तर कुटुंबातील दैनंदिन बाबींमध्ये गृहिणीचे जितके जास्त लक्ष

असते, तितकी त्या कुटुंबाची घडी व्यवस्थित असते, आणि जर महिलेने कुटुंबाच्या आर्थिक व्यवहारात जाणीवपूर्वक लक्ष घातले तर कुटुंबाची आर्थिक घडीसुद्धा व्यवस्थित बसू शकते. त्यामुळेच आर्थिक नियोजनात घरातील महिलेचा सक्रीय सहभाग असणे अगदी गरजेचे आहे. मात्र त्यासाठी प्रथम महिला अर्थसाक्षर असणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे महिलांचे गृहिणी व कमावती (व्यवसाय अथवा नोकरी करणारी) असे दोन प्रकार मोडतात. यातील कमावत्या महिलेस गृहिणी म्हणूनसुद्धा घरातील बारीकसारीक गोष्टींमध्ये लक्ष घालावे लागते. तिला काही प्रमाणात आर्थिक स्वावलंबन व आर्थिक स्वातंत्र्य असते. मात्र केवळ गृहिणी असणाऱ्या महिलेस बरेचदा आर्थिक स्वावलंबन तर नसतेच, शिवाय आर्थिक स्वातंत्र्यही नसते.

आर्थिक स्वातंत्र्याच्या दृष्टिकोनातून केवळ गृहिणी असणाऱ्या महिलांनी स्वतःचे उत्पन्न, बचत आणि गुंतवणूक याबाबत जागरूक असणे गरजेचे आहे. त्यानुसार स्वत: एखादा छोटा मोठा घरगुती व्यवसाय सुरू करून आपले आर्थिक स्वावलंबन वाढीस लागेल यासाठी प्रयत्नशील असणे अतिशय आवश्यक आहे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

महिलांनी अर्थार्जनाबरोबरच आपली अर्थसाक्षरता जाणीवपूर्वक वाढविली पाहिजे. आता आपली अर्थसाक्षरता सहजगत्या वाढविता येते. त्यासाठी टी. व्ही, युट्यूब, रोजचा पेपर तसेच मासिक या माध्यमातून बरीच माहिती मिळविता येते. तसेच याबाबत मार्गदर्शन करणारी आर्थिक साक्षरता व गुंतवणूक जागरूकता या विषयावरील वेळोवेळी होणारी व्याखाने आवर्जून ऐकावीत. (असे कार्यक्रम बँका, म्युचुअल फंड कंपन्या, इंश्युरंस कंपन्या, एनएसई तसेच बीएसई स्टॉक एक्सचेंज सातत्याने विविध ठिकाणी करत

**आर्थिक स्वातंत्र्याच्या दृष्टिकोनातून केवळ गृहिणी असणाऱ्या महिलांनी स्वतःचे उत्पन्न, बचत आणि गुंतवणूक याबाबत जागरूक असणे गरजेचे आहे. त्यानुसार स्वत: एखादा छोटा मोठा घरगुती व्यवसाय सुरू करून आपले आर्थिक स्वावलंबन वाढीस लागेल यासाठी प्रयत्नशील असणे अतिशय आवश्यक आहे.**

असतात.) याशिवाय आपल्याला हवी असलेली नेमकी माहिती आता गुगल तसेच एआयच्या मदतीने सहज मिळविता येते.

अर्थ साक्षरतेमध्ये प्रामुख्याने गुंतवणुकीचे विविध पर्याय, त्यातून मिळणारा परतावा (रिटर्न) व संबंधित गुंतवणुकीत असणारी जोखीम (रिस्क) यांचा समावेश असतो. याशिवाय गुंतवणूक करण्यासाठीची करावी लागणारी पूर्तता करावी लागते. उदा: आपल्याला शेअर्समध्ये गुंतवणूक करावयाची असेल, तर सर्वप्रथम आपले डी–मॅट खाते तसेच ब्रोकरकडे खाते असणे आवश्यक असते. थोडक्यात आधी डी–मॅट खाते म्हणजे काय व ते कसे सुरू करायचे हे समजून घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ब्रोकर म्हणजे काय व त्याच्याकडे खाते कसे सुरू करायचे हे समजणे म्हणजे शेअर मधील गुंतवणुकीसाठीची प्रारंभिक अर्थसाक्षरता होय. त्यानंतर शेअर मार्केटबाबतची माहिती करून घेणे गरजेचे असते.

महिलांनी केवळ बचतीपुरते मर्यादित न राहता योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी. त्यासाठी प्रामुख्याने खालील पर्याय गुंतवणुकीसाठी असतात.

- बँकेतील विविध ठेवी (मुदत ठेव, पुनरावर्ती ठेव (रिकरिंग), संचयी ठेव (क्युम्युलेटीव्ह)
- पीपीएफ, पोस्टातील गुंतवणूक, सुकन्या ठेव योजना
- म्युच्युअल फंड
- शेअर्स
- इन्श्युरंस
- पेन्शन योजना
- सोने
- स्थावर मालमत्ता



अर्थ साक्षरतेबरोबरच महिलांनी आर्थिक नियोजनाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यानुसार आपल्या उद्दिष्टानुसार गुंतवणूक करणे गरजेचे असते. उदाः आपल्या भविष्यातील दीर्घकालीन गरजांसाठी (उदाः मुलांचे शिक्षण/लग्न, आपली सेवानिवृत्ती) आपली जोखीम घेण्याची क्षमता विचारात घेऊन पीपीएफ, एनपीएस, आरबीआय बाँड, शेअर्स, म्युचुअल फंड, सोने यांसारखे पर्याय निवडावेत. शेअर्स/म्युचुअल फंडातील दीर्घकालीन गुंतवणूक सुमारे १२ ते १४% इतका परतावा देऊ शकते, तर पीपीएफ/पोस्ट/बँक यातील गुंतवणूक सुमारे ७ ते ८% इतका परतावा देऊ शकते हे लक्षात घ्यावे.

आपल्या आपत्कालीन गरजांसाठी (उदाः अकाली मृत्यू, अपघात, आजारपण) योग्य ती विमा पॉलिसी घेणे आवश्यक असते. जसे की अकाली मृत्यूमुळे आपल्या कुटुंबीयांवर मानसिक आघात तर होतोच, शिवाय आर्थिक समस्यासुद्धा उभी राहते. योग्य प्रकारची लाईफ इंश्युरन्स पॉलिसी घेतल्याने आर्थिक समस्येवर काही प्रमाणात निश्चित मात करता येते. यासाठी आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या १० ते १५ पट इतके कव्हर असणारी टर्म इंश्युरन्स पॉलिसी घेणे योग्य असते. तर आजारपण व त्यामुळे उद्‌भवणारे हॉस्पिटलायझेशन यातून होणाऱ्या खर्चावर मात करण्यासाठी योग्य ती मेडिक्लेम पॉलिसी घेणे गरजेचे असते. तसेच हार्ट ॲटॅक/पक्षाघात/ कर्करोग/ किडनी ट्रान्सप्लांट/ ट्युमर यांच्यासारख्या गंभीर आजारांसाठी क्रिटीकल केअर इंश्युरन्स पॉलिसी घेणे गरजेचे असते. अपघातामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी अपघात विमा पॉलिसी घ्यावी. कोणत्याही प्रकारची विमा पॉलिसी घेताना आपली गरज, त्यासाठी द्यावा लागणारा प्रीमियम व पॉलिसीच्या अटी समजून घेणे आवश्यक असते.

महिला व्यवसायिक असेल किंवा नोकरी करणारी असेल, तिला आपल्या निवृत्तीचे नियोजन करणे व तेही शक्य तितक्या लवकर करणे गरजेचे असते. यासाठी शेअर्स/म्युच्युअल फंड्स यातील दीर्घकालीन गुंतणूक निश्चितच फायदेशीर ठरू शकते. याचबरोबर एनपीएस मधील गुंतवणुकीमुळे सेवानिवृत्तीनंतर नियमित उत्पन्न पेन्शन स्वरूपात मिळू शकते. तर पीपीएफमधील गुंतवणूक एकमुठी रक्कम देऊ शकते. सेवानिवृत्तीनंतरच्या आर्थिक स्वावलंबनासठी योग्य व आवश्यक ते रिटायरमेंट प्लॅनिंग शक्य तितक्या लवकर करणे फायद्याचे असते, हे लक्षात घ्या.

लहानपणापासून आपल्या मुलांना आर्थिक शिस्तीचे महत्त्व समजून सांगा. त्यामुळे त्यांना आर्थिक शिस्त तर लागेलच, शिवाय ते कमयावला लागण्याआधी अर्थसाक्षरही होतील.

थोडक्यात असे म्हणता येईल, की महिलांनी जाणीवपूर्वक आर्थिक साक्षरता वाढवून योग्य आर्थिक नियोजन केल्यास ते केवळ कुटुंबासाठीच नव्हे तर समाजासाठीही उपयुक्त होऊ शकेल. आर्थिक स्वातंत्र्य हीच खरी प्रगतीची व यशाची गुरुकिल्ली आहे. ▪



श्री. रविंद्रसिंह परदेशी
पोलीस अधीक्षक
परभणी

# एक संवाद विद्यार्थिनींशी: परभणी पोलिसांचा महिला सुरक्षेसाठीचा उपक्रम

परभणी जिल्हा पोलीस दलाने ८ ते ११ डिसेंबर या कालावधीत जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये तसेच वसतिगृहे यांमधील विद्यार्थिनींशी संवाद साधण्यासाठी 'एक संवाद विद्यार्थिनींशी-२' हा उपक्रम सुरू केला. याचा मुख्य उद्देश मुलींना सक्षम व आत्मनिर्भर बनविणे हा होता.




परभणी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शालेय विद्यार्थिनी व महाविद्यालयीन तरुणी यांच्यासोबत अनेक गंभीर स्वरूपाच्या घटना घडत आहेत. यात छेडछाड, बाल लैंगिक अत्याचार, त्यांना धमक्या देणे, वाईट हेतूसाठी पळवून नेणे अशा प्रकारच्या घटनांचा समावेश आहे. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थिनी विविध कारणांमुळे या समस्या पोलीस, पालक, शिक्षक यांना सांगत नाहीत. परिणामी या वाढत्या समस्येकडे गांभीर्याने पाहून त्याला आळा बसवण्याचा निर्धार परभणी पोलिसांनी केला.

परभणी पोलिसांतर्फे समाजातील लहान मुली व तरुणी यांना सुरक्षित, सक्षम व आत्मनिर्भर बनविण्याच्या हेतूने 'एक संवाद विद्यार्थिनींशी-२.०' हा कार्यक्रम जिल्ह्यातील प्रत्येक शाळा, महाविद्यालय, वसतिगृहात घेतला जात आहे. विद्यार्थी व




तरुणी यांच्या मनातील भीती, असुरक्षिततेची भावना दूर करणे, त्यांच्या भावना समजून घेणे, तसेच त्यांना कायदेशीर संरक्षण व सुरक्षिततेचा विश्वास देणे हा याचा प्रमुख उद्देश आहे. याच्या प्राथमिक टप्प्यामध्ये जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयात 'एक संवाद विद्यार्थिनींशी– १.०' हा उपक्रम राबविला गेला. त्यामध्ये ३६०० विद्यार्थिनींशी संवाद साधून त्यांना प्रशिक्षित व आत्मनिर्भर बनविले गेले. त्या कार्यक्रमाचे यश व सफलता पाहून व विद्यार्थिनी व पालकांकडून त्याची वाढती मागणी लक्षात घेऊन परभणी पोलीस दलातर्फे एक संवाद विद्यार्थिनींशी–२.० हा उपक्रम राबविला गेला. सदर उपक्रम दिनांक ०८ ते ११ डिसेंबर २०२५ या काळात राबविण्यात आला.

एक संवाद विद्यार्थिनींशी – २.० साठी श्री. रविंद्रसिंह परदेशी, पोलीस अधीक्षक, परभणी, श्री. सूरज गुंजाळ, अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती सोनेत, श्रीमती शिंगाडे, काका–दिदी पथकातील अधिकारी व अंमलदार यांच्यासह पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व अंमलदार यांनी मोलाचे योगदान दिले.

सदर उपक्रमास व्याख्याते म्हणून मुंबई येथील श्री. मिलिंद पोंक्षे (जाणीव जागृती एन.जी.ओ.) व श्रीमती गौरी संके (एन.जी.ओ.) यांना प्रत्येक वेळी मार्गदर्शक म्हणून बोलवण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी ऐकून घेण्यात आल्या. त्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना कोणत्याही प्रकारच्या अन्यायाच्या विरोधात निर्भयपणे तक्रार करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. मराठवाडा हायस्कूल, परभणी येथे सदर उपक्रम पोलीस निरीक्षक श्री. मांजरमकर, महिला सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती सोनेत, पोलीस अंमलदार जांबुरे यांनी यशस्वी केला. या संवादासाठी विद्यार्थिनी, शाळेतील शिक्षकवृंद यांसह सुमारे ४०० नागरिक उपस्थित होते. भारतीय बाल विद्या मंदीर, परभणी येथे सदर उपक्रम श्रीमती सोनेत, पोलीस अंमलदार धोंडगे, लाड यांनी यशस्वी केला. शिक्षकवृंद व विद्यार्थिनी असे मिळून अंदाजे ६० जण या उपक्रमाला उपस्थित होते.

आरबिंदो अक्षरज्योती परभणी येथे पार पडलेला उपक्रम हा सहा. पोलीस निरीक्षक कारवार, श्रीमती सोनेत, पोलीस अंमलदार बजास बोबडे यांनी यशस्वी केला. या प्रसंगी शाळेतील शिक्षकवृंद, व विद्यार्थिनी ५५० एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. जवाहर माध्यमिक विद्यालय जिंतूर येथे सदर उपक्रम पोलीस नरीक्षक श्री. गजेंद्र सरोदे, श्रीमती सोनेत यांनी यशस्वी केला. शाळेतील शिक्षकवृंद, व विद्यार्थिनी मिळून अंदाजे ७५० एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. कस्तुरबा गांधी विद्यालय जिंतूर येथे झालेल्या उपक्रमासाठी शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थिनी अंदाजे ३०० एवढ्या संख्येने उपस्थित होते. संत जनार्दन विद्यालय, चारठाणा येथे झालेल्या उपक्रमात श्री. रविंद्रसिंह परदेशी, पोलीस अधीक्षक, परभणी यांच्या नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्री. दळवे, श्रीमती सोनेत, पोलीस

अंमलदार सातपूते यांनी यशस्वी केला. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, व विद्यार्थिनी अंदाजे ४०० एवढ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, पाथरी येथे सदरचा उपक्रम पोलीस निरीक्षक श्री केंद्रे, श्रीमती सोनेत यांनी यशस्वी केला. यावेळी शिक्षकवृंद व विद्यार्थिनी अंदाजे ४०० एवढ्या संख्येने उपस्थित होते. गांधी विद्यालय, वसमत रोड, परभणी येथे उपक्रम पोलीस निरीक्षक श्री. पाटील श्रीमती सोनेत, पोलीस अंमलदार जांबुरे यांनी यशस्वी केला. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, व विद्यार्थिनी अंदाजे ६०० एवढ्या संख्येने उपस्थित होते. नूतन विद्यालय, परभणी येथे सदर उपक्रम अपर पोलीस अधीक्षक श्री. सूरज गुंजाळ, श्रीमती सोनेत, पोलीस अंमलदार सम्राट कारेडे यांनी यशस्वी केला. शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थिनी अंदाजे ३०० एवढ्या संख्येने उपस्थित होते. नूतन कन्या विद्यालय, सेलू येथे सदरचा उपक्रम श्रीमती सोनेत, श्रीमती पुंगळे, मुलगीर, पोलीस अंमलदार श्रीमती अस्मिता मोरे यांनी यशस्वी केला. शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थिनी अंदाजे ६०० एवढ्या संख्येने उपस्थित होते. सुमनताई गव्हाणे येथे झालेला उपक्रम श्रीमती. सोनेत, श्रीमती. शिंगाडे, पोलीस अंमलदार जाधव, सम्राट कोरडे, गौस यानीं यशस्वी केला. या प्रसंगी शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थिनी अंदाजे ३०० एवढ्या संख्येने उपस्थित होते. या संपूर्ण उपक्रमाच्या दरम्यान कार्यक्रमाच्या शेवटी मुलींनी मांडलेल्या समस्या, संवादातून दूर केल्या गेल्या.

एक संवाद विद्यार्थिनींशी –२.० या टप्प्यामध्ये परभणी पोलीस दल जिल्ह्यातील नमूद शाळा व महाविद्यालयांमधील एकूण ५२०० मुलींशी संवाद साधण्यात यशस्वी झाले आहे. सर्व मुलींना नवीन कायदे, महिला व मुलींवरील अत्याचार, त्यांचे कायदेशीर हक्क, सोशल मीडियाचा वापर करताना घ्यावयाची काळजी व त्याचे होणारे दुष्परिणाम या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पोलीस मदतीसाठी ११२, १०० हे टोल फ्री क्रमांक तसेच महिला पोलीस अधिकारी, काका, दिदी पथकातील महिला अधिकारी व अंमलदार यांचे संपर्क क्रमांक देऊन विद्यार्थिनींना उघडपणे अन्याय, अत्याचार यांविरुद्ध तक्रारी देणे यांबाबत मार्गदर्शन केले. अशा प्रकारे ‘एक संवाद विद्यार्थिनींशी’ या उपक्रमाअंतर्गत मुलींनी मुक्तपणे पोलिसांशी संवाद साधला. विद्यार्थीनींनी आपल्या पालकांप्रमाणे त्यांच्या अडचणी व अन्यायाबाबत पोलिसांना माहिती दिली. त्याचे निराकरण पोलीस दलाने केले. पुढेही जिल्ह्यातील उर्वरित शाळा, वसतिगृहे व म हाविद्यालयांमध्ये ‘एक संवाद विद्यार्थिनींशी’ हा उपक्रम नियमित राबविला जाणार आहे. ■



## पोलीस विशेष



नीलोत्पल
पोलीस अधीक्षक
गडचिरोली

# पोलीस मदत केंद्र, बिनागुंडा: अबूझमाडच्या शिखरांना गवसणी, सीमा सुरक्षेला नवे बळ!

महाराष्ट्र–छत्तीसगड या दोन राज्यातील सीमावर्ती भागात नेहमीच माओवाद्यांचा वावर असल्याने महाराष्ट्र–छत्तीसगड या दोन्ही राज्यांतील सीमावर्ती जिल्ह्यांमधील जंगल परिसरात पोलीस व माओवाद्यांमध्ये चकमकी घडून येतात. या दोन राज्यांधील सीमावर्ती भाग घनदाट जंगल व डोंगराळ भागाने व्यापलेला असल्याने या भागात छत्तीसगड राज्यातील माओवाद्यांचा सातत्याने वावर असायचा. याच पार्श्वभूमीवर माओवाद्यांचा गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश रोखण्याकरिता जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील सुरक्षा श्रृंखलेतील दहावे पोलीस मदत केंद्र बिनागुंडा या पोलीस मदत केंद्राची उभारणी करण्यात आली. यामुळे जिल्ह्यातील सुरक्षा पोकळी कमी होऊन माओवादी कारवायांना आळा बसणार आहे.

दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई श्री. सदानंद दाते यांनी गडचिरोली जिल्ह्यास भेट दिली. यावेळेस त्यांनी माओवादग्रस्त भागात पोलीस दलाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेतला. तसेच पोलीस दलाने राबविलेल्या अभियानांबद्दल व नागरी कृती उपक्रमांबद्दल मा. पोलीस महासंचालक यांनी गडचिरोली पोलिसांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. या दौऱ्यादरम्यान मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी उपविभाग भामरागड अंतर्गत नव्याने स्थापन झालेल्या अति–संवेदनशील पोलीस मदत केंद्र, बिनागुंडा येथे भेट देऊन अभियानाच्या तयारीची पाहणी केली आणि उपस्थित अधिकारी व अंमलदार यांच्याशी संवाद साधला. यानंतर पोलीस मुख्यालयातील एकलव्य सभागृह येथे पार पडलेल्या सैनिक संमेलनप्रसंगी सहा. पोलीस निरीक्षक पदी वेगवर्धित पदोन्नतीप्राप्त अधिकारी तसेच शौर्यपदकप्राप्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा मा. पोलीस महासंचालक यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## सीमा सुरक्षेसाठी अबूझमाडच्या पायथ्याशी पोलीस मदत केंद्र बिनागुंडाची उभारणी

महाराष्ट्र–छत्तीसगड या राज्यांच्या सीमावर्ती भागात भामरागड तालुक्यात अबूझमाडच्या पायथ्याशी बिनागुंडा आहे. हा परिसर घनदाट जंगलांनी वेढलेला असून निसर्गरम्य आहे. बिनागुंडा हे नाव उच्चारताच पुढे येते तो बिनागुंडा धबधबा. हे गडचिरोलीतील एक निसर्गरम्य, शांत आणि अविस्मरणीय ठिकाण आहे. हा धबधबा गडचिरोलीतील निसर्गाचे खरे सौंदर्य दाखवतो. घनदाट जंगल, उंचच उंच टेकड्या व बारमाही वाहणारे नदी–नाले यांनी हा प्रदेश वेढलेला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून माओवादी सावटाखाली असल्यामुळे हा विकासापासून कोसो दूर होता. माओवाददृष्ट्या अतिसंवेदनशील असा गडचिरोली जिल्ह्यातील हा दुर्गम–अतिदुर्गम भाग असून या भागातील आदिवासी बांधव आजदेखील विकासापासून दूर आहेत. त्यांचा विकास साधावा, माओवाद्यांच्या कारवायांना आळा बसावा व माओवाद्यांच्या दहशतीला ठोस उत्तर देता यावे यासाठी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने २०२६ या नववर्षाच्या आरंभी २४ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र–छत्तीसगड राज्य सीमेवर अतिदुर्गम बिनागुंडा येथे नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना करण्यात आली व ग्रामस्थांच्या हस्ते या पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

माओवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी शासन विविध योजना राबवत असते. यामध्ये सन २००३ पासून शासनामार्फत 'नक्षल गावबंदी' योजना सुरू करण्यात आली. याचाच एक भाग म्हणून बिनागुंडा व या परिसरात असलेल्या फोदेवाडा, कुव्वाकोडी, पेरमिलभट्टी, तुर्रेमर्का या गावातील ग्रामस्थांनी संपूर्ण जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर ०२ व ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी माओवाद्यांना गावबंदी केली होती. या संपूर्ण गावांतील नागरिकांनी एकमताने नक्षल गावबंदी ठराव संमत करून एक आदर्श उभा केला. ही एक कौतुकास्पद बाब आहे. बिनागुंडा व आसपासच्या गावातील नागरिकांना सुरक्षा प्रदान होऊन तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागून ते विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याकरिता हे पोलीस मदत केंद्र नक्कीच एक विश्वासाचे प्रतिक म्हणून समोर येईल.

या नवीन पोलीस मदत केंद्राच्या उभारणीमुळे छत्तीसगड सीमेवरील माओवाद्यांचा वावर कमी होऊन महाराष्ट्र व छत्तीसगड या दोन राज्यांना जोडणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. १३० D (जो महाराष्ट्रातील आलापल्ली (गडचिरोली) ते छत्तीसगड मधील नारायणपूर पर्यंत जाणार आहे) चे बांधकाम लवकर सुरू होणार आहे. लाहेरी ते बिनागुंडा यांच्यामधील गुंडेनूर नाल्याला पावसाळ्यात आलेल्या पुरामूळे बंगाडी, कुवाकोडी, फोदेवाडा, बिनागुंडा यासह इतर गावांचा चार महिन्यांसाठी संपर्क









तुटत असे. मात्र आता गुंडेनूर पुलाचे बांधकाम प्रगतिपथावर असून काम पूर्ण झाल्यावर या भागात भविष्यात एस. टी. महामंडळची बस सेवा सुरू करणे शक्य होणार आहे. दळणवळणाच्या सोयीकरिता या भागातील रखडलेले ०७ मोबाईल टॉवरच्या कामास गती येणार आहे. नव्याने उभारलेल्या पोलीस मदत केंद्रामुळे स्थानिक नागरिकांशी थेट संपर्क साधला जाईल. यातून त्यांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यावर भर दिला जाईल. पोलीस मदत केंद्रामुळे या भागातील नागरिकांपर्यंत विविध शासकीय योजनांची माहिती देऊन त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमुळे या भागातील नागरिक मुख्य प्रवाहात येऊन विकासाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतील. एकेकाळी माओवादग्रस्त असलेल्या बिनागुंडा परिसरात अखेर विकासाचा नवा अध्याय सुरू होणार आहे.

या सर्व विकासकामांमुळे या भागातील नागरिकांकरिता विकासाची क्रांती घडून नागरिकांचा प्रशासनाप्रती विश्वास निर्माण होऊन नागरिकांच्या मनातून माओवाद्यांची भीती नाहीशी होईल. बिनागुंडा व आजूबाजूला असलेल्या फोदेवाडा, कुव्वाकोडी, पेरमिलभट्टी, तुर्रेमर्का, पुंगासूर आणि दामणमर्का या गावांमधील नागरिकांचा सर्वांगीण विकास, सर्वांगीण सुरक्षा, त्यांना असणाऱ्या सर्व समस्या सोडविण्यास पोलीस मदत केंद्र बिनागुंडा सदैव तत्पर राहील.

पोलीस मदत केंद्र बिनागुंडाच्या उद्घाटन कार्यक्रमादरम्यान जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस मदत केंद्र बिनागुंडा हद्दीतील उपस्थित नागरिकांना ब्लँकेट, स्वयंपाक भांड्यांचा संच, बादली, मच्छरदाणी, महिलांना साडी, पुरुषांना धोतर, युवकांना टी-शर्ट, क्रिकेट किट, व्हॉलीबॉल व व्हॉलीबॉल नेट, शालेय विद्यार्थ्यांकरिता नोटबूक, पेन, स्कूल बॅग इत्यादी विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.

पोलीस मदत केंद्र बिनागुंडाची उभारणी करताना १० दिवसांच्या कालावधीत लाहेरी ते बिनागुंडा पर्यंत वाहतुकीकरिता १८ किमीचा रस्ता तयार करण्यात आला. पोलीस मदत केंद्राची उभारणी करण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. एकूण १०५० सी-६० कमांडो, २५ बीडीडीएस टीम, नवनियुक्त पोलीस जवान, ५०० विशेष पोलीस अधिकारी व खाजगी कंत्राटदार, ११ जेसीबी, १० ट्रेलर, ०५ पोकलेन, ४० ट्रक इत्यादींच्या साहाय्याने अवघ्या एका दिवसात पोलीस मदत केंद्राची उभारणी करण्यात आली. भारतातील गडचिरोली पोलीस दल हे एकमेव पोलीस दल आहे, ज्यांनी पोलीस मदत केंद्राच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मॅकवॉलचा वापर केला आहे.

सदर पोलीस मदत केंद्रात

सुरक्षा बलांच्या सुविधेसाठी वायफाय सुविधा, ०८ पोर्टा केबिन, जनरेटर शेड, पिण्याच्या पाण्यासाठी आर ओ प्लँट, मोबाईल टॉवर, टॉयलेट सुविधा, पोस्ट सुरक्षेसाठी मॅक वॉल, बीपी मोर्चा, ०८ सँन्ड मोर्चा इत्यादींची उभारणी करण्यात येत असून यासोबतच पोलीस मदत केंद्राच्या सुरक्षेसाठी गडचिरोली पोलीस दलाचे ०४ अधिकारी व ५६ अंमलदार, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १९ कुसळगांव बी कंपनीचे ०२ प्लाटून तसेच केंद्रीय राखीव पोलीस दल ९ बटालियन डी कंपनीचे ०१ असिस्टंट कमांडन्ट व ७९ अधिकारी/अंमलदार, विशेष अभियान पथकाचे ०८ पथक (२०० कमांडोज) तैनात करण्यात आले आहेत.

सदर नवीन पोलीस मदत केंद्र बिनागुंडा उभारणी उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) श्री. संदिप पाटील, पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, श्री. अंकित गोयल, केंद्रीय राखीव पोलीस बल, ९ बटा. कमांडण्ट श्री. शंभु कुमार, अपर

**उपविभाग भामरागड अंतर्गत नव्याने स्थापन झालेल्या अतिसंवेदनशील पोलीस मदत केंद्र बिनागुंडा हद्दीतील नागरिकांसाठी दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत 'पोलीस दादालोरा खिडकी' उपक्रमांतर्गत भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.**

पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक, अहेरी श्री. कार्तिक मधीरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., उपविभागीय पोलीस अधिकारी, भामरागड श्री. अमर मोहिते व पोलीस मदत केंद्राचे नवनियुक्त प्रभारी अधिकारी सपोनि रोहन पाटील, इतर अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## नवनिर्मित बिनागुंडा पोलीस मदत केंद्र येथे मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांच्या

## प्रमुख उपस्थितीत भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन

उपविभाग भामरागड अंतर्गत नव्याने स्थापन झालेल्या अतिसंवेदनशील पोलीस मदत केंद्र बिनागुंडा हद्दीतील नागरिकांसाठी दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत 'पोलीस दादालोरा खिडकी' उपक्रमांतर्गत भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

या जनजागरण मेळाव्यात पोलीस मदत केंद्र बिनागुंडा हद्दीतील नागरिकांसाठी विविध जीवनोपयोगी साहित्यांचे वितरण करण्यात आले. यामध्ये शेतकऱ्यांसाठी स्प्रे पंप, शेतीउपयोगी कामकाजाकरिता घमेले, गावात होणाऱ्या सामुदायिक कार्यक्रमांकरिता स्वयंपाकाची मोठी भांडी, वाजंत्री वाद्य वाजविणाऱ्या नागरिकांकरिता वाजंत्री साहित्य, शिलाई मशिनचे प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना शिवणयंत्र, गरजू नागरिकांना ब्लँकेट, ज्येष्ठ नागरिकांना धोतर,





महिलांसाठी साड्या, युवकांसाठी लोअर-टी-शर्ट, क्रिकेट किट, व्हॉलीबॉल व नेट, तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी सायकल, पेन, वही, शालेय बॅग, कपडे, कंपास, चॉकलेट, बिस्किट इत्यादी साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी विनोबा प्राथमिक आश्रमशाळा, बिनागुंडा येथील इयता दुसरीत शिक्षण घेणारा विद्यार्थी आदित्य पोदाडी याने उपस्थित मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते, इतर वरिष्ठ अधिकारी व नागरिकांसमक्ष महाराष्ट्र गीताचे सुरेख सादरीकरण करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी आयोजित जनजागरण मेळाव्यास उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांनी सांगितले, की नव्याने स्थापन झालेल्या पोलीस मदत केंद्राच्या माध्यमातून गडचिरोली पोलीस दल नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहील. तसेच पोलीस दलामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांनी जास्तीत जास्त घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. छत्तीसगड राज्याच्या सीमेलगत व महाराष्ट्राच्या टोकावर वसलेला बिनागुंडा परिसर भौगोलिकदृष्ट्या अतिदुर्गम असला

**कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच माओवादी कारवायांवर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने गडचिरोली जिल्ह्यातील उपविभाग हेडरी अंतर्गत वांगेतुरी येथे १७ फेब्रुवारी २०२४ रोजी पोस्टे वांगेतुरीची स्थापना करण्यात आली.**

तरी भविष्यात येथे रस्ते, आरोग्य सेवा, दळणवळण सुविधा व अन्य मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या मेळाव्यात अतिदुर्गम पोलीस मदत केंद्र बिनागुंडा हद्दीतील ५०० पेक्षा अधिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत उपस्थिती दर्शविली. यावेळी मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांनी इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलीस मदत केंद्र बिनागुंडा येथे कर्तव्यावर असणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस बल, राज्य राखीव पोलीस बल व गडचिरोली पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्यासोबत भोजन करून कर्तव्य बजावणाऱ्या सर्व जवानांचे मनोबल उंचावले.

## नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच माओवादी कारवायांवर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने गडचिरोली जिल्ह्यातील उपविभाग हेडरी अंतर्गत वांगेतुरी येथे १७ फेब्रुवारी २०२४ रोजी पोस्टे वांगेतुरीची स्थापना करण्यात आली. नवीन प्रशासकीय इमारतीस









मंजुरी मिळताच त्याचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी पोलीस स्टेशन, वांगेतुरी येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण व उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते पार पडले. सर्व आधुनिक सोयी–सुविधांनी युक्त अशा सुसज्ज असलेल्या या नवीन प्रशासकीय इमारतीमुळे अतिदुर्गम भागात कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना अधिक कार्यक्षमतेने काम करता येणार असून, नागरिकांनादेखील जलद व सुलभ पोलीस सेवा उपलब्ध होणार आहे.

## माओवादविरोधी अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व सी–६० जवानांचा सत्कार

माओवादविरोधी अभियान राबवण्याकरिता १ डिसेंबर १९९० रोजी विशेष अभियान पथक (सी–६०) या स्वतंत्र माओवादविरोधी पथकाची स्थापना करण्यात आल्यापासून जवानांनी आपल्या धैर्य, शौर्य आणि निष्ठेच्या बळावर अनेक यशस्वी कारवायांद्वारे माओवादी चळवळीला प्रभावीपणे आळा घालण्यास हातभार लावला.

**सर्व आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त अशा सुसज्ज असलेल्या या नवीन प्रशासकीय इमारतीमुळे अतिदुर्गम भागात कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना अधिक कार्यक्षमतेने काम करता येणार असून, नागरिकांनादेखील जलद व सुलभ पोलीस सेवा उपलब्ध होणार आहे.**

या अतिसंवेदनशील आणि दुर्गम भागात विशेष अभियान पथकातील जवान अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले कर्तव्य बजावत आहेत. अशाच धाडसी कामगिरीचा सन्मान करण्यासाठी पोलीस मुख्यालयातील एकलव्य सभागृह येथे सैनिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या सैनिक संमेलन कार्यक्रमाप्रसंगी २०१८ मध्ये भामरागड उपविभाग अंतर्गत कसनासूर–बोरीया परिसरात माओवाद्यांसोबतच्या चकमकीत अद्वितीय धैर्य दाखवणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा गौरव करण्यात आला. या चकमकीच्या दरम्यान विशेष अभियान पथकातील जवानांनी अतुलनीय शौर्य दाखवत माओवादी कारवायांना चोख प्रत्युत्तर दिले होते. या कामगिरीची दखल घेत एकूण ३१ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला शौर्यपदक जाहीर झाले होते. या शौर्यपदकप्राप्त अधिकारी व अंमलदारांना महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक मा. श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सभागृहात

टाळ्यांच्या गजरात या जवानांचे स्वागत करण्यात आले. तसेच या कार्यक्रमातला आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे गडचिरोली जिल्ह्यात उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या ०५ पोलीस उपनिरीक्षकांना गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने सहा. पोलीस निरीक्षक पदावर वेगवर्धित पदोन्नती देण्यात आली. या अधिकाऱ्यांचाही Pipping समारंभ मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते सदर सैनिक संमेलन प्रसंगी पार पडला.

**गडचिरोली जिल्ह्यात उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या ०५ पोलीस उपनिरीक्षकांना गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने सहा. पोलीस निरीक्षक पदावर वेगवर्धित पदोन्नती देण्यात आली. या अधिकाऱ्यांचाही** Pipping **समारंभ मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते सदर सैनिक संमेलन प्रसंगी पार पडला.**

कार्यक्रमादरम्यान मा. पोलीस महासंचालक यांनी उपस्थित विशेष अभियान पथकातील जवानांशी संवाद साधला व माओवाद विरोधी अभियानातील अडचणी, आव्हाने आणि अनुभव समजून घेतले. जवानांचे मनोबल उंचावण्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करताना ते म्हणाले, की गडचिरोली जिल्ह्यात कर्तव्य बजावताना ज्यांनी सर्वोच्च बलिदान दिले, त्या सर्व अधिकारी व जवानांचे बलिदान नेहमीच स्मरणात राहील. अवघड परिस्थितीतही तुम्ही दाखवत असलेले धैर्य आणि निष्ठा कौतुकास्पद आहे. सर्वांनी मोठे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून प्रामाणिकपणे काम करावे. कार्यक्रमाच्या अखेरीस मा. पोलीस महासंचालकांनी सर्व शौर्यपदक प्राप्त अधिकारी, पदोन्नती मिळालेले अधिकारी आणि विशेष अभियान पथकातील जवान यांना शुभेच्छा दिल्या.

या सर्व कार्यक्रमप्रसंगी मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते, अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) डॉ. छेरिंग दोरजे, विशेष पोलीस महानिरिक्षक, रा.रा.पो.ब. नागपूर परिक्षेत्र, श्री. निसार तांबोळी, विशेष पोलीस महानिरिक्षक, नक्षल विरोधी अभियान, श्री. संदिप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र श्री. अंकित गोयल, उप-महानिरीक्षक सीआरपीएफ श्री. अनिल कुमार, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक, अहेरी श्री. कार्तिक मधीरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी., सहा. पोलीस अधीक्षक धानोरा, श्री. अनिकेत हिरडे, पोलीस उपअधीक्षक (अभियान), श्री. विशाल नागरगोजे, उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड श्री. अमर मोहिते, उपविभागीय पोलीस अधिकारी हेडरी श्री. योगेश रांजणकर व इतर अधिकारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक, अहेरी श्री. कार्तिक मधीरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी., पोलीस मुख्यालय गडचिरोली, सर्व शाखांचे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले. ■


लेख

# युगस्त्री सावित्रीबाई फुले यांच्या पाऊलखुणा



प्रा. शरद मनसुख
जुन्नर

**स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले यांनी केलेले समाजसुधारणेचे कार्य महाराष्ट्राला माहीत नाही असे नाही. आज महाराष्ट्रातील स्त्री घराबाहेर पडून सन्मानाने वावरत आहे ते यांनी केलेल्या कार्यामुळेच. जागतिक महिला दिन साजरा करत असताना त्यांनी पुण्यातील भिडे वाडा, ओतुर येथे सुरू केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्याचा विसर पडू नये यासाठी केलेला हा लेखनप्रपंच...**



भारतातील पहिल्या शिक्षिका व स्त्री मुक्ती चळवळीच्या प्रणेत्या, निःस्वार्थपणे समाजातील गोरगरिबांची सेवा करणारी समाजसेविका तसेच स्त्रिया, दलितांची व निराधारांचे आश्रयस्थान असलेली युगस्त्री असे विविध गौरव व उपाधी लाभलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरातील स्त्रीमुक्ती चळवळी, विचारांना बळ व ऊर्जा देणारे आहे. जनतेचे कल्याण व न्याय हक्कांसाठी स्वराज्याचे सुंदर स्वप्न पाहणाऱ्या राजमाता जिजाऊ आणि स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात सत्यात उतरविणारे छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी असलेला किल्ले शिवनेरीचा परिसर विशेषतः जुन्नर तालुक्यातील ओतूर या भागात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे वास्तव्य होते. त्यामुळे या भागात फुले यांच्या विचारांचा प्रभाव व पगडा सतात्याने

दिसतो. युगस्त्री सावित्रीबाई फुले यांच्या कार्य व कर्तृत्वाच्या पाऊलखुणा असलेले सत्यशोधकांचे गाव म्हणजे ओतूर.

## ५ डिसेंबर १८४८ साली स्थापन झाली ओतूरची शाळा:

सर्वसामान्य व तळागाळातील घटकांपर्यत शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षण हाच समतेचा खरा पाया असून तेच समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. म्हणून प्रथमत: स्त्रिया व शुद्रातिशूद्र यांना शिक्षण देण्यासाठी महात्मा फुले यांना सावित्रीबाई फुले यांची बहुमोल साथ मिळाली.

**शुद्रांना सांगण्याजोगा।**
**आहे शिक्षण मार्ग हा।।**
**शिक्षणाने मनुष्यत्व।**
**पशुत्व हटते पहा।।**

या काव्यपंक्तीनुसार पुण्यातील बुधवारपेठेत भिडेवाडा येथे १ जानेवारी १८४८ रोजी मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्यानंतर पुढील कालावधीत पुणे परिसर व बाजूच्या जिल्ह्यात एकूण १८ शाळा सुरु केल्या. त्यामध्ये हडपसर, सासवड, शिरूर, तळेगाव ढमढेरे व पुणेसह जुन्नर तालुक्यातील ओतूर हे गाव केंद्रस्थानी होते. महात्मा फुले व सावित्रीबाईंनी अतिशय खडतर कष्ट व निःस्वार्थ त्यागवृत्तीने संपूर्ण जीवन शिक्षणासाठी वाहून घेतले. त्यापैकी चौथ्या क्रमांकाची शाळा ५ डिसेंबर १८४८ रोजी जुन्नर तालुक्यातील ओतूर या गावी सुरू केली. परिणामी साहजिकच सामान्य कुटुंबातील



मुलामुलींना शिक्षणाची दारे खुली झाली. ज्ञानाची गंगा घरोघरी पोहोचली. त्याची प्रचिती आजही ओतूर गावात गेल्यावर येते. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शाळेत साधारणपणे तीनशे मुली आज शिक्षण घेत आहेत. ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असणारे ओतूर हे गाव असून गावातील लोकांना शिक्षणाने मिळालेल्या ज्ञानामुळे ते खऱ्या अर्थाने समृद्ध झाले. त्यामुळे आज शिक्षकांचे गाव म्हणून ओतूरची विशेष ओळख आहे.

## १८७६ - ७७ च्या दुष्काळातील मानवतावादी कार्ये:

**'सुख दुःख काही नाही**
**स्वार्थपणा।**
**परहित पाही तोच थोर।।**
**मानवाचे नाते ओळखती जे**
**ते।**
**सावित्री वदते तेच संत।।**

सावित्रीबाई फुलेंच्या या कवितेमधून मानवता धर्म व संत यांच्या विषयी साध्या सोप्या भाषेत त्यांनी वर्णन केले आहे. तसेच दुष्काळात सर्वसामान्यांना मानवतेच्या भावनेतून मोठी मदत केली.

**झाडे झुडपे वाळून जाती।**
**उजाड झाला सर्व देश।।**
**गुरे मरती रानावनात।**
**माणसे मरून पडती घरात।।**
**त्यांची प्रेते कुजून जाती।**
**जिकडे तिकडे दुर्गंधी।।**

या स्वतःच्या काव्यातून सावित्रीबाई फुले यांनी दुष्काळाच्या भयानकतेचे वास्तववादी वर्णन केले आहे.

१८७६–७७ कालखंडात महाराष्ट्रात अतिशय भयानक दुष्काळ पडलेला होता. त्यात जुन्नर व ओतूर परिसरात दुष्काळाची परिस्थिती खूपच गंभीर होती. मुकी जनावरे चाऱ्याविना मरत होती. तसेच सर्वसामान्य गरिबांची अवस्था दयनीय होती. ही परिस्थिती पाहून महामा फुले व सावित्रीबाई फुले हे गोरगरीबांच्या मदतीला पुढे आले. आपल्या सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने गावोगावी जाऊन दुष्काळ मदतनिधी गोळा केला. आश्रयास आलेल्या व निराधार झालेल्या

जनतेसाठी सावित्रीबाई फुलेंच्या पुढाकाराने व शास्त्री नारोबाबाजी महाधट पानसरे पाटील व भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील यांच्या विशेष सहकार्याने पंचावन्न ठिकाणी अन्नछत्र ओतूरसह इतर परिसरात उघडली व दुष्काळाच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी ओतूर येथे दुष्काळ निवारण समित्या स्थापन केल्या. २० एप्रिल १८७७ साली महात्मा फुले यांना ओतूरवरून सावित्रीबाईंनी पत्र लिहून दुष्काळाची तीव्रता सांगितली. या पत्राद्वारे महात्मा फुले व सत्यशोधक चळवळीच्या कार्याविषयी ओतूरकरांना खूपच आस्था व आदर असल्याचे दिसून येते. या दुष्काळात सावित्रीबाई या काही दिवस ओतूर येथे वास्तव्यास होत्या. त्यांनी भयानक दुष्काळ परिस्थितीत मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवून गरीब व सामान्य जनतेस मोठी मदत केली. त्यामुळे ओतूर व जुन्नर परिसरातही सत्यशोधक चळवळीने जोर धरला व ती तळागाळापर्यंत पोहोचली व ओतूर हेच पुढे सत्यशोधक चळवळीचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले गेले.

### केशवपन विरोधात नाभिक बांधवांचा संप:

केशवपन हा भारतीय समाजव्यवस्थेतील विषमतेचा एक विकृत चेहरा बनला होता. विधवांच्या केशवपनाच्या या अनिष्ट प्रथेमुळे सावित्रीबाईंचे मन हेलावून गेले. त्यांनी ही स्त्रियांची दुरवस्था महात्मा फुले यांना प्रत्यक्ष बोलून दाखविली आणि ज्योतिबांनी विधवांचे केशवपन ही अतिशय क्रूर प्रथा बंद करण्यासाठी व या अनिष्ट रूढीतून महिलांवर केल्या जाणाऱ्या अन्यायाचे स्वरूप नाभिक बांधवांना समजावून सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. फुलेंना कामगार नेते व दीनबंधूचे संपादक नारायण लोखंडे यांची मोलाची साथ मिळाली व अखेर १४ एप्रिल १८९० मध्ये एल्फिन्स्टन हॉलजवळ कॅम्प मैदानात सर्व नाभिक बांधवांची सभा झाली. या सभेसाठी मुंबई, वाई, पुणेसह ओतूर, जुन्नर या परिसरातील हजारो नाभिक बांधव एकत्र आले. यावेळी स्त्रीपुरुष समानता व सामाजिक समता या संकल्पनेतून हा ऐतिहासिक संप केशवपन प्रथेविरुद्ध झाला व ही अनिष्ट प्रथा सावित्रीबाई फुले यांच्या मानवतावादी विचार व निर्धाराने कायमची बंद झाली.

### महात्मा फुले यांची प्रथम पुण्यतिथी ओतूर मध्ये:

१८९१ शास्त्री महाधट पानसरे पाटील यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित अमर जीवन हा ग्रंथ महात्मा फुले यांच्या प्रथम स्मृतीदिनी १५ नोव्हेंबर १८९१ मध्ये ओतूर गावी पांढरी मारुती मंदिरात झालेल्या कार्यक्रमात प्रकाशित केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील हे होते. सावित्रीबाईही या प्रसंगी उपस्थितीत होत्या.

२८ नोव्हेंबर १८९० या दिवशी महात्मा फुले यांचे देहावसान झाले. त्यानंतर त्यांचे विचार व कार्य कुठेही खंडित न करणे हेच सावित्रीबाईंच्या उर्वरित आयुष्याचे मुख्य ध्येय होते. त्यासाठी महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळीची सर्व जबाबदारी त्यांनी आपल्या खांद्यावर घेत ती समर्थपणे सांभाळली. ही जबाबदारी पेलताना सावित्रीबाईंबरोबर फुल्यांचे निष्ठावंत अनुयायी व कार्यकर्ते सदैव त्यांच्यासमवेत राहिले. त्यामध्ये भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील, धर्माजी डुंबरे व मारुती नवले हे प्रमुख सहकारी भक्कमपणे सावित्रीबाई फुले यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यांनी चळवळीच्या शाखा गावोगावी निर्माण केल्या.


ओतूरमधील भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील व बाळाजी कुसाजी डुंबरे, जलसाकार व शाहीर भिमराव महामुनी व धर्माजी रामजी डुंबरे यांनी सत्यशोधक चळवळीस मोठे योगदान दिले. नंतर भारताच्या स्वांतत्र्योत्तर कालखंडात या संपूर्ण सत्यशोधक चळवळीचा विचार व वारसा जपत विलास तांबे यांनी अखिल भारतीय सत्यशोधक चळवळीचे ३६ वे अधिवेशन ओतूर या ठिकाणी घेतले. ■




ऐश्वर्या साळवी
फिजिओथेरपिस्ट
मुंबई

# महिलांनो, सावधान!
# चालताना त्रास होतोय?

अलीकडील काळात, ४५ वर्षांवरील महिलांमध्ये ऑस्टियोआर्थरायटिस (OA) ही समस्या वाढलेली दिसत आहे. अनेक महिलांना गुडघ्यांमध्ये वेदना आणि सांध्यांमध्ये कडकपणा ही लक्षणे जाणवतात. जिने चढताना त्रास होतो किंवा जास्त वेळ बसल्यावर अस्वस्थता जाणवते. वय वाढणे हे






नैसर्गिक आहे, पण सांध्यांची झीज होणे ही दुर्लक्ष करण्याची बाब नाही.

## ऑस्टियोआर्थरायटिस म्हणजे काय?

ऑस्टियोआर्थरायटिस हा एक सांध्यांचा विकार आहे ज्यात हाडांमधील संरक्षक कूर्चा हळूहळू घासल्या जाऊन त्यांची झीज होते. यामुळे वेदना, सूज, कडकपणा आणि हालचालींमध्ये अडचण ही लक्षणे दिसतात. गुडघे, कंबर, हात आणि पाठीचा कणा हे या विकाराने सर्वाधिक प्रमाणात ग्रस्त होतात.

## ४५ वर्षांवरील महिलांना जास्त धोका कशामुळे?

### हॉर्मोन्समध्ये होणारे बदल (मेनोपॉज)

४५ नंतर, एस्ट्रोजेनची पातळी कमी होऊ लागते. एस्ट्रोजेन हे हाडांची घनता आणि सांध्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. एस्ट्रोजेनची पातळी कमी झाल्यामुळे शरीरांतर्गत दाह वाढतो आणि कूर्चांची झीज होते.

### कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी ची कमतरता

अनेक महिलांमध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी ची पातळी कमी असते. यामुळे हाडे कमकुवत होतात आणि सांध्यांची ताकद कमी होते.

### वजन वाढणे

चाळिशीच्या नंतर चयापचयाचा वेग मंदावतो आणि वजन वाढते. हे अतिरिक्त वजन गुडघ्यांच्या सांध्यांवरचा दाब वाढवते, व यामुळे कूर्चांची जलदगतीने झीज व्हायला लागते.

### निष्क्रिय जीवनशैली

नियमित व्यायामाचा अभाव असेल तर त्यामुळे सांध्यांभोवतीचे क्वाड्रिसेप्ससारखे स्नायू कमकुवत होतात. यामुळे सांध्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

### जुनी इजा

जुनी लिगामेंट इजा, फ्रॅक्चर

किंवा अयोग्य रिहॅबिलिटेशनमुळे लवकर ऑस्टियोआर्थरायटिस होण्याचा धोका वाढतो.

### आनुवंशिकता

सांध्यांच्या आजारांचा कौटुंबिक इतिहास असल्यास हा विकार होण्याची शक्यता वाढते.

## सामान्य लक्षणे

- जिने चढताना गुडघ्यांमध्ये वेदना
- सकाळी १५-२० मिनिटांपेक्षा जास्त काळ सांध्यांमध्ये जाणवणारा कडकपणा
- सांध्याभोवती सूज
- गुडघ्यांमध्ये कडकड असा आवाज (क्रेपिटस)
- लवचिकता कमी होणे

## खबरदारी आणि प्रतिबंधात्मक उपाय

### १. वजन नियंत्रणात ठेवा

फक्त ५-७ किलो वजन कमी केल्याने गुडघ्याच्या सांध्यांवरील भार खूप कमी होतो.

### २. स्नायू बळकट करणारे व्यायाम आवर्जून नियमितपणे करा

यात क्वाड्रिसेप्स मजबूत करणे, हॅमस्ट्रिंग स्ट्रेचिंग, कंबर मजबूत करणारे व्यायाम तसेच कोअर व्यायाम यांचा समावेश करता येतो. फिजिओथेरपिस्टच्या मार्गदर्शनाखाली हे व्यायाम शिकून घेऊन मग केल्यास अधिक चांगले.

### ३. सक्रिय राहा

जास्त वेळ एकाच जागी बसणे टाळा. त्याऐवजी आपल्या दिनचर्येत पुढील गोष्टी समाविष्ट करा:

- ३० मिनिटे जलद चालणे
- सायकलिंग
- पोहणे

### ४. पुरेसा पोषक आहार घ्या

- आहारात कॅल्शियमयुक्त पदार्थ (दूध, ताक, नाचणी, तीळ) यांचा समावेश करा.
- व्हिटॅमिन डी (दररोज १५-२० मिनिटे सूर्यप्रकाश)
- स्नायूंच्या ताकदीसाठी प्रोटीन
- दाह कमी करणारे पदार्थ (हळद, मनुके, बिया) आहारात समाविष्ट करा.

### ५. सांध्यांवर जास्त ताण येईल अशा हालचाली टाळा

वेदना असल्यास जास्त जिने चढणे, उडी मारणे किंवा खूप वेळ पाय दुमडून बसणे टाळा.

### ६. शक्य तितक्या लवकर फिजिओथेरपिस्टची मदत घ्या

मॅन्युअल थेरपी, स्नायू बळकट करणे, पोश्चरमध्ये सुधारणा करणे, इलेक्ट्रोथेरपी यांमुळे विकार बळावण्याचा दर कमी होतो आणि जीवनाची गुणवत्ता सुधारते.

## डॉक्टरांना कधी भेट द्यावी?

- २ ते ३ आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत वेदना होत असल्यास
- चालण्यात अडचण येत असेल तर
- सूज आणि तीव्र कडकपणा असेल तर

लवकरात लवकर वैद्यकीय सल्ला घ्यावा. वेळीच केलेल्या व्यवस्थापनामुळे अनेक प्रकरणांमध्ये शस्त्रक्रियेची गरज भासत नाही.

थोडक्यात सांगायचे तर, ऑस्टियोआर्थरायटिस म्हणजे फक्त 'वाढत्या वयामुळे होणारी वेदना' नाही. लवकर हाताळले तर ही नियंत्रणात ठेवता येण्यासारखी असते. ४५ वर्षांवरील महिलांनी हृदयाच्या आरोग्यासारखे सांध्यांच्या आरोग्यालाही प्राधान्य द्यावे. जीवनशैलीतले योग्य ते बदल, पोषण आणि फिजिओथेरपी यांमुळे वर्षानुवर्षे हालचाल आणि स्वावलंबन टिकवता येते. ■



अनघा पाटील
पोलीस महासंचालक
कार्यालय, मुंबई.
महाराष्ट्र राज्य

# बाईपण कालपण, आजपण आणि उद्यापण...



'जिचे हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धरी' या ओळींद्वारे स्त्रीमध्ये असलेल्या सामर्थ्याची कल्पना येते. कालपरवापर्यंत पाळण्याची दोरी असलेले हात कालांतराने अधिक सशक्त होऊन कमावते आणि कुटुंबियांसाठी भक्कम आधार बनले आहेत. अशाच 'त्यां' च्या आजपर्यंतच्या हक्कांसाठी केलेल्या संघर्षाचे महत्त्व लेखात विषद करण्यात आले आहे.

बाईपण म्हटले, की डोळ्यांच्या समोर प्रतिमा येते ती कोमल, नाजूक अशा स्त्रीची आणि आठवते ती आई, ताई, पत्नी, मैत्रीण, लाडीक अशी मुलगी आणि सगळे लाड पुरवणारी आजी.

किती ही रूपे तिची... लोभस, निरागस, सृष्टीचा सर्वात सुंदर आविष्कारच जणू... माणसात स्त्री असते तशीच निसर्गातसुद्धा अनेक रूपांमध्ये ती साकार होते. कधी डोळे भरून निसर्गाकडे पाहिल्यास जाणवते... आपल्यासारख्या शिणलेल्या कित्येकांना नदी, मंद सावली देणारी वल्लरी, पोसणारी माती अशा अनेक रूपांत ही सृष्टी आपलेसे करते.

'रांधा, वाढा, उष्टी काढा' हा दिनक्रम या व्यक्तिविशेषाच्या कपाळावर कधीकाळीपासून अनामिकपणे रेखला गेलाय हे खरे, पण या स्त्रीच्या अस्तित्वाला साजरे करण्यासाठी जागतिक स्तरावर ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून पाळला जातो. ८ मार्चच का? तर याची मुळे आपल्याला अमेरिका, युरोप व रशियाच्या इतिहासात आढळतात. त्याचे झाले असे, की १९ व्या शतकाच्या मध्यात अमेरिकेत उदयास आलेल्या चळवळीत एलिझाबेथ कँडी स्टँटन व लुक्रेटिया मोट या महिलांनीदेखील सहभाग नोंदवला होता. परंतु अमेरिकेत पार पडलेल्या anti slavery movement मध्ये त्यांना मत मांडण्याचा अधिकार नाकारण्यात आला. त्यामुळे या दोघींच्या नेतृत्वात दरवर्षी फेब्रुवारीच्या शेवटच्या रविवारी महिलांच्या विविध मागण्यांसंदर्भात आंदोलन करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. या आंदोलनाचे फलित म्हणून अमेरिकेच्या श्वेतवर्णी महिलांना १९२० पासून, तर इतर सर्वांना १९६५ पासून मतदानाचा अधिकार मिळाला. १९१० साली, युरोपमधील कोपनहेगन, डेन्मार्क येथे दुसरी International conference on working

> **माणसात स्त्री असते तशीच निसर्गातसुद्धा अनेक रूपांमध्ये ती साकार होते. कधी डोळे भरून निसर्गाकडे पाहिल्यास जाणवते... आपल्यासारख्या शिणलेल्या कित्येकांना नदी, मंद सावली देणारी वल्लरी, पोसणारी माती अशा अनेक रूपांत ही सृष्टी आपलेसे करते.**



women पार पडली. या परिषदेचे अध्यक्षपद होते Grandmother of communism म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्लारा झेटकीन यांच्याकडे. याच परिषदेत त्यांनी जागतिक महिला दिनाची संकल्पना मांडली. तसेच रशियामधील कामगार संघटनांसोबत तेथील महिलांनीदेखील पहिल्या जागतिक महायुद्धाच्या काळात वाढती महागाई, कामाच्या ठिकाणी मिळणारी दुय्यम वागणूक या व अशा विविध कारणांस्तव झारशाहीविरूद्ध आंदोलने केली. या आंदोलनांनी झारशाहीच्या पाडावात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसून येते.

या घटनांची परिणती म्हणून संयुक्त राष्ट्रांनी १९७५ मध्ये ८ मार्च हा दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून घोषित करण्याचा ठराव संमत केला. या ठरावाची अंमलबजावणी १९७७ पासून करण्यात आली. हा दिवस महिलांनी स्वतः व स्वत:च्या हक्कांसाठी मिळवला हे तितकेच महत्त्वाचे...

हे झाले जगभराचे. आपण आपल्या भारतभूमीच्या संस्कृतीत पण एक नजर फिरवून घेऊ की मग! इतिहासाच्या पानांनी भारतातल्या स्त्रीला देवीचे स्थान दिले आहे. तिचे रूप प्रकृतीपासून ते जीवनदायिनीपर्यंत सर्वत्र पूजनीय आहे. भारतीय स्त्री ही गार्गी, मैत्रेयी यांसारख्या पांडित्यसंपन्न स्त्रियांचा वारसा घेऊन जन्मास येते. मधल्या गुलामगिरीच्या काही शतकांनी तिच्या अस्तित्वास ग्रहण लावण्याचा प्रयत्न केला खरा, पण ज्योतिराव व सावित्रीबाई यांच्या रूपाने पुन्हा अ, आ, इ, ई गिरवण्यासाठी तिला क्रांतीज्योती लाभली. आता तोच वसा घेऊन भारतीय स्त्री सर्व क्षेत्रात अग्रगण्य आहे. ग्रामपंचायतीतील सरपंच पदापासून ते राष्ट्रपतीपदापर्यंत आणि सीमेवर तैनात सैनिकांपासून ते अंतराळात पाउलखुणा उमटवण्यापर्यंत तिने गगनभरारी घेतली आहे. खरे

संयुक्त राष्ट्रांनी १९७५ मध्ये ८ मार्च हा दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून घोषित करण्याचा ठराव संमत केला. या ठरावाची अंमलबजावणी १९७७ पासून करण्यात आली. हा दिवस महिलांनी स्वतः व स्वत:च्या हक्कांसाठी मिळवला हे तितकेच महत्त्वाचे.

पाहता, कोणतेही पद हे gender biased नसते आणि हे स्त्रियांनी वेळोवेळी केलेल्या कामगिरीवरून सिद्धही करून दाखवले आहे. खऱ्या अर्थाने हे उन्नत, प्रगतीशील राष्ट्राचे प्रतिक असल्याचे म्हणता येईल.

शेवटच्या काही आवडलेल्या ओळी अशा,

**कुठे शोधायचा महिला**
**दिन?**
**कुटुंबासाठी स्वतःच्या**
**स्वप्नांवर पाणी फेरणाऱ्या**
**कुटुंब वत्सल स्त्रीमध्ये,**
**की घर आणि नोकरी**
**दोन्ही फ्रंट लीलया पेलणाऱ्या**
**रणरागिणीमध्ये..?**

**कुठे शोधायचा महिलादिन**
**गर्भाशयातून बाईपण**
**घेऊन घेणाऱ्या बालिकेत,**
**की आयुष्याच्या संध्याकाळी**
**सगळ्यांची मनं जपून संसार**
**करून थकलेल्या, थरथरणाऱ्या**
**हातात...**

**महिलादिनाचा शोध घेताना**
**कधी होते घुसमट जिवाची ..**
**कधी वाटते भीती**
**आजची असुरक्षितता पाहता..**
**कधी होते चीडचीड तिची**
**क्षमता असुन डावललं जातं**
**तेव्हा ..**

**कधी दाटतो कंठ**
**तिची उंचच भरारी पाहून..**
**या सर्व कोलाहालातून पुरून**
**उरतं ते बाईचं बाईपण**
**कालपण, आजपण आणि**
**उद्यापण.. ▪**



डॉ. अनिल शर्मा
बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई

# हिवाळ्यात हार्ट अटॅक का वाढतात?



भारतासारख्या उष्ण / समशीतोष्ण कटिबंधीय देशांमध्ये हिवाळा अनेकदा कमी कालावधीचा आणि सौम्य असतो. हे हवामान कडक उन्ह किंवा मुसळधार पावसाच्या तुलनेत 'सुरक्षित' मानले जाते. मात्र, देशभरात याच ऋतूमध्ये आजकाल एक चिंताजनक ट्रेंड पाहायला मिळत आहे: थंडीच्या दिवसांत हार्ट अॅटॅकचे प्रमाण वाढत आहे, आणि अगदी अशा ठिकाणीही जिथे हिवाळा फारसा तीव्र नाही.

## थंड हवामान आणि हृदयाचे आरोग्य

हवामान थंड असताना, शरीरातली उष्णता/ ऊर्जा कायम टिकवण्यासाठी



रक्तवाहिन्या नैसर्गिकरित्या आकुंचन पावतात. यामुळे रक्तदाब वाढतो आणि हृदयाला जास्त मेहनत करावी लागते. थंड हवामान रक्ताचा दाटपणा वाढवते आणि असे रक्त जास्त सहजपणे गोठू शकते. त्यामुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होऊन हार्ट ॲटॅक येण्याचा किंवा स्ट्रोकचा धोका वाढतो.

याशिवाय, थंड हवा धमन्यांमध्ये आकस्मिक आकुंचन निर्माण करू शकते, ज्यामुळे हृदयाच्या स्नायूंचा रक्तपुरवठा कमी होतो. ज्यांना आधीच कोलेस्टेरॉल ब्लॉकेज, उच्च रक्तदाब, मधुमेह आहे किंवा जे धूम्रपान करतात, त्यांच्यासाठी हे धोकादायक ठरू शकते.

### आपल्या देशात याचा धोका कशामुळे?

आपल्या देशातली घरे थंड हवामानासाठी डिझाइन केलेली नाहीत. अनेक लोक हिवाळ्यात हीटर, गरम कपडे किंवा योग्य अंथरुण पांघरुण वापरत नाहीत. शिवाय सकाळी लवकर स्नान करणे, कामावर जाणे, बाहेर फिरणे या क्रियांमधूनही शरीराला थंडीचा सामना करावा लागतो.

### हिवाळा हा असा ऋतू आहे जेव्हा लोक:

- कमी व्यायाम करतात
- सण समारंभ, सहली, सोशल गॅदरिंग अशा माध्यमांमधून जास्त जड, नमकीन, गोड, तळलेले पदार्थ खातात आणि वजन वाढवतात
- नियमित औषधे घेण्याकडे दुर्लक्ष करतात
- जास्त प्रमाणात श्वसनाच्या संसर्गाला बळी पडतात.

हे सर्व घटक एकत्र येऊन, हृदयावरचा ताण आणि परिणामी हार्ट ॲटॅकचा धोका वाढवतात.

### हिवाळ्यात हार्ट ॲटॅकचा धोका कुणाला जास्त?

- वृद्ध व्यक्ती
- हृदयरोग असलेले किंवा यापूर्वी हार्ट ॲटॅक येऊन गेलेले/ तसा इतिहास असलेले रुग्ण

- उच्च रक्तदाब किंवा मधुमेह असलेले रुग्ण
- धूम्रपान करणारे
- जास्त प्रमाणात मद्यसेवन करणारे

## हृदयाच्या सुरक्षिततेसाठी सोपे उपाय

हिवाळ्यातला हृदयविकाराचा झटका टाळता येऊ शकतो. त्यासाठी खालील गोष्टी लक्षात असू द्या.

- शरीराला उबदार ठेवा, विशेषतः सकाळी लवकर आणि रात्री उशिरा. (सूर्योदयाआधी व सूर्यास्तानंतर)
- अचानक थंड पाण्याच्या संपर्कात येणे टाळा.
- हृदयविकार आणि रक्तदाबाच्या औषधांचे सेवन स्वत:च्या मनाने थांबवू नका.
- पचायला जड अन्न, तळलेले पदार्थ, गोड पदार्थ आणि खारट चमचमीत पदार्थ अतिप्रमाणात खाणे टाळा.
- घरातल्या घरात हलका व्यायाम सुरू ठेवा.
- छातीत दुखणे, श्वास लागणे किंवा एकदम घाम येणे अशी लक्षणे दिसल्यास ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या.

अगदी हलकी थंडीदेखील हृदयासाठी धोकादायक ठरू शकते. जागरूकता, वेळीच घेतलेली काळजी आणि जीवनशैलीतले साधेसोपे बदल यांनी हिवाळ्यात येणारे अनेक हार्ट ॲटॅक टाळता येऊ शकतात. ■

# तुझे अस्तित्व आणि मी

तुझ्या गर्भात रेखाटली,
तू माझी मूर्तिमंत काया.
कसा विसरेन गं आई,
मी तुझी आभाळाएवढी माया...

तू आली माझ्या जीवनी,
होऊन अर्धांगिनी,
नाते तुझे अन् माझे,
जसे मी दीप तू वाती

तू हळवी पण सोशिक,
मी खोडील पण लाघट,
आयुष्यात माझ्या ताई,
तूच एक आधारवट

अलगद चिमुकल्या पावलांनी,
तू स्वर्गीची सुख घेऊनी,
तू मुलगी झाली माझी,
माझे स्वप्न रेखाटूनी

तू नाही जीवनी
असे उरले काहीच नाही,
तुझ्या अस्तित्वास आज वाहतो
मी सुमनांजली, या महिलादिनी




**बाळकृष्ण ठाणगे**
अहिल्यानगर



सुनिल पाटील
कोल्हापूर

# जागतिक महिला दिन
# कर्तृत्व, संघर्ष आणि समतेकडे वाटचाल

आज स्त्री सन्मानाने वावरताना अनेक ठिकाणी दिसते. राजकारण, उद्योग, संरक्षण, शिक्षण, साहित्य अशा अनेक क्षेत्रांत महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना आढळतात. पण स्त्रियांना हे स्थान मिळवण्यास प्रदीर्घ काळ संघर्ष करावा लागला आहे. त्याच इतिहासाचे पुनरावलोकन या लेखात केले आहे.




दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा होणारा जागतिक महिला दिन हा केवळ एक औपचारिक दिनविशेष किंवा शुभेच्छांचा, फुलांचा किंवा औपचारिक कार्यक्रमांचा नसून, तो स्त्रीच्या शतकानुशतकांच्या संघर्षाचा, अपार कर्तृत्वाचा, समाजरचनेतील निर्णायक योगदानाचा, अपराजित जिद्दीचा आणि तिने समाजाच्या सर्व स्तरांवर उमटवलेल्या अमीट ठशाचा जागतिक स्वीकार आहे. महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय कामगिरीचा गौरव करताना ८ मार्च आपल्याला आत्मपरीक्षणाची आणि पुनर्नवीन संकल्पांचीही संधी देतो. हा दिवस अजूनही अस्तित्वात असलेल्या

असमानतेविरुद्ध जागरूकता निर्माण करण्याचा एक महत्त्वाचा मंच ठरतो.

## समाजघडणीत स्त्री- मूक आधारापासून निर्णायक शक्तीपर्यंत

समाजाच्या पायाभरणीत स्त्रीचे योगदान नेहमीच मूलभूत राहिले आहे. कुटुंबसंस्थेची शिस्त, संस्कारांची जपणूक, मूल्यांची जोपासना याबरोबरच सामाजिक सुधारणांच्या चळवळीतही स्त्री अग्रभागी राहिली आहे. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, बालकल्याण, महिला सबलीकरण, स्वयंसेवी संस्था, ग्रामविकास अशा क्षेत्रांमध्ये महिलांनी केवळ सहभागच नव्हे, तर नेतृत्वही साकारले आहे. स्त्री ही समाजाची केवळ घटक नसून, समाजरचनेची मूलभूत शक्ती आहे. कुटुंबसंस्थेपासून ते सामाजिक सुधारणांपर्यंत स्त्रीचे योगदान बहुआयामी आहे.

भारतीय समाजात सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, अहिल्याबाई होळकर, पहिल्या महिला डॉक्टर डॉ. आनंदीबाई जोशी यांसारख्या स्त्रियांनी आपल्या कार्यातून सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवली. आजही ग्रामीण व शहरी भागांमध्ये असंख्य महिला सामाजिक अन्याय, अंधश्रद्धा, हिंसा आणि भेदभावाविरुद्ध ठामपणे उभ्या आहेत. आजच्या काळातील सामाजिक कार्यकर्त्यांपर्यंत हे कार्य अव्याहत सुरू आहे. शिक्षण, आरोग्य, समाजसेवा, स्वयंसेवी संस्था, ग्रामविकास, महिला बचतगट, बालकल्याण, अपंग पुनर्वसन अशा अनेक क्षेत्रांमध्ये महिलांनी परिवर्तनाची चळवळ उभी केली आहे. स्त्रीने समाजाला नवी दिशा दिली आहे. बालविवाह, हुंडा, स्त्रीशिक्षणाचा अभाव, लैंगिक भेदभाव याविरुद्ध उभा राहणारा स्त्रीचा आवाज

> **शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, बालकल्याण, महिला सबलीकरण, स्वयंसेवी संस्था, ग्रामविकास अशा क्षेत्रांमध्ये महिलांनी केवळ सहभागच नव्हे, तर नेतृत्वही साकारले आहे. स्त्री ही समाजाची केवळ घटक नसून, समाजरचनेची मूलभूत शक्ती आहे.**

आज जागतिक स्तरावर सामाजिक न्यायाचा कणा बनला आहे. स्त्रीचा हा सामाजिक हस्तक्षेप समाजाला अधिक संवेदनशील आणि न्यायप्रिय बनवत आहे.

## आर्थिक स्वावलंबन- स्त्री सक्षमीकरणाचा कणा

एके काळी आर्थिक निर्णयप्रक्रियेतून वंचित ठेवलेली स्त्री आज अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक बनली आहे. शेती, उद्योग, व्यापार, बँकिंग, शिक्षण, आरोग्य, स्टार्टअप्स, स्वयंरोजगार, महिला बचतगट सर्वच क्षेत्रांमधले महिलांचे योगदान निर्णायक ठरत आहे.

महिला उद्योजक आणि स्वयं–सहायता गटांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा दिली आहे. स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली, की कुटुंब, समाज आणि राष्ट्राची प्रगती अधिक समतोल होते हे अनुभवाने सिद्ध झाले आहे. जागतिक महिला दिन हा या मेहनतीचा, चिकाटीचा आणि आत्मनिर्भरतेचा सन्मान करणारा दिवस आहे.

एक काळ असा होता, की स्त्रीला आर्थिक व्यवहारांपासून दूर ठेवले जात होते. परंतु आजची स्त्री आर्थिक स्वावलंबनाचा नवा इतिहास लिहित आहे. शेती, उद्योग, व्यापार, बँकिंग, स्टार्टअप्स, स्वयंरोजगार, सूक्ष्म उद्योग, सहकार क्षेत्र यांमधील सर्वत्र महिलांची उपस्थिती केवळ सहभागापुरती मर्यादित राहिली नसून, नेतृत्वाच्या भूमिकेत ती ठळकपणे दिसून येते.

महिला उद्योजक, महिला शेतकरी, तसेच स्वयं–सहायता गटांतील महिला या आज ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा बनल्या आहेत.

## संस्कृतीची निर्मिती करणारी स्त्री

संस्कृती ही समाजाची ओळख असते आणि त्या ओळखीला भावनिक खोली देण्याचे कार्य स्त्रीने नेहमीच केले आहे. साहित्य,

संगीत, नृत्य, चित्रकला, नाट्य, चित्रपट, लोककला अशा क्षेत्रांमध्ये महिलांनी आपल्या सर्जनशीलतेने संस्कृतीला नवे अर्थ दिले.

स्त्री लेखनाने तिच्या अनुभवांना शब्द दिले, वेदना, संघर्ष, स्वप्ने आणि प्रश्न समाजासमोर निर्भीडपणे मांडले. त्यामुळे सांस्कृतिक संवाद अधिक प्रगल्भ, समतावादी आणि मानवी झाला. आजची स्त्री केवळ संस्कृती जपणारी नाही, तर संस्कृती घडवणारी, बदलणारी, प्रश्न विचारणारी आहे आणि त्यातूनच नवे मूल्यप्रवाह निर्माण करणारी शक्ती अशी तिची ओळख बनली आहे.

संस्कृती म्हणजे समाजाचा आत्मा! आणि त्या आत्म्याला संवेदनशीलता देण्याचे कार्य स्त्रीने कायमच केले आहे.

### राजकारणातील स्त्री- प्रतिनिधित्वापासून नेतृत्वापर्यंत

राजकारण हे दीर्घकाळ पुरुषप्रधान मानले गेले असले, तरी महिलांनी या क्षेत्रातही आपली निर्णयक्षमता, दूरदृष्टी आणि नेतृत्वगुण सिद्ध केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते संसद आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांपर्यंत आज महिलांची उपस्थिती वाढलेली दिसत आहे. त्यांची भूमिका दिवसेंदिवस अधिक ठळक होत आहे.

महिला नेत्या सामाजिक प्रश्नांवर अधिक संवेदनशील निर्णय घेताना दिसतात. शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण, पोषण, स्वच्छता, सामाजिक सुरक्षा यांसारख्या विषयांना राजकीय प्राधान्य मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. स्त्रीचा राजकीय सहभाग लोकशाहीला अधिक समावेशक बनवत आहे.

महिला राजकीय नेत्या या केवळ लोकप्रतिनिधी राहिलेल्या नसून त्या सामाजिक प्रश्नांवर संवेदनशील निर्णय घेणाऱ्या, विकासाभिमुख धोरणे राबवणाऱ्या आणि लोकशाहीला समतावादी बनवणाऱ्या ठरल्या आहेत. महिला आरक्षण, स्त्री-सुरक्षा, शिक्षण, आरोग्य, पोषण, बालकल्याण यांसारख्या विषयांना राजकीय अजेंड्यावर स्थान मिळवून देण्यात महिलांचा मोलाचा वाटा आहे.

> **स्त्री लेखनाने तिच्या अनुभवांना शब्द दिले, वेदना, संघर्ष, स्वप्ने आणि प्रश्न समाजासमोर निर्भीडपणे मांडले. त्यामुळे सांस्कृतिक संवाद अधिक प्रगल्भ, समतावादी आणि मानवी झाला. आजची स्त्री केवळ संस्कृती जपणारी नाही, तर संस्कृती घडवणारी, बदलणारी, प्रश्न विचारणारी आहे.**

### उत्सवाबरोबरच आत्मपरीक्षण

जागतिक महिला दिन हा केवळ गौरवाचा उत्सव नसून, समाजाने स्त्रीला समान संधी, सुरक्षितता, सन्मान आणि निर्णयस्वातंत्र्य खरोखर मिळते आहे का? तिच्या श्रमाचे योग्य मूल्यांकन होते आहे का? तिच्या आवाजाला ऐकले जाते का? हे प्रश्न स्वतःला विचारण्याचा दिवस आहे.

### निष्कर्ष

स्त्री ही सन्मानाचीच नव्हे, तर सामर्थ्याची प्रतिमा आहे. तिच्या सामाजिक सहभागाशिवाय समाज अपूर्ण आहे. आर्थिक योगदानाशिवाय विकास अधुरा आहे, सांस्कृतिक संवेदनशीलतेशिवाय संस्कृती निर्जीव आहे आणि राजकीय सहभागाशिवाय लोकशाही दुर्बल आहे.

म्हणूनच, जागतिक महिला दिन हा स्त्रीच्या कार्याचा गौरव करतानाच समताधिष्ठित आणि न्याय्य समाजनिर्मितीची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा दिवस आहे. स्त्रीचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान ही जाणीव रुजवणे हाच या दिनाचा खरा अर्थ आहे. ■



सुरेश वांदिले
मुंबई

# मुलींनो, उद्योजक व्हा!

**राज्यातील अधिकाधिक महिलांनी उद्योजकतेकडे वळावे, यासाठी ‘महिला उद्योजकता कक्ष (विमेन्स आंत्रप्रिन्युअरशिप सेल)’ हा कक्ष विशेष प्रयत्नशील आहे. सार्वजनिक आणि खाजगी या दोन्ही क्षेत्रांमार्फत एकाच व्यासपीठावरून महिलांपर्यंत उद्योजकीय कल्पना पोहोचवण्याच्या दृष्टीने केलेल्या उपायांमुळे महिला उद्योजक आणि सहभागी संस्थांमध्ये उत्तमोत्तम संकल्पनांची देवाणघेवाण होत आहे.**



महाराष्ट्र राज्य इनोव्हेटिव्ह सोसायटीने, ‘महिला उद्योजकता कक्ष (विमेन्स आंत्रप्रिन्युअरशिप सेल)’ ची स्थापना केली आहे. राज्यातील अधिकाधिक महिलांनी उद्योजकतेकडे वळावे, यासाठी या कक्षामार्फत विशेष प्रयत्न केले जातात. यासाठी, या कक्षाने सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रासोबत सहकार्याचे धोरण अवलंबले आहे. या दोन्ही घटकांमार्फत, सध्या महिलांसाठी ज्या उद्योजकीय संकल्पना, योजना, कार्यक्रम राबवले जातात, त्या सर्व या कक्षाच्या मार्फत एकाच व्यासपीठावरून महिलांपर्यंत पोहोचवण्याची व्यूहनीती आखण्यात आली आहे. यामुळे महिला उद्योजक आणि सहभागी संस्थांमध्ये उत्कृष्ट संकल्पनांची देवाणघेवाण शक्य झाली आहे. त्या अनुषंगाने वस्तुनिष्ठ



**महिला उद्योजक सध्याच्या योजना आणि भविष्यातील योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरतात. 'स्टार्टअप वीक'दरम्यान पात्र ठरणाऱ्या २४ नवोपक्रमांना १५ लाख रुपयांचे कार्यादेश दिले जातात. नवोपक्रम संस्थेचे पाठबळ मिळालेल्या इनक्युबेटर्सची स्थापना राज्यभर केली जात आहे.**

धोरणे आखून त्याची प्रभावीरित्या अंमलबजावणी केली जात आहे.

## इनक्युबेशनची सुविधा

नव्या महिला उद्योजकांना सुरुवातीच्या काळात भक्कम पायाभरणी करता यावी, यासाठी इनक्युबेशन (उद्योजकता संवर्धन/विकास) केंद्राची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य इनोव्हेटिव्ह स्टार्टअप (नवोपक्रमशील धोरण) कक्षामार्फत मुंबईतील एसएनडीटी विद्यापीठाच्या सहकार्याने केवळ महिलांच्या उद्योजकतेवर लक्ष केंद्रित करणाऱ्या इनक्युबेशन सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. अशा इनक्युबेटरसाठी अनुदानाच्या स्वरूपात साहाय्य केले जाते. त्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एसएनडीटी विद्यापीठात असे इनक्युबेशन सेंटर उभारल्यामुळे महिला उद्योजकांच्या साहाय्यार्थ शासनाच्या प्रयत्नांची निश्चित भूमिका स्पष्ट झाली आहे.

या केंद्रात जलदगतीने कार्यान्वित करता येऊ शकतील असे उद्योजकीय उपक्रम राबवले जातात. त्याचबरोबर आवश्यक तांत्रिक साहाय्य, बाजारपेठीय साहाय्य आणि उद्योजकीय मार्गदर्शन सुलभतेने उपलब्ध करून दिले जाते. महिला उद्योजकीय कक्षामार्फत महिला उद्योजकांच्या साहाय्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. यातूनच त्यांच्यासाठी अत्यंत अनुकूल अशी 'उद्योजकीय पर्यावरण निर्मिती' होण्यास साहाय्य झाले आहे.

## विविध सुविधा

या कक्षामार्फत ॲक्सिलरेशन (वेगवर्धन) कार्यक्रम, मेंटॉरशिप (मार्गदर्शन/ सल्ला/ साहाय्य/ प्रशिक्षण) कार्यक्रम आणि इनक्युबेकशन(उद्योजकता संवर्धन) साहाय्य, वित्तीय साहाय्य, आणि नियामक बाबींमध्ये साहाय्य असे विविध कार्यक्रम प्राधान्याने राबवले जातात.

महिला उद्योजक सध्याच्या योजना आणि भविष्यातील योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरतात. 'स्टार्टअप वीक'दरम्यान पात्र ठरणाऱ्या २४ नवोपक्रमांना १५ लाख रुपयांचे कार्यादेश दिले जातात. नवोपक्रम संस्थेचे पाठबळ मिळालेल्या इनक्युबेटर्सची स्थापना राज्यभर केली जात आहे. राष्ट्रीय स्तरावरील बौद्धिक संपदा (पेटंट) साहाय्यासाठी २ लाख रुपये आणि आंतरराष्ट्रीय पेटंट साहाय्यासाठी १० लाख रुपयांचे साहाय्य केले जाते. गुणवत्ता चाचणी आणि प्रमाणीकरणासाठी २ लाख रुपयांपर्यंतचे साहाय्य केले जाते.

महिला संस्थापक किंवा सह-संस्थापक, संचालक भागीदार, मुख्य

कार्यकारी अधिकारी असलेल्या कोणत्याही नवोपक्रमावर आधारीत कार्यरत असणारे उद्योग, व्यवसाय, भागीदारी, स्टार्टअप यांचा समावेश महिला उद्योजकतेच्या कक्षेत होतो.

महाराष्ट्रातील महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी, राज्य महिला उद्योजकता धोरण आखण्यात आले आहे. यासाठी, महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी आणि ग्लोबल अलायन्स वुइथ मास आंत्रप्रिन्युअरशिप यांनी सहकार्य केले आहे.

‘हिरकणी महाराष्ट्राची’ या कक्षामार्फत सर्वसमावेशक धोरण अवलंबवण्यात येत असल्याने, ‘हिरकणी महाराष्ट्राची’ हा उपक्रम ग्रामीण भागातील महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. विशेषतः कृषी, हस्तकला, अन्नप्रक्रिया आणि सेवाक्षेत्रातील उद्योग/व्यवसायाला प्राधान्य दिले जाते. अशा महिलांना स्थानिक पातळीवरच उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन तसेच बाजारपेठीय साहाय्य केले जाते. या योजनेसाठी जिल्हा उद्योग केंद्र, एसएनडीटीतील इनक्युबेशन सेंटर, सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योजकता प्रशिक्षण केंद्रे अशा ठिकाणी प्रशिक्षण दिले जाते.

**योजनेसाठीची पात्रता**

(१) संबंधित महिलेचे वय १८ ते ५५ वर्षे असावे,

(२) अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास संवर्गातील महिलांना प्राधान्य दिले जाते,

(३) बचत गट आणि स्वयंसाहाय्यता गटांना साहाय्य दिले जाते.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करावा लागतो. अर्जासोबत आधार कार्ड, पत्त्याचा पुरावा, बँक पासबूक, व्यवसाय आराखडा, उत्पन्नाचा दाखला, आवश्यकता असल्यास स्वयंसाहाय्यता गटाचे सदस्य असल्याचे प्रमाणपत्र ही कागदपत्रे सादर करावी लागतात.

> **‘हिरकणी महाराष्ट्राची’ या कक्षामार्फत सर्वसमावेशक धोरण अवलंबवण्यात येत असल्याने, ‘हिरकणी महाराष्ट्राची’ हा उपक्रम ग्रामीण भागातील महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी सुरू करण्यात आला आहे.**

**संपर्क-** पहिला मजला, कक्ष क्रमांक ९, एलफिन्स्टन तांत्रिक शाळा परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४००००१

**दूरध्वनी-** ०२२-३१०५९०००

**ईमेल**-team@msins.in

**संकेतस्थळ-**
https://msins.in.

**महिला उद्योजकांचे सक्षमीकरण**

स्टार्टअप इंडिया या योजनेअंतर्गत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकता मंत्रालयाकडून महिला उद्योजकांच्या साहाय्यासाठी, ‘व्यवसाय आधारित उद्योजकता साहाय्य आणि विकास’ ही योजना राबवली जाते.

उद्योग अथवा व्यवसाय करू इच्छिणाऱ्या महिलांपुढची सर्वात मोठी आणि महत्त्वाची समस्या म्हणजे सुलभरीत्या पतपुरवठा होण्याबाबत येणाऱ्या अडचणी. त्यामुळे पतपुरवठ्याची हाताळणी सुयोग्य पद्धतीने करण्याचा अनुभव असणाऱ्या ‘एनजीओ (नॉन गव्हर्नमेंट ऑर्गनायझेशन/अशासकीय संस्था)’ यांच्या माध्यमातून स्वयंसाहाय्यता गटातील महिलांना अर्थसाहाय्य केले जाते. अशा एनजीओ, या महिलांना व्यवसाय / उद्योजकते संदर्भात प्रशिक्षण आणि समुदेशन करू शकतात. त्यामुळे ज्या एनजीओंना बँकेकडून कर्ज मंजूर झाले आहे, त्यांना या योजनेअंतर्गत केंद्र शासन अनुदानाच्या स्वरूपात अर्थसाहाय्य करते. हे अनुदान प्रकल्पखर्चाच्या ३० टक्के असते. प्रकल्पखर्चाच्या ७० टक्के रक्कम बँकेकडून कर्जाच्या

स्वरूपात दिली जाते. बँक किंवा कर्ज देणाऱ्या संस्थेकडून कमाल कर्ज किंवा पतपुरवठा मर्यादा ३० लाखांपर्यंतची असते. हा कर्जपुरवठा अकृषिक कार्यासाठी केला जातो. कर्जाची रक्कम महिलांना वितरीत केली जाते, तर शासनाचे अनुदान हे एनजीओंच्या क्षमताविकास किंवा क्षमताबांधणीसारख्या कार्यासाठी उपयोगात आणले जाऊ शकते. या योजनेअंतर्गत एकदा अनुदान मिळाल्यानंतर पुढील दोन वर्षांसाठी संबंधित एनजीओ या अनुदानासाठी पात्र ठरत नाही.

या संस्थेला या निधीचा उपयोग प्रशिक्षण, समुपदेशन, मार्केटिंग (विपणन) साठी सहकार्य आदींसाठी करता येतो. अशा सक्षमीकरणाच्या प्रशिक्षणासाठी एनजीओंना प्रत्येक कार्यक्रमासाठी एक लाख रुपयांचे अनुदान मिळू शकते. त्यासाठी काही अटी आणि शर्तींचे पालन करावे लागते.

## एनजीओंसाठी अर्हता

अर्थसाहाय्य मिळण्यासाठी पुढील बाबींची पूर्तता झालेली असावी.

(१) नोंदणीला किमान तीन वर्षे झालेली असावीत.

(२) स्वयंसाहाय्यता गटाच्या माध्यमातून निधीचे व्यवस्थापन करण्याचा आणि बचतीचा अनुभव असावा.

(३) महिला उद्योजकांचे आर्थिक उत्पन्नाचे स्रोत वाढावे म्हणून विविध प्रकारचे प्रयत्न केलेले असावेत,

(४) मूलभूत पायाभूत सुविधा असाव्यात,

(५) सूक्ष्म उद्योजकता विकासाला चालना देऊ शकणारे प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सेवा असावी,

**बँक किंवा कर्ज देणाऱ्या संस्थेकडून कमाल कर्ज किंवा पतपुरवठा मर्यादा ३० लाखांपर्यंतची असते. हा कर्जपुरवठा अकृषिक कार्यासाठी केला जातो. कर्जाची रक्कम महिलांना वितरीत केली जाते, तर शासनाचे अनुदान हे एनजीओंच्या क्षमताविकास किंवा क्षमताबांधणीसारख्या कार्यासाठी उपयोगात आणले जाऊ शकते.**

(६) महिला उद्योजक/ महिला स्वयंसाहाय्यता गटासाठी व्यवसाय/ उद्योगाचा प्रस्ताव तयार करण्याचा पूर्वानुभव असावा,

(७) कर्ज प्रकरण करण्याचा आणि कर्ज वितरणाचा अनुभव असावा.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकता विकास संस्था, उद्योजकता विकास संस्था (आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट इंस्टिट्यूट) यांसारख्या प्रशिक्षण संस्थांनादेखील महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या प्रशिक्षणासाठी एक लाख रुपयांपर्यंचे अनुदान दिले जाते. नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट इंस्टिट्यूट (एनआयएमएसई), नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ आंत्रप्रिन्युअरशिप अँड बिझिनेस डेव्हलपमेंट (एआयईएसबीयुडी), इंडियन इंस्टिट्यूट ऑफ आंत्रप्रिन्युअरशिप (आयआयई), एमएसएमई – डेव्हलपमेंट इंस्टिट्यूट या संस्थांना गरजेनुसार क्षेत्रीय सर्वेक्षण, संशोधन कार्य, विश्लेषण, प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करणे आदी कार्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते.

**संपर्क**

https://www.startupindia.gov.in/content/sih/en/women_entrepreneurs.html

## महिला उद्योजकता व्यासपीठ

निती आयोगामार्फत महिला उद्योजकता व्यासपीठ (विमेन्स आंत्रप्रिन्युअरशिप प्लॅटफॉर्म) ही योजना राबवली जाते. महिला उद्योजकांना सर्व प्रकारची माहिती देण्यासाठी या व्यासपीठाची निर्मिती करण्यात आली. उद्योगक्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तींमार्फत या

व्यासपीठाद्वारे उद्योजकीय कार्यशाळा आयोजित करून उद्योग/ व्यवसायाविषयी प्रबोधन केले जाते. उद्योजकीय विकास व प्रशिक्षणासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरते.

या व्यासपीठाद्वारे सहा मुख्य घटकांवर लक्ष केंद्रित केले जाते

(१) समुदाय आणि संपर्क साखळी (कम्युनिटी अँड नेटवर्किंग),

(२) वित्त पुरवठा आणि वित्तीय साहाय्यता (फंडिंग अँड फायनांशिअल असिस्टंन्स),

(३) उबवण आणि प्रवेगक (इनक्युबेशन अँड ॲक्सिलरेशन),

(४) अनुपालन आणि करसाहाय्यता (कम्प्लायन्स अँड टॅक्स असिस्टन्स),

(५) उद्योजकता कौशल्य आणि प्रेरकांचे मार्गदर्शक/सल्ला (आंत्रप्रिन्युअर स्किलिंग अँड मेंटॉरशिप),

(६) विपणन साहाय्य (मार्केटिंग असिस्टन्स)

भारताच्या विविध प्रांतातील उद्योजकीय महत्त्वाकांक्षा असणाऱ्या महिलांना एकत्र आणणारे हे पहिलेच पोर्टल ठरले आहे. या व्यासपीठाद्वारे महिला उद्योजकांना, नावीन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्ष साकारण्यासाठी आणि दीर्घ कालावधीच्या शाश्वत स्वरूपाच्या व्यावसायिक व्यूहनीतींचा विकास करण्यासाठी सर्व प्रकारचे साहाय्य केले जाते. या व्यासपीठाद्वारे कॉर्पोरेट भागीदारी, अप्रेंटिसशिप ( शिकाऊ उमेदवारी/प्रशिक्षण) यांची संधी उपलब्ध करून दिली जाते. यशस्वी उद्योजकांचा प्रवास, यशकथा, अनुभवांची देवाणघेवाण केली जाते. त्याद्वारे नव्या उद्योजिकांना प्रेरणा मिळू शकते.

महिला उद्योजिका प्रेरक (विमेन आंत्रप्रिन्युअरशिप मेंटॉरशिप प्लॅटफॉर्म) व्यासपीठाद्वारे मार्गदर्शक, प्रेरक आणि महिला उद्योजकांना एकत्र आणले जाते. त्याद्वारे सुरक्षित आणि सर्वसमावेशक उद्योजकीय पर्यावरणाची निर्मिती केली जाते.

महिला उद्योजकांच्या गरजा आणि पसंती लक्षात घेऊन हे मार्गदर्शन दिले जाते. या व्यासपीठामुळे लाभार्थ्यांना, अनेक संसाधने आणि संधी यांचा लाभ घेता येतो. प्रेरक आणि लाभार्थ्यांमध्ये प्रभावीपणे संवादसेतू निर्माण व्हावा म्हणून कृत्रिम प्रज्ञा, मशिन लर्निंग तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो. त्यामुळे लाभार्थ्यांच्या विशिष्ट गरजांचे समाधान प्रभावीपणे शक्य होतो.

इच्छूक महिला उद्योजकांना सुलभतेने प्रेरक/ मार्गदर्शन कार्यक्रमाचा लाभ घेता येतो. या व्यासपीठाद्वारे बहुविध क्षेत्रांसाठी मार्गदर्शन केले जाते. यामध्ये वित्त पुरवठा, बाजार संपर्क साखळी, प्रशिक्षण आणि कौशल्य निर्मिती, इनक्युबेशन, ॲक्सिलरेशन आणि व्यवसाय विकास सेवा आदींचा समावेश आहे. कृत्रिम प्रज्ञा आणि मशिन लर्निंग तंत्राचा वापर, प्रेरक आणि लाभार्थ्यांसोबत समान उद्योजक अनुभव आणि तज्ज्ञतेचा लाभ देण्यासाठी केला जातो. त्याद्वारे लाभार्थ्याचे प्रोफाईल (व्यक्तिगत कार्याविषयी माहिती), उद्दिष्टे, आवडीनिवडी यांचे विश्लेषण केले जाते. या व्यासपीठावरील ही योजना पुढील तीन तत्त्वांवर आधारीत आहे–

(१) इच्छाशक्ती– स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असणाऱ्या महिलांना प्रेरित करणे,

(२) ज्ञानशक्ती– महिलांसाठी उद्योगीय पर्यावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व माहिती उपलब्ध करून देणे,

(३) कर्मशक्ती– स्वतःचा उद्योग– व्यवसाय सुरू करण्याची महत्त्वाकांक्षा असणाऱ्या महिलांना, उद्योग स्थापनेसाठी मदतीचा हात देणे.

संपर्क–

संकेतस्थळ–wep.gov.in,

ईमेल–wep@wepindia.org

■



रोजमेरी दुधाट
कोल्हापूर

# स्त्री आणि मुलींच्या हक्कांचे संरक्षण




महिला दिनाला स्वत:ची अशी पार्श्वभूमी आहे. जगात आजही अनेक ठिकाणी महिलांचा स्वत:च्या अस्तित्वासाठी संघर्ष सुरू आहे.

## जागतिक महिला दिन: सर्व महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय, कृती

प्रत्येक वर्षी ८ मार्च हा दिवस जगभर जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. स्त्रिया आणि मुली यांच्या हक्कांचे संरक्षण, सामाजिक–आर्थिक–राजकीय न्यायाची मागणी, आणि डिस्क्रीमिनेशनचा कायमचा अंत करण्यासाठी जागरूकता निर्माण करणे ही उद्दिष्टे हा दिवस साजरा करण्यामागे आहेत.

जागतिक महिला दिन हा दिवस केवळ उत्सवाचा नाही; तो चिंतनाचा, आव्हान स्वीकारण्याचा, प्रतिबद्धता दृढ

करण्याचा दिवस आहे. जागतिक महिला दिन हा केवळ अभिनंदन, फुले किंवा भाषणांपुरता मर्यादित राहू नये.

आजही जगातील असंख्य स्त्रिया आणि मुली लैंगिक भेदभाव, हिंसा, शोषण, संधीचा अभाव, आणि संरचनात्मक अन्याय यांचा सामना करत आहेत. त्यामुळे हक्क (Rights), न्याय (Justice) आणि कृती (Action) हे तीन शब्द केवळ घोषवाक्य नसून, जागतिक जबाबदारीचे सूत्र बनतात.

## १. जागतिक महिला दिनाची उत्पत्ती आणि महत्त्व

### १.१ इतिहास

जागतिक महिला दिनाची मुळे औद्योगिक क्रांतीनंतरच्या कामगार चळवळीत दडलेली आहेत. १९०० या दशकाच्या सुरुवातीच्या दशकांत महिला कामगारांनी रोजगाराच्या समान हक्कांसाठी, मतदान अधिकारांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी जोरदार आंदोलन केले.

क्लारा झेटकिन यांच्या पुढाकाराने हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य झाला. यातून हा दिवस केवळ 'महिला दिन' न राहता स्त्री–मुक्ती चळवळीचे प्रतीक बनला. तेव्हापासून हा दिवस स्त्री पुरुष समानतेचे, लैंगिक अन्यायाविरोधातील संघर्षाचे आणि महिलांच्या सशक्तीकरणाचे



जागतिक प्रतीक बनला. १९७५ साली संयुक्त राष्ट्रसंघाने अधिकृतपणे जागतिक महिला दिन मान्य केला.

यानंतर महिलांचे हक्क = मानवी हक्क, स्त्री सक्षमीकरण = शाश्वत विकासाचा पाया असा दृष्टिकोन आंतरराष्ट्रीय स्तरावर रुजवण्यात आला.

### १.२ महत्त्व

जागतिक महिला दिन केवळ 'स्त्रियांनी काय साध्य केले' या गोष्टीचा गौरव नव्हे; तर स्त्रियांच्या विरोधात अजूनही अस्तित्वात असलेल्या असमानता, अत्याचार, सामाजिक अन्याय, आर्थिक विषमता या समस्यांना उजेडात आणण्याचा दिवस आहे.

हा दिवस आजही गरजेचा आहे, कारण जगभरात अनेक देशांमध्ये स्त्रियांना मूलभूत हक्क मिळालेले नाहीत. हिंसा, लैंगिक भेदभाव, आर्थिक असमानता अजूनही आहे. तसेच मुलींच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार संधीमध्ये भेदभाव आहे

## २. महिला आणि मुलींसाठी मूलभूत हक्कः एक संशोधनपर विवेचन

२.१ शिक्षणाचा हक्क

शिक्षण मिळणे हा स्त्रियांसाठी सर्वात मूलभूत हक्क आहे. शिक्षणामुळे आत्मसन्मान, स्वतंत्रता, आरोग्य आणि रोजगाराचे दार उघडले जाते. संशोधन म्हणते, की प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या मुलींमध्ये आर्थिक–सामाजिक समीकरण जास्त आहे. प्रौढ स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढल्यास कुटुंबातील आरोग्य, पोषण आणि सामाजिक निर्णय अधिक सुधारतात.

२.२ आरोग्य आणि सुरक्षिततेचा हक्क

आरोग्य हा सर्वांसाठी मूलभूत हक्क आहे; परंतु स्त्रियांचे शरीर आणि स्वास्थ्य याविषयी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य अजूनही अनेक समाजात मर्यादित आहे. महिलांना जनन आरोग्य, सुरक्षित प्रसूती सेवा, मानसिक आरोग्य सेवा आणि पोषण या बाबींमध्ये समान संधी मिळणे आवश्यक आहे.

महिलांचे आरोग्य हे केवळ वैद्यकीय नव्हे, तर सामाजिक व नैतिक आहे. मासिक पाळीविषयक स्वच्छता, मातृत्व सेवा, मानसिक आरोग्य या सर्व बाबी अजूनही अनेक समाजांमध्ये संकोच आणि दडपशाही यांच्यात अडकलेल्या आहेत.

स्त्रीला तिच्या शरीराविषयी निर्णय घेण्याचा अधिकार नसेल, तर तिचे स्वातंत्र्य अपूर्ण राहते.

२.३ आर्थिक, राजकीय सहभाग

महिलांमध्ये सर्व स्तरांवर आर्थिक समीकरणांची आवश्यकता आहे. समान वेतन, समान रोजगार संधी, क्रेडिट व बँकिंग सुविधांचा समावेश असणे महत्त्वाचे आहे. राजकीय स्तरावर निर्णय प्रक्रियेत महिला सहभाग संघटित, न्याय्य आणि परिणामकारक धोरणनिर्मितीसाठी आवश्यक आहे.

आजही जगभर समान

कामासाठी असमान वेतन, नेतृत्वात महिलांचे अल्प प्रतिनिधित्व, मातृत्वामुळे रोजगारातील अडथळे हे वास्तव आहे.

आर्थिक स्वातंत्र्याशिवाय स्त्री निर्णयक्षम बनत नाही. शोषणाविरोधात उभी राहू शकत नाही. म्हणूनच समान वेतन, सुरक्षित कार्यस्थळे, आर्थिक संधी या बाबीही बघितल्या जाणे क्रमप्राप्त ठरते.

२.४ घरापासून समाजापर्यंत समानता

घरातील प्रत्येक निर्णयात स्त्रियांचा सहभाग असायला हवा. स्त्रियांची निर्णयक्षमता, संपत्तीमध्ये हक्क, कुटुंब नियोजनात भागीदारी आणि हिंसा–छळवणुकीपासून संरक्षण हे सर्व स्त्रियांचे मूलभूत हक्क आहेत.

## ३. न्याय आणि सामाजिक अवरोध: समस्या आणि समाधान

३.१ हिंसा आणि लैंगिक अत्याचार

महिलांविरुद्ध हिंसा ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे. संशोधन दर्शवते, की घरगुती हिंसा, लैंगिक छळ, अनेक संस्थांमध्ये होणारा भेदभाव या समस्या अजूनही मोठ्या प्रमाणात आहेत. यासाठी कायदा–संहिता कठोर करणे, शिक्षा देणे, करणे आणि महिला–सुरक्षा नेटवर्क मजबूत करणे आवश्यक आहे.

घरगुती हिंसा, लैंगिक अत्याचार, मानवी तस्करी, सायबर छळ या केवळ कायदेशीर स्वरूपातल्या नसून मानसिक आणि सांस्कृतिक स्वरूपातीलदेखील समस्या आहेत. कायदे आहेत, पण अंमलबजावणी, संवेदनशीलता आणि सामाजिक समर्थन अपुरे आहे.

न्याय म्हणजे तक्रार करण्याचे धैर्य, तत्काळ संरक्षण, वेळेत आणि निष्पक्ष निर्णय, न्यायालयीन आणि सामाजिक न्यायातील दरी कमी होणे. अनेकदा कायदे असूनही पीडितेला दोष दिला जातो. समाज मौन बाळगतो. प्रतिष्ठेच्या नावाखाली अन्याय झाकला जातो. खरा न्याय हा कागदावर नव्हे, तर समाजाच्या विवेकात उतरलेला असतो.

३.२ रोजगारातील भेदभाव

समान पदासाठी विषम वेतन, मातृत्व अवधीतील रोजगाराचा तोटा, प्रमोशनमध्ये कमतरता या अडचणी महिलांना कामात त्यांच्या पूर्ण क्षमतेने पुढे जाण्यापासून रोखतात.

३.३ शिक्षणातील अंतर

ग्रामीण भागात गरीब कुटुंबांमध्ये मुलीचे शिक्षण अपूर्ण राहणे, सामाजिक रूढीजन्य मर्यादा या कारणास्तव मुली शिक्षणापासून वंचित राहतात. शिक्षणाशिवाय सशक्तीकरण अशक्य आहे. संशोधन सांगते, की शिक्षित स्त्री अधिक आरोग्यदायी कुटुंब घडवते. मुलीचे शिक्षण वाढले की बालविवाह, मातामृत्यू, कुपोषण कमी होते. महिलांची निर्णयक्षमता आणि आत्मभान विकसित होते. तरीही ग्रामीण भागात मुलींची गळती, गरिबी, सामाजिक रूढी, सुरक्षिततेचा अभाव या कारणांमुळे शिक्षणाचा हक्क अजूनही सर्वांना मिळत नाही.

## ४. कृती: काय करणे आवश्यक आहे? (Policy to Practice)

४.१ धोरणे आणि कायदे

समान वेतनाचे कायदे, महिलांविरुद्ध हिंसेसाठी दंडात्मक कायदे करणे गरजेचे आहे.

मातृत्व सुट्टी, कामाचे सुरक्षित



वातावरण, शिक्षणास धोरणात्मक प्राथमिकता याबद्दलही नियम करणे आवश्यक आहे.

४.२ संस्था आणि समुदाय भावना

शाळा–कॉलेजमध्ये लैंगिक समानता शिक्षण: मुलींच्या हक्कांविषयी समज वाढवणे, मुलांसमोर सन्मान, समज, सहअस्तिव शिकवणे, समुदाय–आधारित महिला जागरूकता केंद्रे कायदे समजावणे, सल्ला आणि संरक्षण सेवा या बाबी प्रत्यक्षात आणणे गरजेचे आहे.

नागरिक समाज संघटनांचा सहभाग:

मॉनिटरिंग, रिपोर्टिंग, मीडिया–जनजागृती या बाबी ध्यानात घेऊन योग्य त्या गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४.३ खाजगी क्षेत्र आणि कॉर्पोरेट जबाबदारी

लिंगसमता निती, सुरक्षित आणि समावेशक कार्यसंस्कृती, नेतृत्वातील महिलांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे

४.४ सरकार आणि धोरणकर्त्यांची भूमिका

महिलांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद, शिक्षण व आरोग्यात गुंतवणूक, कायद्यांची कठोर अंमलबजावणी, ग्रामीण व वंचित महिलांवर विशेष लक्ष या बाबी ध्यानात ठेवायला हव्या.

४.५ शिक्षणसंस्था आणि कुटुंब

शाळा, महाविद्यालये आणि कुटुंब या ठिकाणी लैंगिक समानतेचे संकार, मुला–मुलींमध्ये परस्परांविषयी सन्मानाची भाषा वापरणे यांकडे विशेष लक्ष द्यायला हवे. संवेदनशीलता आणि सहअस्तिव समानतेची सुरुवात घरातून होते.

४.६ समाज, माध्यमे आणि नागरिक

माध्यमांनी स्त्रीचे वस्तूकरण थांबवावे. सशक्त स्त्रीप्रतिमा मांडाव्यात. तर नागरकांनी अन्यायाविरोधात कायदेशीर पद्धतीने आवाज उठवावा. मौन तोडावे.

## ५. यशाच्या कथा आणि प्रेरणादायक परिणाम

जगातील अनेक देशांनी सकारात्मक बदल साधले आहेत. महिलांनी उच्च शैक्षणिक स्तर प्राप्त केला. राजकीय नेतृत्वात भागीदारी वाढली. रोजगारात समानतेच्या संधी मिळवल्या. या प्रेरणादायी बदलांनी दाखवून दिले आहे, की योग्य धोरण + सामाजिक समर्थन + वास्तविक कृती = बदल शक्य आहे. बदल शक्य आहे याचा पुरावा म्हणजे, जगभर अनेक ठिकाणी महिलांनी राष्ट्रांचे नेतृत्व केले. विज्ञान, शिक्षण, सामाजिक चळवळींमध्ये क्रांती घडवली. स्वयं–सहायता गटांनी ग्रामीण अर्थव्यवस्था बदलली. तिला संधी दिली, तर ती समाजाला दिशा देते.

## ६. निकष: उद्दिष्टे आणि पुढील वाटचाल

आजच्या जागतिक महिला दिनी, केवळ स्मरण करून नव्हे तर निर्णय घेऊन पुढे जाण्याची ही वेळ आहे. महिला आणि मुलींसाठी शिक्षण, आरोग्य, समान आर्थिक संधी, न्याय आणि सुरक्षा हे मूलभूत हक्क अमलात आणणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे.

स्त्री–पुरुष समानता ही फक्त महिलांपुरती मर्यादित समस्या नाही; ती एक मानवी हक्कांची, सामाजिक विकासाची आणि मानवी सभ्यतेची समस्या आहे.

महिला दिन एक दिवस नाही, ती सतत चालणारी चळवळ आहे.

जागतिक महिला दिन म्हणजे, आत्मपरीक्षण, जबाबदारीची जाणीव आणि कृतीचा संकल्प. हे मागितले जातात, न्याय मिळवला जातो, परिवर्तन घडवले जाते. पण प्रत्यक्ष कृतीतून.

अयोग्य सामाजिक रूढींमध्ये बदल, कायद्याच्या अंमलबजावणीला प्राधान्य, सदोष मानसिकतेत बदल ही आव्हाने सद्यस्थितीत महिलांपुढे आहेत.

जेव्हा प्रत्येक स्त्री सुरक्षित, सशक्त आणि स्वतंत्र असेल, तेव्हाच मानवजातीचा खरा विकास पूर्ण होईल.

**जागतिक महिला दिन:** सर्व महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय, कृती ही घोषणा नव्हे, तर आपली सामूहिक व नैतिक जबाबदारी आहे. ■

# जळगाव पोलीस मुख्यालयातील महिला पोलीस अंमलदार पौर्णिमा चौधरी यांची नेत्रदीपक कामगिरी

पौर्णिमा चौधरी या पोलीस मुख्यालय, जळगांव येथे महिला पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत आहेत. त्यांना पोलीस दलात दाखल होऊन १२ दिवसच झालेले होते. त्यांना ०८ सप्टेंबर २०२४ रोजी जळगांव तालुक्यातील कानळदा येथील गिरणा नदीच्या तीरावर असलेल्या महर्षी कण्व आश्रमात ऋषीपंचमी व्रतानिमित्त बंदोबस्त कर्तव्यावर नेमण्यात आले होते. गिरणा नदीच्या तिरावर दरवर्षी जिल्ह्यासह बाहेरील जिल्ह्यातून मोठ्या संख्येने महिला भाविक येतात व नदीकाठी स्नान करून महर्षी कण्वाश्रमात ऋषींच्या गुहेमध्ये पूजा करतात. या काळात नदीकाठावर महिलांची व त्यांचेसोबत आलेल्या लहान मुलांची मोठी वर्दळ असते. म्हणून या पार्श्वभूमीवर जळगांव तालुका पोलीस ठाण्याकडून



लोकमत

महिला पोलिसाने गिरणा नदीत उडी घेत १३ वर्षीय मुलाला काढले सुखरूप बाहेर

## १२ दिवसांपूर्वी पोलिस दलात; बंदोबस्तावेळी बुडणाऱ्याला जीवदान

सुख 'वार्ता'

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** पोलिस दलात दाखल होऊन १२ दिवसच झाले आणि कर्तव्यावर असताना अचानक एक मुलगा नदीत बुडताना दिसला. त्या वेळी क्षणाचाही विलंब न करता स्वत:च्या जिवाची बाजी लावत महिला पोलिस कर्मचारी पौर्णिमा चौधरी यांनी थेट दुथडी भरून वाहणाऱ्या गिरणा नदीत उडी घेत नैतिक गायकवाड (१३, रा. कानळदा, ता. जळगाव) या मुलाला सुखरूप बाहेर काढले. पौर्णिमा यांच्या या धाडसामुळे गायकवाड कुटुंबासाठी 'सुख वार्ता' ठरणारा व पोलिस दलाची मान आणखी उंचावणारा हा प्रसंग रविवारी (८ सप्टेंबर) तालुक्यातील कानळदा येथे अनेकांनी अनुभवला.

जळगाव तालुक्यातील कानळदा येथील गिरणा नदीच्या तिरावर असलेल्या महर्षी कण्वाश्रमात ऋषीपंचमी व्रतानिमित्त दरवर्षी जिल्ह्यासह बाहेरील जिल्ह्यातून हजारो भाविक येतात. महिला भाविकांची संख्या मोठी असते. त्या महर्षी कण्वऋषींच्या गुफेमध्ये पूजा करतात. यंदाही नदीकाठावर महिलांची मोठी वर्दळ होती.

या पार्श्वभूमीवर तालुका पोलिस ठाण्याच्या पोलिस हवालदार ज्योती साळुंके यांच्यासह १७ महिला पोलिस कर्मचारी नदीकाठावर बंदोबस्तासाठी तैनात होत्या.

### बुडणाऱ्याचे हावभाव हेरले अन् थेट पाण्यात उडी

- रविवारी अन्य महिलांसह कानळदा येथील नैतिक गायकवाड या मुलाची आईदेखील पूजा करीत होती. त्यावेळी नदीकाठावर नारळ व पैसे पडल्याने ते घेण्यासाठी नैतिक गेला व तोल जाऊन तो पाण्यात पडला.
- पाण्याचा वेगाने प्रवाह असल्याने तो वाहत जाऊन गटांगळ्या खात होता. मधूनच तो हात देऊन 'मावशी वाचवा, मावशी वाचवा' असा आवाज देत होता.
- हा प्रकार तेथे तैनात असलेल्या महिला पोलिस कर्मचाऱ्यांच्या लक्षात आला. पौर्णिमा कैलास चौधरी यांना पोहता येत असल्याने त्यांनी मुलाला वाचविण्यासाठी थेट वाहत्या नदीत उडी घेतली.
- त्या पाठोपाठ आश्रमाचे सेवेकरी व जितेंद्र सपकाळे यांनीही मदतीसाठी धाव घेत या मुलाला बाहेर काढले. त्या वेळी त्याच्या नाका-तोंडात पाणी गेलेले होते.

### सत्काराने धाडसाला सलाम

- बुडणाऱ्या मुलाला वाचविण्यासाठी जिवाची बाजी लावणाऱ्या पौर्णिमा चौधरी यांचे कौतुक करीत महर्षी कण्वाश्रमाकडून शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी सेवानिवृत्त पोलिस उपधीक्षक तथा सरपंच पुंडलिक सपकाळे, महर्षी कण्वाश्रमाचे पूज्य अदैत्वानंदजी सरस्वती महाराज, तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक गणेश सायकर, पोलिस पाटील नारायण पाटील, ग्रामपंचायत सदस्य भैय्यासाहेब चव्हाण, भिकन सपकाळे, किशोर सपकाळे, आश्रमाचे विश्वस्त रमेश सपकाळे, अनिल सपकाळे, चेतन सोनवणे, तुषार विसपुते आदी उपस्थित होते.

सदर ठिकाणी एकूण १७ महिला पोलिसांचा नदीकाठावर बंदोबस्त तैनात करण्यात आलेला होता.

सदर दिवशी पूजेसाठी आईसोबत आलेला नैतिक गायकवाड या १० वर्षाच्या मुलाचा पाय घसरून तो नदीपात्रात पडला. त्यावेळेस मुलाची आई व इतर महिलांची 'वाचवा, वाचवा' अशी आरडाओरड सुरू झाली. त्या ठिकाणी हजर असलेल्या काही महिला पाण्यात वाहून जाणाऱ्या नैतिकला वाचविण्याचा प्रयत्न करीत होत्या. पण गिरणा नदीपात्रात पाणी वाहते असल्यामुळे नैतिक हा पाण्याच्या प्रवाहात वाहून जाऊ लागला आणि भयभीत होऊन हात वर करून 'मावशी वाचवा, मावशी वाचवा' असा आवाज देत होता. हा प्रकार तिथे बंदोबस्तानिमित्त तैनात असलेल्या महिला पोलीस अंमलदारांच्या लक्षात आला. त्यावेळी पोलीस दलात नव्यानेच रुजू झालेल्या महिला पोलीस अंमलदार चौधरी यांना थोडेफार पोहोता येत असल्याने त्यांनी क्षणाचाही विचार न करता गिरणा नदीच्या पाण्यात वाहून जाणाऱ्या नैतिकला वाचविण्यासाठी थेट वाहत्या नदीत उडी घेतली आणि नैतिकला सुखरूप बाहेर काढले. अशा प्रकारे पोलीस दलात नव्याने रुजू झालेल्या अंमलदार चौधरी यांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता नदीपात्रात वाहून जात असलेल्या नैतिकचे प्राण वाचवून धाडसी कृत्य केले. परिणामी जनमानसात पोलीस दलाचे नाव मोठे झाले आहे. ■

# 'ति'चं अस्तित्व

तनया, पत्नी, माता, स्नुषा.... त्यापलिकडे
आहे का तिला, तिच्या अस्तित्वाची प्रतिक्षा?
तशी ती तलवार आहे...... संकटांच्या दशमुखांना एकाचवेळी छाटणारी,
मात्र संस्कारांच्या म्यानात सहज बंदीस्त होणारी !
ती वीजही आहे...... सामाजिक वादळात कडाडून तळपणारी,
मात्र स्वतःवरच कोसळणारी आणि जळून जाणारी !
ती भ्रमर आहे......ती तो भ्रमर आहे
वज्रकठीण परिस्थितीला हसत भेदून जाणारी,
पण नात्यांच्या कोमल दलांमध्ये घुसमटून संपणारी !
ती एक नाव आहे.......ती एक नावही आहे
आप्तांना भवसागरात पैलतीरी नेणारी,
स्वतः मात्र त्याच भोव-यात गुरफटून फिरणारी !
अशी ती.....
जिजाउ
शिवरायांना घडवणारी
राणी लक्ष्मीबाई
रणांगणावर लढणारी!
अशी ती जिजाउ .....छत्रपतींना घडवणारी
काय आहे तिचं अस्तित्व?
काय आहे तिचं अस्तित्व, तिलाही ज्ञात नाही,
जगत राहते इतरांसाठी,
विसरून तिचं स्वत्व जगत राहते इतरांसाठी,
विसरुन तिचं स्वत्व,



**मीरा सावंत**
सहायक लेखा अधिकारी,
फोर्स वन, गोरेगांव पूर्व,
मुंबई.

लेख



भारती सावंत
नवी मुंबई

# ओढ लेकीच्या मायेची



***लेक आहे ईश्वराची देणगी***
***मायच्या जीवीचा जिव्हाळा***
***बनुनी आईचीच माय कधी***
***सोसते सासुरवासाच्या ज्वाळा***

आमच्या बालपणी आताएवढी कोणत्याही गोष्टींची चैन चंगळ नसायची. स्वस्त खेळणी आणि निसर्गाच्या संगतीत आमची सांज सकाळ आनंदात जायची. शेतातील सगळे माळवे, भाज्या, फळे बक्कळ खायला असायचे. जंक फूडचा जमाना नसल्याने आणि सर्वांची सर्वसाधारण सारखीच परिस्थिती असल्याने दुसऱ्याला मिळतेय ते आपल्याला मिळत नाही याचे शल्य नसायचे. वर्षातून दोन ड्रेस घरी घालायला

आणि दोन शाळेचे गणवेश मिळाले की आम्ही खूष असायचो. एक दिवाळीचा आणि एक यात्रेसाठी मिळालेला असे दोन ड्रेस. ते जुने झाले की घरात घालायला काढायचो. त्यात वावगे काहीच वाटत नसे. नाही म्हणायला एखाद्या मुलाची किंवा मुलीची परिस्थिती चांगली असेल तर एखादा वेगळा ड्रेस मिळायचा! किंवा सुट्टीला गेल्यावर मामा घ्यायचा. पण याहून वेगळे काही नाही.

आईच्या हातात घरापुरती सत्ता होती. गोठ्यात गाईगुरांचे खिल्लार असल्याने दूध, तूप, लोणी या सर्वांची मुबलकता असायची. आई गळ्याशपथ घालून ते सर्व आमच्या गळी उतरवायची. त्यातून तिच्या हृदयातील ओलावा आणि आमच्याविषयीचा जिव्हाळा ओसंडून वाहत असताना दिसायचा. बाकी पैशाची देवघेव करण्याची तिला सत्ता नसायची. आजी–आजोबा आणि बाबा, काका घरात लागणाऱ्या वस्तू आणून देत. लेकीच्या लग्नात परिस्थितीच्या मानाने भरपूर खर्च केला जाई. मुलीच्या अंगावर भारीतल्या साड्या आणि अलंकार घातले जात. मुलीदेखील खुश व्हायच्या. या नव्या वेशात त्यांचे यौवन आणि सौंदर्य बहरून खुलून जायचे. सासरकडूनही तिला मानापानाचे आणि कंगन, हार यासारखे अलंकार घातले जायचे. त्यामुळे मुलगी पाच

**आईच्या हातात घरापुरती सत्ता होती. गोठ्यात गाईगुरांचे खिल्लार असल्याने दूध, तूप, लोणी या सर्वांची मुबलकता असायची.**



परतवणीने माहेरी गेली की आई खूप हरखायची. आपल्या मुलीचे हे नवे रुपडे निरखत मोठ्या कौतुकाने तिला न्याहाळत राहायची. आपला खरखरीत हात तिच्या अंगावरून फिरवत राहायची. तिची नवी साडी, नवनवे अलंकार पुन्हा पुन्हा चाचपत बसायची. आपली मुलगी संसारात, सासरी खुश असल्याचे समाधान तिच्या नजरेतून ओसंडून वाहताना दिसायचे.

मुलगी जितके दिवस माहेरी आहे, तितके दिवस ती आपल्याजवळ बसावी, आपल्या कुशीत झोपावी अशी तिची माफक अपेक्षा असायची. पण मुलीला तेवढा पोहोच नसायचा. तिला माहेरच्या अंगणात हुंदडायचे असायचे. मैत्रिणींना भेटून हितगुज करायचे असे. आपल्या सासरच्या गमती मैत्रिणींच्या कानात सांगायच्या असायच्या. त्यामुळे तिला आईच्या भावना कळत नसत. तिचा संसार आता फुलायला लागलेला असल्याने सुखाविषयीच्या साऱ्या गप्पा मैत्रिणींच्या कानात सांगताना ती हुरळून जायची. या गप्पा संपूच नयेत असे तिला वाटायचे. अंगणात फुगड्या, झिम्मा खेळताना तिला पुन्हा बालपणीचे दिवस आठवायचे असत. पण आई मात्र उगीचच सारखी तिला बोलवून तिच्याकडून सासरची माहिती मिळवण्याचा प्रयत्न करायची. आपली लेक खुश असल्याचे पाहून तिचे हृदय मायेने उचंबळून येई.

ती इथे आहे तोवर तिच्यावर संस्कारांचा भडिमार करायचा असे. कारण सासरघरी कोणी आपल्या मुलीची उणीदुणी काढू नयेत, माहेरच्या नावाचा उद्धार होऊ नये. आज जशी तिची लेक सुखात, आनंदात आहे तशीच आयुष्यभर राहावी, तिची अशीच भरभराट व्हावी असे त्या मातृहृदयाला वाटत असे. त्यामुळे तिला वळण लावण्याचा ती प्रयत्न करायची.

मुलीला जेव्हा स्वतःचे अपत्य होते, तेव्हा आईच्या मनाची घालमेल तिच्या लक्षात येते. आपल्या आईचे आपल्यावर किती प्रेम आहे या जाणिवेने तिचा ऊर

भरून येतो आणि मग तिलाही आपल्या आईला भेटायची ओढ लागते. परंतु आता ती आपल्या संसारात पूर्णतः गुरफटली जाते. जाऊ म्हटले तरी तिला माहेरी जाता येत नसते. सासरघरी लक्ष्मी पाणी भरत असते. घर–अंगण सुखासमाधानात आणि सधनतेने नटलेले असते. परंतु हृदयात मात्र आईच्या भेटीची ओढ कायम असते. आपण बाळपणी किती हट्ट केला, आईला त्रास दिला हे सर्व आठवत ती आपल्या संसारात रममाण होते. आईच्या कष्टांची जाणीव तिला अस्वस्थ करते. तिला आपल्या स्पर्शाची एवढी ओढ का वाटायची हे तिला कळून चुकते. कारण आता तीही लेकरांची आई असते. परंतु मायलेकीच्या ओढीची ही व्यथा साऱ्या जगतासाठी नवीन नाही.

***लेक सासूऱ्यात रहाते***
***काळीज आईसाठी झुरते***
***मायच्या भेटीसाठी नित्य***
***तिचे तनमनही गुदमरते***

आपल्या आईला भेटावे. तिला घट्ट मिठी मारावी. तिचा लेकीच्या अंगावरून, तोंडावरून फिरवलेला खरखरीत हात तिच्या काळजात नवीन अनुभूती देऊन जातो. तिचे मन आक्रंदत राहाते.

***ओढ भेटीची वाटताना***
***मनपाखरू माहेरी उडते***
***आईच्या कुशीत निजता***
***पापणी डोळ्याची फडफडते***

**लेक तिच्या सासरी कितीही आनंदात असली तरी तिला भेटण्यासाठी माय आपल्या डोळ्यांच्या ज्योती करून वाट पाहत असते.**



मायलेकीची ही अनामिक ओढ लावणारे नाते अनुभवायला स्वतःला आई व्हावे लागते हेच खरे!

***माय जीवीचा जिव्हाळा***
***ओढ लेकीच्या भेटीची***
***सुखीसमाधानी असूनी***
***भावनाच ताटातुटीची***

लेक तिच्या सासरी कितीही आनंदात असली तरी तिला भेटण्यासाठी माय आपल्या डोळ्यांच्या ज्योती करून वाट पाहत असते आणि आपल्या लेकीचे आपल्याशी बोलणे व्हावे, हितगूज व्हावे याची ती आतुरतेने वाट पहात राहते. आपल्या मनाच्या सगळ्या कानगोष्टी तिच्याशी कराव्यात असे मायला आणि मुलीलाही वाटत राहते. एकमेकीच्या आठवांनी आणि भेटीच्या ओढीने संसारचक्रात गुरफटलेल्या या दोघींच्या पापणकडा ओलावत राहतात.

***कर संसार निगूतीने***
***मोठ्या घरची तू सून***
***आशीर्वाद सदा माझा***
***नसावे दुःखाचे ऊन***

आपल्या लेकीने सासरघरी निवांत, आनंदात आणि सुखात राहावे अशी परमेश्वराकडे प्रार्थना करत माय तुळशीवृंदावनाजवळ बसून तुळशीशी आपल्या लेकीच्या सुखाविषयी बोलत राहते. ■

# एक किंकाळी आणि...



विद्या पाटील
पोलीस निरीक्षक
ठाणे शहर पोलीस ठाणे

ठाण्यातील गोकुळधाम सोसायटीतील रहिवाशांसाठी २०२१ सालची दिवाळी ही नेहमीपेक्षा वेगळी होती. 'त्या' दुपारी एक किंकाळी ऐकू आली. त्या किंकाळीचा आवाज सोसायटीतल्या पार्किंगमधून आला होता. त्या आवाजाने सारे लोक घराच्या बाहेर आले. कोणाची किंकाळी होती ती? त्या दुपारी नेमके काय घडले होते?



ऑक्टोबरचा महिना होता. साल होते २०२१ व तारीख होती २२. ते दिवाळीचे दिवस होते. ठाणे शहर दिवाळीच्या आनंदात न्हाऊन निघत होते. गोडाधोडाचे जेवण आटोपल्यावर आपापल्या घरी परतणाऱ्या नातेवाईकांना सोडण्यासाठी गोकुळधाम सोसायटीतील काही लोक बाहेरपर्यंत आले होते. मोठ्यांच्या पाठोपाठ लहानगेही खेळणे, किल्ला करणे, फटाके उडवणे अशी कारणे देत घराबाहेर पडले होते. त्याप्रमाणे खरोखर काही मुले किल्ल्याला आकार देण्यात गुंग झाली होती, तर काही हातातल्या बंदुकीने टिकल्या फोडत



**संदीप कांबळे**
पोलीस उपनिरीक्षक
ठाणे शहर पोलीस ठाणे
ठाणे



**अजित बडे**
फौजदार
ठाणे शहर पोलीस ठाणे
ठाणे



**उमेश पोळ**
पोलीस अंमलदार
ठाणे शहर पोलीस ठाणे
ठाणे



**नवनाथ ढाकणे**
पोलीस अंमलदार
ठाणे शहर पोलीस ठाणे
ठाणे




**राजू निकुंभे**
कोर्ट पैरवी
ठाणे जिल्हा

होती. मुले वगळता रस्त्यावर फारशी वर्दळ नव्हती. त्यावेळी अचानक सोसायटीच्या पार्किंगच्या दिशेने एक कर्णकर्कश्श किंकाळी ऐकू आली. तो आवाज ऐकताच सोसायटीतले लोक आवाजाच्या दिशेने धावले. त्यावेळी त्यांच्यापैकी काहींना तो आवाज ओळखीचा वाटला.

''अरे, आलेला आवाज गिरिजाप्रसादच्या आवाजासारखा वाटतोय.''

''हो रे... तसंच वाटतंय खरं...''

एकमेकांशी बोलत बोलत लोक सोसायटीचा वॉचमन गिरिजाप्रसाद याला दिलेल्या दहा बाय दहाच्या खोलीच्या दिशेने गेले. कुणीतरी त्याच्या खोलीचे दार वाजवले. बाकीचे लोक गिरिजाप्रसादने दार उघडण्याची वाट बघू लागले. पण तेवढ्यात एकाला गिरिजाप्रसाद खोलीत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. कोणतीही सज्जन व्यक्ती त्याला बघितल्यावर हबकेल, घाबरून जाईल अशीच त्यावेळी गिरिजाप्रसादची अवस्था होती. या सगळ्या कोलहालात काहींनी एका तरुणाला सोसायटीच्या गेटकडे घाईघाईने जाताना बघितले. एवढ्या सगळ्या गोष्टी घडत असताना सोसायटीतल्या एकाने ठाणे शहर पोलीस चौकीला फोन केला.



**एकमेकांशी बोलत बोलत लोक सोसायटीचा वॉचमन गिरिजाप्रसाद याला दिलेल्या दहा बाय दहाच्या खोलीच्या दिशेने गेले. कुणीतरी त्याच्या खोलीचे दार वाजवले. बाकीचे लोक गिरिजाप्रसादने दार उघडण्याची वाट बघू लागले.**

''हॅलो. पोलीस?''

''होऽऽ हो. बोला. कोण बोलतोय? काय काम आहे?''

''मी गोकुळधाम सोसायटीतून बोलतोय. आमच्या इथे आत्ता कोणीतरी आमच्या सोसायटीच्या वॉचमनला...'' फोन करणाऱ्या माणसाने फोनवर असणाऱ्या पोलीस अंमलदारांना पूर्ण प्रसंग सांगितला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत अंमलदार साहेबांनी तातडीने ही माहिती आपल्या वरिष्ठ, ठाणे शहर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत असणाऱ्या विद्या पाटील यांना सांगितली. माहिती समजताच पाटील मॅडम पथकासह गोकुळधाम सोसायटीच्या दिशेने निघाल्या. थोड्याच वेळात पोलिसांचे वाहन गोकुळधामच्या गेटमधून आत शिरले. मॅडम गिरिजाप्रसादच्या खोलीजवळ पोहोचल्या. तो जिवंत असल्याचे मॅडमच्या लक्षात आले. त्यांनी त्याला सरकारी रुग्णालयाच्या दिशेने रवाना केले.

एकीकडे हे सगळे घडत असताना दुसरीकडे आजूबाजूच्या लोकांनी काही स्थानिक पोलिसांच्या मदतीने एका पळणाऱ्या माणसाचा पाठलाग करून त्याला पकडले होते. पोलिसांनी गिरिजाप्रसाद दाखल असलेल्या रुग्णालयात त्याची चौकशी केली. तेव्हा त्याची परिस्थिती गंभीर असून तो काहीही बोलण्याच्या स्थितीत नाही असे समजले.

घटनास्थळी असलेल्या पोलिसांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरून रक्ताचे नमुने, रक्त लागलेली चादर व उशी, गुन्ह्यात वापरलेला चाकू तसेच इतर भौतिक व जैविक मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. घटनास्थळाचे छायाचित्रीकरण करण्यात आले. थोड्या वेळाने जी गोष्ट घडू नये असे वाटत होते तीच गोष्ट घडली. गिरिजाप्रसाद उपचारादरम्यान मरण पावल्याचे पोलिसांना जिल्हा रुग्णालयामार्फत कळवण्यात आले. गिरिजाप्रसादच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला. त्यानंतर त्याचा मृतदेह पाटील मॅडमनी शवविच्छेदनासाठी पाठवला. सर्व महत्त्वाच्या व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. घटनास्थळावरून सीसीटीव्ही फुटेजेस जप्त करण्यात आली. तसेच ज्या माणसाला पळून जाताना पकडण्यात आले होते त्या सगळ्या प्रसंगाचे एका साक्षीदाराने स्वत:च्या मोबाईलमध्ये चित्रीकरण केले होते. पोलिसांनी ते चित्रीकरण हस्तगत केले.


या सगळ्या कोलाहलात गिरिजाप्रसादची बायको बसंती ही घटनास्थळी दाखल झाली. ती हे सगळे काही बघून भांबावली होती. तिचे डोळे गिरिजाप्रसादला शोधत होते. पण तो मात्र तिला कोठेही दिसला नाही.

***

तो आता आपल्याला कधीच परत दिसणार नाही हे सत्य स्वीकारणे तिला जड जात होते. तिच्या टप्पोऱ्या डोळ्यांमधून अश्रूंचा प्रवाह थांबण्याचे नाव घेत नव्हता. त्या अश्रूंचा रंग डोळ्यांना लावलेल्या काजळाने करडा झाला होता.

''मेडम किसने किया ये सब? और क्यों?''

''देखो, अभी पूछताछ मे पता



**घटनास्थळी असलेल्या पोलिसांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरून रक्ताचे नमुने, रक्त लागलेली चादर व उशी, गुन्ह्यात वापरलेला चाकू तसेच इतर भौतिक व जैविक मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला.**

चलेगा, तुम अभी खुद को संभालो। अगर तुमनेही अपना होश खो दिया तो बेटी को कौन देखेगा? संभालो आपने आप को।''

''पर हम दोनो थोडी देर पहले घर से बाहर निकले, तब तो वो हसी मजाक कर रहे थे हमारे साथ। अब लौटी तो ये सब।'' कपाळावर हात मारत बसंती म्हणाली.

***

पोलिसांनी ज्या माणसाला पळताना पकडले होते त्याला घेऊन पोलीस ठाणे शहर पोलीस ठाण्यात आले. त्यांनी त्याने परिधान केलेले कपडे संपादित केले.

''नाम क्या है तेरा?''

खोलीत खाली बसलेल्या तरुणाकडे बघत मॅडमनी विचारले.

''बहादूर।'' चोरट्या नजरेने बघत बहादूरने उत्तर दिले.

''कहाँ से हो?''

''नेपाल।''

''ओह! यहाँ कैसे पहुचाँ?''

''वो नौकरी के तलाश मे आया।''

''तो मिली?''

मॅडमच्या या पश्नावर त्याने नकारार्थी मान हलवली.

''तेरी उस गिरिजाप्रसाद से क्या दुश्मनी थी? जो तूने उस के पेट मे सीधा चाकू ही घुसेड दिया?''

''मै उस के भरोसे पे यहाँ आया था। वो जब गाव आया था तब मेरे को यहाँ के बारे मे इतना बताया की मुझे भी यहाँ आके नौकरी करने की इच्छा हुई।''

''लेकीन इससे उसके मरने का क्या ताल्लुक?''

त्यावरती त्याने काहीच प्रतिक्रीया दिली नाही. तो शांत बसून होता.

''मॅम ने क्या पुछाँ? समझ

मे नही आ रहा क्या?'' पोलीस अंमलदार उमेश पोळ यांनी चढ्या स्वरात विचारले.

मॅडमनी त्यांना हाताने इशारा करून शांत बसण्याची सूचना केली.

मॅडमनी हस्तगत केलेल्या सर्व गोष्टी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे वैद्यकीय तपासणीसाठी पाठवून दिल्या.

पोलिसांनी केलेल्या तपासात काही गोष्टी समोर आल्या. ते म्हणजे घटना घडली त्याच्या आदल्या रात्री गिरिजाप्रसाद व बहादूर यांच्यात दारूच्या दुकानाबाहेर भांडण झाले होते.

गिरिजाप्रसादचा शवविच्छेदन अहवाल पोलिसांना मिळाला होता. तसेच न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेचा विश्लेषण अहवालही त्यांना मिळाला होता. त्यानुसार पोलिसांनी पकडलेल्या आरोपितानेच हा खून केला असल्याच्या पोलिसांच्या कयासास दुजोरा मिळत होता.

पोलिसांनी आपले लक्ष परत एकदा बहादूरकडे वळवले.

''ये देख, हमे क्या मिला है। अब तो तुझे बोलना पडेगा।'' असे म्हणत पोलिसांनी त्याच्यासमोर एक मोबाईल धरला. त्यावर जे सुरू होते ते बघितल्याबर आपण आता यातून सुटू शकत नाही याची जाणीव बहदूरला झाली.

''अब बताएगा या नही?'' हे विचारताना मॅडमचा आवाज काहीतरी वेगळाच होता.

''मै यहाँ आया तो मै गिरिजाप्रसाद के पास आया रूकने के वास्ते। पर वो साला... उसने मुझे ना बोल दिया। नौकरी ढुंढने मे भी उसने मेरी कुछ मदद नहीं की। खाली बडी बडी बाते बनाता था मेरे सामने।''

''केवल इसिलिए तुने मारा उसको?''



**गिरिजाप्रसादचा शवविच्छेदन अहवाल पोलिसांना मिळाला होता. तसेच न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेचा विश्लेषण अहवालही त्यांना मिळाला होता. त्यानुसार पोलिसांनी पकडलेल्या आरोपितानेच हा खून केला असल्याच्या पोलिसांच्या कयासास दुजोरा मिळत होता.**

''तो फिर? उस दिन शराब के दुकान पे गये हम लोग... वहीं पे भी उसने मुझे बोला, 'देख, बहादूर तू तेरा रहने का, नौकरी का खुद ही देख ले।' उस की ये बात सुनके मुझे गुस्सा आया। इस बात पे हमारा वही पे झगडा भी हुआ। लेकीन बाद मे वो खतम भी हो गया। दुसरे दिन दिवाली मनाने के वास्ते उसने मेरे को घर पे बुलाया। मै पहुचा तो वो अकेला था। हमने फिर से दारू निकाली। बाद मे हमारा उस दिन भी फिरसे उसी बात पे झगडा शुरू हुआ। बसंती भाभी के बारे मे मैने कुछ गलत नही बोला, लेकीन उसको लगा के मैने कुछ गलत बात की। अब किसी की तारीफ गलत है क्या? नही ना? पर उसको गलत लगा। वो मुझसे फिर से उलझने लगा। वही पे चाकू पडा था। मैने वो उठाया और घुसेडा उसके पेट मे और दौडा तो बाहर आप लोगो ने पकड लिया।''

पोलिसांनी बहादूरविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मा. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्यावर समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरत बहादूरला दोषी ठरवत भा.दं.वि कलम ३०२ अन्वये आजन्म कारावास आणि १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास ठाणे शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक विद्या पाटील, पोलीस उपनिरीक्षक कांबळे, फौजदार अजित बडे, पोलीस अंमलदार उमेश पोळ, नवनाथ ढाकणे व आर एच निकुंभे (कोर्ट पैरवी) यांनी अत्यंत चपळाईने व चतुराईने पूर्ण केला आहे.

■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



वृषाली पाटील
पोलीस निरीक्षक
कोथरूड पोलीस ठाणे
पुणे

# अनिता गप्प का होती?

**१० ऑक्टोबर २०१९ या दिवशी अनिता रोजच्याप्रमाणे कॉलेजमधून घरी येत असताना रस्त्यात अचानक एक तरुण आला. दिलीप नावाच्या या तरुणाला बघताच अनिताच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. चेहरा भीतीने पांढरा पडला. कोण होता दिलीप? अनिता दिलीपला ओळखत होती? त्याला बघताच ती एवढी का घाबरली? तिचे पुढे काय झाले? कोथरूड पोलिसांनी अनिताला कसा न्याय मिळवून दिला?**



ऑक्टोबर १०, २०१९. दुपारी १९ वर्षीय अनिता मैत्रिणीचा निरोप घेऊन घराकडे जाणाऱ्या रस्त्याला लागली. दुपारी कॉलेज, क्लास सुटल्यावर मग घरी यायचे हा तिचा रोजचा शिरस्ता होता. नाकीडोळी नीटस असणारी अनिता वागायलाबोलायलाही लाघवी होती. कोणालाही पटकन आपलेसे करून घेण्याची क्षमता तिच्यात होती. ती आज सकाळी घरातून बाहेर पडताना दुपारी लवकर येते असे सांगून बाहेर पडली होती. पण प्रत्यक्षात नेहमीची वेळ झाली, तरी परतली नव्हती. लेक घरी परतली नाही म्हणून सुलक्षणा अस्वस्थ झाली होती. तिचे लक्ष भिंतीवर लावलेल्या



**पी सी चौधरी**
पोलीस अंमलदार
कोथरूड पोलीस ठाणे
पुणे



**ए ए जगदाळे**
कोर्ट पैरवी
पुणे

घड्याळाकडे जात होते. घड्याळाचे काटे जसजसे पुढे सरकत होते तसतसे तिच्या मनात चिंतेचे काहूर माजले. मन चिंती ते वैरी न चिंती अशी तिच्या मनाची अवस्था झाली होती. काय करावे हे तिला सुचेना.

सुलक्षणाच्या या मन:स्थितीला अजून एक महत्त्वाचे कारण होते. अनिताला दोन दिवसांपूर्वीच एका भयंकर प्रसंगाला तोंड द्यावे लागले होते. सुलक्षणा अशा भेदरलेल्या मन:स्थितीत असताना दारावरची बेल वाजली. अनिताच असेल असा विचार करत तिने दरवाजा उघडला. समोर अनिता उभी होती. पण... सकाळी घराबाहेर पडतानाची अनिता आणि आत्ता तिच्यासमोर दरवाजात उभी असलेली अनिता यात जमीनअस्मानाचा फरक होता. अनिताचे केस विस्कटलेले होते. तिचे ओठ सुजलेले वाटत होते. कपडेही अस्ताव्यस्त होते. डोळ्यात सशासारखे भेदरलेले भाव होते.

अनिताचे ते रूप बघून सुलक्षणाच्या पायाखालची जमीन सरकली. तिला बघताच अनिता तिच्या गळ्यात पडून एखाद्या लहान मुलीप्रमाणे रडू लागली.

''ए, बाळा, काय झालं? सांग बरं मला.'' अनिताच्या केसांमधून मायेने हात फिरवत सुलक्षणाने विचारले. ती मात्र आईच्या गळ्यात पडून रडतच होती. तिला कसे सावरावे हे सुलक्षणाला समजेना.

''ए अनु, काय झालंय? तू काही बोलली नाहीस तर कसं कळेल मला?''

''आई मी कॉलेज झाल्यावर घरी येत होते. मी केलेली रिक्षापण रस्त्यातच बंद पडली. म्हणून



**सुलक्षणाच्या या मन:स्थितीला अजून एक महत्त्वाचे कारण होते. अनिताला दोन दिवसांपूर्वीच एका भयंकर प्रसंगाला तोंड द्यावे लागले होते. सुलक्षणा अशा भेदरलेल्या मन:स्थितीत असताना दारावरची बेल वाजली.**

कॉर्नरवरून मी चालत घरी येत होते, तेव्हा...'' एवढे बोलून तिने आपले ओठ एकमेकांवर घट्ट आवळले.

''तेव्हा काय? बोल राजा..''

आईने परत एकदा विचारल्यावर अनिताने रस्त्यात घडलेला तो सगळा प्रकार सांगितला. अनिता सांगत असलेला प्रसंग ऐकताना सुलक्षणाचा हात आश्चर्याने तोंडावर ठेवला गेला. आपण केलेला अंदाज बरोबर असल्याचे तिच्या लक्षात आले.

''चल उठ, आपण पोलीस ठाण्यात जाऊ.''

''नको आई... त्यानी धमकी दिलीये मला.'' हे बोलताना तिचा स्वर भयकंपित होता.

''काही घाबरू नकोस. आम्ही आहोत तुझ्याबरोबर.''

सुलक्षणाने समजावल्यानंतर अखेर अनिता तयार झाली. थोड्याच वेळात सुलक्षणा आणि अनिता दोघीही रिक्षाने कोथरुड पोलीस ठाण्यात पोहोचल्या.

''आम्हाला एक तक्रार नोंदवायची आहे.'' समोर असलेल्या अंमलदार साहेबांना सुलक्षणा म्हणाली.

सुलक्षणाबरोबर आलेल्या त्या तरुणीची अवस्था बघून अंमलदारांनी तत्परतेने कोथरुड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असलेल्या आपल्या वरिष्ठ वृषाली पाटील यांच्या केबिनकडे पाठवले.

''जय हिंद मॅडम.'' पाटील मॅडमना कडक सॅल्यूट करत अंमलदारांनी बाहेर उभ्या असलेल्या लोकांबद्दल त्यांना सांगितले.

''ओह! पाठवा त्यांना.''

अनिता आणि सुलक्षणा तिथे आल्या.

''बसा.''

''नाही मॅडम, बसायला वेळ नाही. तुम्ही आधी आमची कम्प्लेंट घ्या.''

''हो घेते. तुम्ही आधी बसा तर खरं. हं, आता सविस्तर सांगा काय झालंय ते.''

''मॅडम घात झालाय ओ. माझ्या पोरीची हालत बघा काय झाली ते.''

''हो दिसतंय ते. पण म्हणजे कोणी केलंय?''

सुलक्षणाने सांगितलेली घटना पाटील मॅडमनी लक्षपूर्वक ऐकली. सुलक्षणा सगळा प्रकार सांगत असताना अनिता मात्र एखाद्या पुतळ्याप्रमाणे अचल बसली होती. पाटील मॅडमनी आपला मोहरा आता अनिताकडे वळवला.

''बोल, तूच सांग नेमकं काय झालं ते.'' हे बोलताना मॅडनी तिच्या हातावर हात ठेवला. अंगातून वीज जावी अशा प्रकारे अनिताने तिचा हात मागे घेतला. आपल्या दोन्ही हातांनी तिने स्वत:चा चेहरा झाकला आणि रडायला सुरुवात केली.

''मला काही नाही सांगायचं. आजूबाजूचे लोक, आई बाबा सगळे काय विचार करतील माझ्याबाबत.''

सध्यातरी तिच्याशी बोलण्याचा उपयोग नाही हे मॅडमच्या लक्षात आले.

''हे बघा आता तिला सांभाळा. खूप शॉकमध्ये आहे ती. हिची मेडिकल करून घ्यावी लागेल.''

''मेडिकल? मॅडम, आम्ही सांगतोय ना. आमच्यावर विश्वास नाहीये तुमचा?''

''तसं नाही. विश्वास आहे आमचा. पण उद्या कोर्टात याच गोष्टी तुमच्या मुलीला न्याय मिळायला मदत करतील.'

पोलिसांच्या सूचनेनुसार अनिताची मेडिकल करण्यात आली. काही काळाने पोलिसांनी अनिताशी परत एकदा संपर्क साधला.

''हे बघ अनिता, तू का घाबरते आहेस? तू काहीच केलं नाही. घाबरायला तर त्यानी पाहिजे ज्यानी हे सगळं केलंय. मी तुला प्रॉमिस करते, त्याला त्याच्या कृत्याची शिक्षा आम्ही



**सुलक्षणाने सांगितलेली घटना पाटील मॅडमनी लक्षपूर्वक ऐकली. सुलक्षणा सगळा प्रकार सांगत असताना अनिता मात्र एखाद्या पुतळ्याप्रमाणे अचल बसली होती. पाटील मॅडमनी आपला मोहरा आता अनिताकडे वळवला.**

नक्की देणार कायद्याने. पण त्यासाठी तू बोललं पाहिजे अनिता.''

दरम्यानच्या काळात पोलिसांच्या सततच्या प्रयत्नाने तिच्याकडून माहिती मिळवण्यात यश आले.

पोलिसांना अनिताचा वैद्यकीय तपासणी अहवालही प्राप्त झाला.

''अनिता, हे सगळं कोणी केलंय? तू ओळखतेस त्या व्यक्तीला?'' पाटील मॅडमनी विचारलेल्या या प्रश्नाला अनिताने मानेने होकार दिला. पोलिसांनी त्यानुसार कारवाई करत तातडीने आरोपिताला त्याच्या घरातून अटक केली. अनिताने वर्णन केल्यानुसार घटनास्थळाचा अर्थात दिलीपच्या राहत्या घराचा पंचनामा करण्यात आला. घटनास्थळावरून पोलिसांनी बेडशीट हस्तगत केले. अनिताप्रमाणेच दिलीपचीही वैद्यकीय तपासणी करण्यात आली. अनिता व तिच्या आईचा सीआरपीसी १६४ नुसार जबाब नोंदवण्यात आला. तसेच अन्य साक्षीदारांचेही जबाब नोंदवण्यात आले. हस्तगत केलेल्या सर्व बाबी या वैद्यकीय तपासणीसाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठवल्या.

''दिलीप, ओळखतोस ना या मुलीला?'' अंमलदार मॅडमनी अनिताचा फोटो दाखवत विचारणा केली.

त्यांच्या या प्रश्नावर दिलीप काहीच बोलला नाही.

''बोल ना, उत्तर दे ओळखतो की नाही?''

या प्रश्नावरही तो गप्प बसून होता.

''काय झालं बोलला का काही? मॅडमनी महिला अंमलदार यांना प्रश्न विचारला.

''नाही ना मॅडम, आल्यापासून नुसता घुम्यागत बसलाय. बघा की.''

''बोल पटकन! माझं डोकं फिरवू नकोस. बोल, ओळखतो ना तू अनिताला?''

''सांगेल तो सगळं काही आणि ते पण खरं.'' हे बोलताना पाटील मॅडमच्या बोलण्यात अतिशय आत्मविश्वास जाणवत होता. ते बघून दिलीपला आता आपली धडगत नाही हे कळून चुकले.

''सांग आता. ओळखतोस ना तू अनिताला?''

''हो.''

''बोल. सगळं पहिल्यापासून सांग. तू कसं वाटेत अडवलं तिला मग तिला घेऊन कुठे गेलास? अगदी सगळं.''

''मला अनिता आवडायची. मला रोज दिसायची माझी अनिता जाताना-येताना.''

''तुझी अनिता?''

''हो. माझी अनिता. ती जाताना दिसली, की मी बघतच रहायचो तिच्याकडे. आम्ही शेजारीच राहायचो एकमेकांच्या. मी महिनाभरापूर्वीच इकडे रेन्टवर राहायला आलो. तिला मी माझ्या घरी जबरदस्तीने घेऊन गेलो ना त्याआधी २ दिवस मी तिला प्रपोझ केलं होतं त्याला ती नाही म्हणाली. त्या दिवशी ती अशीच कॉलेजमधून घरी चालली होती. तिचे केस वाऱ्यावर हालत होते. संध्याकाळची वेळ होती. तिला नेहमीपेक्षा उशीर झाला होता. न राहवून मी तिच्यासमोर उभा राहिलो आणि तिच्या अगदी जवळ जात तिच्या श्वासातली उष्ण हवा भरून घेण्याचा प्रयत्न केला तर ती वेडी घाबरली. तिच्या टपोऱ्या डोळ्यांमधून अश्रू बाहेर पडायला लागले. तिला म्हटलं घाबरू नको. पण ती पळाली तिथून. त्या दिवशी रात्री स्वप्नात आली माझ्या. कसली भारी हसत होती. तिचं ते हसतानाचं गोड रूप... दुसऱ्या दिवशी उठल्यावरही सारखं आठवत होतं मला. माझं कशात लक्षच लागत नव्हतं. तेवढ्यात ती समोरून येताना दिसली. तिला पाहून मी धावत सुटलो जिन्यातूनही. मी पोहोचेपर्यंत ती पुढे गेली होती. पण शेवटी मी तिला थांबवलंच. मला बघून ती जराशी पुढे



**प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या अहवालाने दिलीपने गुन्हा केला असल्याच्या गोष्टीस दुजोरा मिळाला. पोलिसांनी मा. न्यायलयात त्याच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.**

गेली. मी तिचा हात धरला. तशी ती हात सोडवण्याचा प्रयत्न करायला लागली. मी तिला ओढत घेऊन गेलो. तिला माझ्या घरी आणलं. कधी एकदा तिला मिठी मारतो असं झालं होतं मला. तिनी आधी माझ्यापासून दूर जायचा केलेला प्रयत्न किती चुकीचा होता ते मला दाखवायचं होतं तिला. आमच्यामध्ये येणारी प्रत्येक गोष्ट मी बाजूला केली. त्यात मग तिची ओढणी तरी कशी राहील? मी ती खर्रकन ओढत बाजूला केली आणि मग आहाहा!!... ती मला हात जोडत होती. मला सोड म्हणत होती, पण मी... मला जे हवं होतं ते मिळवलंच. तिने याबद्दल कुठं बोलू नये म्हणून मी तिला तिच्या घरच्यांना मारून टाकीन असंही म्हणालो...''

प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या अहवालाने दिलीपने गुन्हा केला असल्याच्या गोष्टीस दुजोरा मिळाला. पोलिसांनी मा. न्यायलयात त्याच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

मा. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्यावर तसेच समोर आलेले सर्व साक्षीपुरावे यांच्या आधारे दिलीपला भा.दं.वि. कलम ३७६ नुसार सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड, कलम ३५४ नुसार ६ महिने सश्रम कारावास तसेच कलम ५०६ अन्वये ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास कोथरुड पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक वृषाली पाटील, पोलीस अंमलदार पी. सी. चौधरी, महिला पोलीस अंमलदार ए. ए. जगदाळे (कोर्ट पैरवी) यांनी अतिशय मेहनतीने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

तपासकथा



श्रीकांत शिंदे
पोलीस निरीक्षक
खारघर पोलीस ठाणे,
नवी मुंबई

# राँग नंबर

ओळखीचा फायदा घेऊन त्यांनी घरात प्रवेश तर मिळवला होता, पण जितक्या मुद्देमालाची त्यांनी अपेक्षा केली होती त्याच्या तुलनेत समोर फार काही दिसत नव्हते. एखादा महत्त्वाचा कॉल करायला जावे आणि राँग नंबर लागावा अशी त्यांची अवस्था झाली होती. याचा परिणाम काय होणार होता? कुणाचा यात हकनाक बळी जाणार होता?




आपल्या बंगल्याच्या व्हरांड्यामध्ये जजसाहेब रमाकांत हे अस्वस्थपणे येरझारा घालत होते. संध्याकाळी साडेपाच वाजल्यापासून ते पत्नी विशाखा हिला फोन करण्याचा प्रयत्न करत होते. फोनची रिंग जात होती, मात्र विशाखा फोन उचलत नव्हती. आता रात्रीचे साडेआठ वाजून गेले होते, पण अजूनही तिच्याशी त्यांचा संपर्क झालेला नव्हता. जजसाहेब पोस्टिंगच्या निमित्ताने घरापासून दूर राहात होते. त्यांची पत्नी विशाखा हीही उच्चशिक्षित होती. ती



**हणमंत डेरे**
सहा. पोलीस निरीक्षक
खारघर पोलीस ठाणे,
नवी मुंबई



**महेंद्र सूर्यवंशी**
सहा. पोलीस
उपनिरीक्षक
खारघर पोलीस ठाणे,
नवी मुंबई



**उमेश नेवारे**
पोलीस अंमलदार
खारघर पोलीस ठाणे,
नवी मुंबई



**रमेश सैंदाणे**
पोलीस अंमलदार
खारघर पोलीस ठाणे,
नवी मुंबई



**मंगेश सावंत**
पोलीस अंमलदार
खारघर पोलीस ठाणे,
नवी मुंबई

स्वत: कायद्याची पदवीधर होती. दोन्ही मुले वैद्यकीय शिक्षण घेत होती. छान चौकोनी कुटुंब होते.

त्यांच्या मनातली अस्वस्थता प्रत्येक क्षणाला वाढत चालली होती. शेवटी न राहवून त्यांनी आपल्या मित्राला, जो त्यांचा फॅमिली डॉक्टरही होता त्याला, फोन केला.

''हॅलो''

''अरे धनंजय, माझं एक काम होतं बाबा...'' त्यांच्या स्वरातली तातडी, घालमेल ऐकून धनंजयला आश्चर्य वाटले. अतिशय शांत, संयमी अशा आपल्या मित्राकडून त्याला हे वर्तन अपेक्षित नव्हते.

''काय रे, काय झालं? खूप डिस्टर्ब्ड वाटतोयस...''

''हो ना.. संध्याकाळपासून विशाखाला फोन करतोय पण ती उचलत नाहीये. काय झालंय कळायला मार्ग नाही. तू जरा घरी जाऊन बघतोस का? आणि काय असेल तसं मला लगेच कळव.''

''ओके बाबा! रिलॅक्स!! मी लगेच जातो आणि चेक करून तुला फोन करतो. ठीक आहे?''

''हां हां... ठीक आहे. थँक्स!



**लिफ्टच्या दरवाजाच्या समोरच रमाकांतचा फ्लॅट होता. आश्चर्य म्हणजे फ्लॅटचा दरवाजा उघडा होता. मात्र घरात अंधार होता. धनंजयने घरात शिरून आधी हॉलमधला दिवा लावला.**

चल, फोन ठेवतो,'' असे म्हणत धनंजयच्या प्रतिसादाची वाटही न बघता जज साहेबांनी फोन ठेवून दिला.

स्वतःशीच नवल करत धनंजयने गाडी काढली आणि जज साहेबांच्या घराच्या दिशेने भरधाव सोडली.

पंधरा मिनिटांमध्ये तो त्यांचे घर असलेल्या इमारतीपाशी पोहोचला. धावतच त्याने लिफ्ट पकडली आणि सहाव्या मजल्याकडे जाणारे बटन दाबले.

लिफ्टच्या दरवाजाच्या समोरच रमाकांतचा फ्लॅट होता. आश्चर्य म्हणजे फ्लॅटचा दरवाजा उघडा होता. मात्र घरात अंधार होता. धनंजयने घरात शिरून आधी हॉलमधला दिवा लावला. आणि समोर दिसणाऱ्या दृश्याने तो हादरून गेला. त्याच्या हृदयाचे ठोके जलदगतीने पडू लागले.

समोरच रक्ताच्या थारोळ्यात विशाखाचा मृतदेह पडला होता. तिच्या चेहऱ्यावर, गळ्यावर, हातांवर, बगलेत सर्वत्र जखमा होत्या. डाव्या हाताची करंगळी तुटलेली होती. फरशीवर रक्तात माखलेले फूटप्रिंट्स होते. खुनी त्या रक्ताच्या थारोळ्यातून चालत गेल्याचे दिसत होते.

कसेबसे स्वत:वर ताबा मिळवत त्याने रमाकांतला फोन करून ही गोष्ट कळवली आणि लगोलग पोलिसांना फोन केला.

या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीकांत शिंदे आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पोहोचताच पोलिसांनी घराची बारकाईने तपासणी करायला सुरुवात केली. दोन्ही बेडरूममधील कपाटे उघडून त्यातील सामान चोरट्यांनी इकडेतिकडे पसरून ठेवले होते. खोलीतल्या फरशीवर तसेच दिवाणवर अनेक वस्तू विखरून पडलेल्या होत्या. बाजूला एक छोटी पर्स पडलेली होती. त्यामध्ये दहा रुपयांच्या एक-दोन नोटा होत्या. बाथरूममध्ये देखील रक्ताचे डाग आणि रक्ताने माखलेल्या पाऊलखुणा होत्या. सोफा, खिडकीचे काचेचे तावदान या ठिकाणीही रक्ताचे डाग दिसत होते.

''फोन कोणी केला होता?'' तिथे जमलेल्या लोकांना साहेबांनी विचारणा केली.

''सर, मी फोन केला होता. मी डॉक्टर धनंजय. यांचा फॅमिली डॉक्टर आणि जज साहेबांचा मित्र पण.''

''आय सी..''

''शी इज डेड! मी चेक केलं. आणि डेथ होऊन चार-पाच तास तरी झाले असावेत.'' धनंजयने सांगितले.

या माहितीच्या आधारे एफआयआर दाखल करण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचांच्या समक्ष पंचनामा केला. तसेच इनक्वेस्ट पंचनामाही करण्यात आला.

घटनास्थळाचा नकाशा तयार करण्यात आला. त्याचप्रमाणे घटनास्थळाचे आणि मृतदेहाचे फोटो घेण्यात आले. विशाखा यांचा मृतदेह पोस्टमॉर्टेमसाठी पाठवण्यात



**प्राथमिक चौकशीला सुरुवात झाली. शेजारीपाजारी, सोसायटीचा वॉचमन यांच्याकडे पोलीस 'कुणाला मयत विशाखा यांच्या घरी जाताना पाहिलं आहे का?' याबद्दल विचारू लागले.**

आला. त्याआधी मृत महिलेचे कपडे ताब्यात घेण्यात आले. फॉरेन्सिक तज्ज्ञांना घटनास्थळी पाचारण करून घटनास्थळी मिळालेले रक्ताचे नमुने, पायांचे ठसे, केस, घरात विखुरलेले काचांचे तुकडे, त्वचेचे नमुने हा सर्व मुद्देमाल तपासणीसाठी संकलित करून प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आला.

आता पोलिसांसमोर सगळ्यात मोठे आव्हान होते, ते म्हणजे गुन्हेगाराला शोधणे आणि तेही शक्य तितक्या लवकर.

प्राथमिक चौकशीला सुरुवात झाली. शेजारीपाजारी, सोसायटीचा वॉचमन यांच्याकडे पोलीस 'कुणाला मयत विशाखा यांच्या घरी जाताना पाहिलं आहे का?' याबद्दल विचारू लागले. पण फार काही हाती लागेना. मात्र ही चौकशी सुरू असतानाच एक मध्यमवयीन मनुष्य पोलिसांकडे आला.

''साहेब, मी विशाखाचा चुलत भाऊ. मला या केसच्या संदर्भात काहीतरी सांगायचं आहे.''

शिंदे साहेब त्याला घेऊन बाजूला गेले. दोघांमध्ये काहीतरी बोलणे झाले. नंतर तो तिथून निघून गेला तेव्हा साहेब आपल्या सहकाऱ्यांकडे परत आले. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. जणू काहीतरी हरवलेले गवसले होते...

त्यांनी एका चिठोऱ्यावर काहीतरी खरडले आणि तो कागद आपल्या सहकारी अंमलदारांकडे दिला.

''हा आपला पहिला सस्पेक्ट. यांच्या फॅमिलीला चांगला ओळखतो. त्याचे डिटेल्स मिळवा. लवकरात लवकर...''

''येस सर!''

पुढच्या पंधरा मिनिटात पोलिसांची गाडी शहराच्या जुन्या वस्तीकडे धावू लागली. त्यांच्या हातात फार महत्त्वाचा तपशील आला होता. या निर्घृण हत्या प्रकरणातील संशयित व्यक्तीचा अचूक पत्तादेखील मिळाला होता. आता फक्त ती व्यक्ती त्या जागी सापडायला हवी अशी पोलीस मनोमन प्रार्थना करत होते.

आणि सुदैवाने त्यांची ही प्रार्थना फळाला आली.

त्या बैठ्या चाळींमधल्या एका खोलीच्या समोर पोलिसांनी आपली गाडी थांबवली आणि दारावरची बेल वाजवली. डोळे चोळत दार उघडणाऱ्या त्या माणसाला काही समजायच्या आत पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

***

''हे बघ, आधीच सांगून ठेवतो– खोटं बोलायचं काम नाही. तू त्या विशाखा मॅडमच्या घराच्या बाहेर असताना त्यांच्या भावाने तुला बघितलंय. तू तिथे घुटमळत होतास... त्यांच्याकडे बघून तू तोंड फिरवून घेतलंस, पण त्यांनी तुला बघितलं. आता फक्त एवढं सांगायचं– काय प्लान होता? चोरी केलेला माल कुठे दडवला आहे? आणि तुझे साथीदार कोणकोण आहेत...''

डोळे चोळत त्या माणसाने काहीच कळत नसल्यासारखे साहेबांकडे बघितले.

''बघतोस काय नुसता! बोल, तू खून केलास ना त्यांचा?''

''खू खू खूऽऽऽन? क क काय बोलता काय साहेब?? मला काही टोटल लागत नाहीये तुम्ही काय बोलताय त्याची! कोणाचा खून?''

''हे बघ जास्त शहाणपणा करू नकोस. बऱ्या बोलाने तू काय काय केलं आहेस ते सांगून टाक. तुला इथे बघितलेले दोन तीन साक्षीदार



**पुढच्या पंधरा मिनिटात पोलिसांची गाडी शहराच्या जुन्या वस्तीकडे धावू लागली. त्यांच्या हातात फार महत्त्वाचा तपशील आला होता. या निर्घृण हत्या प्रकरणातील संशयित व्यक्तीचा अचूक पत्तादेखील मिळाला होता.**

तुझ्यासमोर आणून उभे करतो. मग बघू स्वतःचा कसा बचाव करतोस ते.''

''काय बोलताय तुम्ही साहेब?''

''तू ड्रायव्हर आहेस ना? अरुण नाव ना तुझं?''

''जी साहेब.''

''मॅडमकडे कामाला आहेस?''

''नाही साहेब. नेहमी नाही. कधी त्यांचा नेहमीचा ड्रायव्हर नसेल तर त्या मला बोलवतात.''

''बरं. आता सांग, तुझे साथीदार कोण कोण आहेत? आणि चोरी केलेला ऐवज कुठे विकला किंवा लपवून ठेवलाय तुम्ही?''

अरुण काही कळत नसल्यासारखा त्यांच्याकडे बघत राहिला.

''हे बघ, उगाच वेळ घालवू नकोस. मला टाईमपास करणारी, दुसऱ्याचा वेळ खाणारी माणसं अजिबात आवडत नाहीत. जे काय असेल ते पटकन सांगून टाक. शक्य असेल तर तुझी शिक्षा कमी तरी करू आम्ही. पण आधीच सांगतो, तुम्ही जे काय केलंय ते पाहता तुमची इथून पुढची जिंदगी साधीसोपी असणार नाही हे नक्की.''

अरुणचा चेहरा कावराबावरा झाला. त्याने आपल्या इतर दोन साथीदारांची नावे सांगितली. त्यांचा इतर तपशीलही दिला.

पोलिसांनी त्यांनाही ताब्यात घेतले. तीन निर्ढावलेले गुन्हेगार पोलिसांच्या समोर बसले होते. आपल्या गुन्ह्याची त्यांनी कबुली दिली होती. आणि या प्रकरणाची कहाणी अंगावर काटा आणेल अशीच होती. अखेरीस अरुणने बोलायला सुरुवात केली.

''सांगतो साहेब. सगळं सांगतो. मॅडमची दोन्ही मुलं मेडिकलला आहेत. हे दोघंही नवरा बायको चांगले वरच्या पोस्टवर. त्यामुळे पगार चांगला. मुलं डॉक्टर झाल्यावर त्यांना जवळपास क्लिनिक उघडून द्यायचं म्हणून मॅडम जागा बघत होत्या, हे मला माहिती होतं.''

''कसं?''

''एकदा त्यांचा नेहमीचा ड्रायव्हर आला नव्हता म्हणून त्यांनी मला बोलावलेलं. एका इस्टेट एजंटच्या ऑफिसमध्ये जायचं होतं. त्या इस्टेट एजंटच्या ऑफिसमध्ये त्यांचं काय बोलणं झालं माहीत नाही. पण आपल्याला पण तेवढं डोकं आहे की साहेब! कळतं ना... माणसाकडे किती पैसा असेल, किती नाही. आणि खरंतर खूनबिन करायचा प्लॅन नव्हता आमचा. ते ऐनवेळी होऊन गेलं. त्या इस्टेट एजंटच्याही लक्षात आलं होतं, यांची झेप बरीच मोठी आहे. मग आम्ही प्लॅन केला. मी ओळखीचा असल्यामुळे मला बघून त्या दार उघडणार याची खात्री होती. त्यामुळे दुपारी माझ्या साथीदारांना घेऊन मी त्यांच्याकडे गेलो.''

''पुढे?''

''त्यांनी मला पाहून दार उघडलं. मग आधी ठरवल्याप्रमाणे मी मागे झालो आणि बाकीच्या दोघांना आत जा म्हणून खुणावलं. बाहेरून काही गडबड होऊ नये, म्हणून मी रेकी करत थांबलो.''

''तुम्ही दोघं आत जाऊन लूटमार आणि खून केला..''

उरलेल्या दोघांनी होकारार्थी मान हलवली.

''आम्ही आत गेल्यागेल्या त्या बाईला चॉपरचा धाक दाखवला आणि पैशांची डिमांड केली. काही दागिने, सोनंनाणं जे काय असेल ते दे असंही सांगितलं. पण तिने विरोध



**''... त्या इस्टेट एजंटच्या ऑफिसमध्ये त्यांचं काय बोलणं झालं माहीत नाही. पण आपल्याला पण तेवढं डोकं आहे की साहेब! कळतं ना... माणसाकडे किती पैसा असेल...''**

केला. घरात पैसे नाहीयेत म्हणाली. आमचा विश्वास नाही बसला. असं कसं होईल? एखादा महत्त्वाचा फोन करायला जावं आणि रॉंग नंबर लागावा असं वाटलं. टाळकंच सटकलं एकदम. सपासप चॉपर चालवला दिसेल तिथे. नंतर जेवढा जमेल तेवढा हात मारला, तिच्या अंगावरचे दागिने काढून घेतले आणि पळून गेलो.''

''चोरी केलेला मुद्देमाल कुठे ठेवला? आणि मर्डर वेपन? ते कुठे टाकलं?''

त्यांनी आवश्यक तो तपशील दिला. आरोपी क्र. १ कडून मेमोरंडम पंचनाम्यान्वये गुन्ह्यात वापरलेले चॉपर, आरोपींचे मोबाईल फोन, ४ घड्याळे, चोरी केलेल्या बांगड्या व अंगठी तसेच गुन्ह्याच्या वेळी त्याने घातलेले रक्ताने माखलेले कपडे जप्त केले. आरोपी क्र. २ कडून मेमोरंडम पंचनाम्यान्वये १ मंगळसूत्र, १ मोटार सायकल, १ कोयता व गुन्ह्याच्या वेळी त्याने घातलेले शरीरावर असणारे रक्ताने माखलेले कपडे जप्त केले. आरोपी क्र. ३ कडून मेमोरंडम पंचनाम्यान्वये गुन्ह्यात चोरी करण्यात आलेल्या बांगड्या, १ मोटार सायकल तसेच गुन्ह्याच्या वेळी त्याने घातलेले शरीरावर असणारे रक्ताने माखलेले कपडे जप्त केले. तपासाच्या दरम्यान मयताचे पीएम नोट्स प्राप्त केले. घटनास्थळी आरोपींना येताना व जाताना पाहणारे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या जबान्या नोंदवून घेण्यात आल्या. तसेच आरोपींची ओळख परेड घेण्यात आली. साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. तसेच महत्त्वाच्या साक्षीदारांचे सीआरपीसी १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले. आरोपींचे सीडीआर व एसडीआर यांची तांत्रिक माहिती प्राप्त करण्यात आली.

गुन्ह्याच्या तपासकामी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा तपासणीकरिता प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आला. तपासणीकरिता पाठविलेल्या सर्व मुद्देमालाचा अहवाल प्राप्त केला. गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

तिन्ही आरोपींना मा. न्यायालयाने दोषी ठरवले असून त्याला भादंवि कलम ३०२, ३४ अन्वये आजन्म सश्रम कारावास व ५०,००० रुपये दंड, भादंवि कलम ३९२, ३४ अन्वये १० वर्षे सश्रम कारावास व १०,००० रुपये दंड, भादंवि कलम ३९४, ३४ अन्वये आजन्म सश्रम कारावास व १०,००० रुपये दंड, भादंवि कलम ३९२, ३४ अन्वये ७ वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

खारघर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक श्रीकांत शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक हणमंत डेरे, सहा. पोलीस उपनिरीक्षक महेंद्र सूर्यवंशी तसेच पोलीस अंमलदार उमेश नेवारे, रमेश सैंदाणे आणि मंगेश सावंत यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# ना अबला महिला सबला तू

**महिला राज्ञी तुझी कहाणी**
**तू न राहिली आता अडाणी**

**गगनातूनही झेप तुझी**
**वैमानिक होऊन भरारी**
**पराक्रमी तू ज्ञानी विज्ञानी**

**पुरुषांच्याही बरोबरीने.**
**लढवय्यी तू रण रागिणी**
**सर्वही क्षेत्रामध्ये अग्रणी**

**तू देशाची रक्षणकर्ती**
**तू अभियंता तू यांत्रिकी**
**उच्चपदी तू विराजमानी**

**शिक्षणाची तू पवित्र गंगा**
**शिक्षण क्षेत्रातही उत्तुंगा**
**वात्सल्य नि ममतेची कहाणी**

**सैनिक तू परिचारिकाही तू**
**संपादक, लेखिकाही तू**
**डॉक्टरही तू प्राणरक्षिणी**



**दत्तात्रय जोशी**
**पुणे**

# भिंगरी



दिनेश भदाणे
सहा. पोलीस निरीक्षक
शहादा पोलीस ठाणे,
नंदुरबार

**भिंगरी गेली. स्वत:च्याच साडीने गळा आवळल्याचे निमित्त होऊन गेली. तिची काय चूक होती, ज्याची एवढी कठोर शिक्षा तिला मिळाली? लग्न करून आयुष्यात स्थैर्य येण्याच्या ऐवजी नवऱ्याचा मार खाणे ज्यांच्या नशिबात आहे अशा कित्येक भिंगरी आज समाजात आहेत. त्यांना न्याय देण्याची जबाबदारी फक्त कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची आहे का?**



कपाळावर झालेल्या जखमेला हळदीचा लेप लावत भिंगरी उसासे टाकत होती. स्पर्श होताच चुरचुरणारी जखम मनातल्या कोलाहलामुळे जास्तच ठसठसत होती. भिवाला आतापर्यंत तिने खरेतर कधीच सोडून दिले असते. त्याच्या रोजच्या मारझोडीला आणि शिवीगाळीला कंटाळून तिने किमान शंभरदा तसा विचार केला होता. पण ते शक्य झाले नव्हते. बाईच्या जातीला नुसती उरात हिंमत अन मनगटात ताकद असून भागत नाही,



**संदीप लाडगे**
**पोलीस अंमलदार**
**शहादा पोलीस ठाणे,**
**नंदुरबार**

कपाळावरचे कुंकूही तितकेच मजबूत पाहिजे अशा विचारसरणीच्या कुटुंबातून ती आली होती. आपल्या मारकुट्या नवऱ्याची ती अनेकदा माहेरी तक्रार करत असे. पण तिचे ऐकून घेऊन तिची बाजू उचलून धरणारे आणि भिवाला जाब विचारणारे कुणीही नव्हते. उलट तिचा भाऊ शांताराम काहीबाही बोलून तिची समजूत घालत असे आणि तिला नांदायला परत सासरी पाठवत असे. अजून एक म्हणजे तिच्या पदरी सहासात वर्षाचा मुलगा होता. त्याच्याकडे पाहून तिला संसार टिकवणे भागच होते. त्यामुळे ती कसाबसा आलेला दिवस ढकलत होती.

इकडे बहिणीला समजावून घरी पाठवून दिले तरी शांतारामला चैन पडत नसे. आपल्या बहिणीवर त्याचे निरतिशय प्रेम होते. पण जनरीत टाळण्याची, लोकापवाद करण्याची त्याच्यात हिंमत नव्हती. सुरुवातीला अनेक कुरबुरी, वादविवाद असलेले त्याच्या काही मित्रांचे संसार हळूहळू मार्गावर आल्याचे त्याने पाहिले होते. तसेच आपल्या बहिणीचेही संसाराचे गाडे हळूहळू का होईना रूळावर येईल या आशेवर तो तग धरून होता. संसार कोल्हापुरी चपलेसारखाच असतो... सुरुवातीला करकरीत असतो तोवर जखमा करणारच, अशी त्याची समजूत होती. त्याचे हे बोलणे भिंगरीला पटायचे की नाही देव जाणे, पण ती आल्या पावली



**इकडे बहिणीला समजावून घरी पाठवून दिले तरी शांतारामला चैन पडत नसे. आपल्या बहिणीवर त्याचे निरतिशय प्रेम होते. पण जनरीत टाळण्याची, लोकापवाद करण्याची त्याच्यात हिंमत नव्हती.**

परत जायची.

***

तो दिवस नेहमीसारखाच उगवला होता नि सरतही आला होता. आज आपल्या आयुष्यात काय उलथापालथ होणार आहे याची शांतारामला थोडीदेखील कल्पना नव्हती. दुपारचे सव्वाचार वाजले होते. आपल्या घराच्या पडवीत बसून चहा पित असताना शांतारामला दुरूनच आपला भाचा बजरंग आपल्या घराच्या दिशेने पळत येताना दिसला. त्याला असे अवेळी येताना पाहून त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. बजरंग जवळ आला तेव्हा त्याचा रडवेला चेहरा बघून शांतारामच्या काळजाचा ठोका चुकला.

''काय रे बाळा, काय झालं? एवढा पळतपळत आलास ते...''

''मामा, लवकर चला. तिकडं बांधावर बा आईला लै मारून ऱ्हायला.''

''काय बोलतोस? ये ये... असा इकडे ये. नीट सांग काय झालं ते...''

''हांऽऽ. सांगतो.'' बजरंग धापा टाकत सांगू लागला, ''आम्ही तिघं सकाळपास्नं जंगलात गेलेलो सर्पण गोळा करायला. काम झालं, मग दुपारी भाकरी खाल्ली. मग आई आनि बा त्या तिथंच झाडाखाली झोपले. मंग आई जरा वेळानं उठून ओढ्यापाशी गेली पानी आणायला. ती आली तोवर बा उठलेला. मग 'तू नक्की कुठं गेली होतीस' म्हणून भांडायला सुरुवात केली बानं. मग आईपन कायतरी बोलली. दोघं लय भांडायला लागले. बा ज्याम भडकला. त्यानं आईला बडवायला सुरुवात केली. आधी मारलं आनि

मग आईचा गळा बी आवळला साडीनं. आई काहीच बोलून नाही ऱ्हायली, मामा. मला भीती वाटत्ये. चला ना तुम्ही...''

शांताराम ताडकन उठला. त्याने बजरंगला जवळ घेऊन थोपटले आणि आपल्या बायकोच्या हवाली केले. त्यानंतर गावातल्या दोनचार जणांना बरोबर घेऊन तो जंगलाच्या दिशेने निघाला.

***

बजरंगने वर्णन केलेल्या जागी, जंगलापासच्या जुन्या बांधापाशी ते आले तेव्हा त्यांना बांधापलिकडे असलेल्या उसाच्या शेतात भिंगरी जमिनीवर निपचित पडलेली आढळली. त्यांच्यातल्या एकाने दूरवर भिवाला जंगलाच्या दिशेने पळताना पाहिले. त्याचबरोबर त्यांच्यातल्या कुणीतरी पोलिसांना फोन करून या घटनेची माहिती दिली.

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा पोलीस ठाण्यात या प्रकरणाची माहिती मिळताच तेथील सहायक पोलीस निरीक्षक दिनेश भदाणे आपल्या सहकारी अंमलदारांसह घटनास्थळी दाखल झाले.

समोरच एक पस्तिशीची स्त्री निपचित पडली होती. तिच्या गळ्याभोवती साडी आवळण्यात आली होती.

''जरा चेक करा...'' भदाणे साहेबांनी आपल्या सहकारी अंमलदारांना सांगितले.

सहकारी अंमलदारांनी त्या महिलेचा श्वासोच्छवास, नाडी या गोष्टी तपासल्या. काहीही हालचाल नव्हती. त्यांनी साहेबांकडे पाहून नकारार्थी मान हलवली.

''बॉडी पोस्टमॉर्टेमला पाठवा.'' ते म्हणाले, तसा शांताराम



**बजरंगने वर्णन केलेल्या जागी, जंगलापासच्या जुन्या बांधापाशी ते आले तेव्हा त्यांना बांधापलिकडे असलेल्या उसाच्या शेतात भिंगरी जमिनीवर निपचित पडलेली आढळली. त्यांच्यातल्या एकाने दूरवर भिवाला जंगलाच्या दिशेने पळताना पाहिले.**

चटकन उठला.

''बॉडी? साहेब काय बोलताय? माझी बहीण आहे ती...''

''माफ करा. पण त्या जिवंत नाहीयेत. मृत्यूचं कारण शोधण्यासाठी आणि गुन्हेगाराचा शोध घेण्यासाठी पोस्टमॉर्टेम करावं लागेल.''

''गुन्हेगार तर हिचा नवराच आहे साहेब. त्या नराधमाने माझ्या बहिणीची ही गत केलीय. सोडू नका त्याला...'' तो आक्रोश करत म्हणाला.

''नक्कीच.'' साहेब त्याच्या खांद्यावर थोपटत त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत म्हणाले, ''त्याआधी मला सांगा, दोघा नवराबायकोंचं काय बिनसलं होतं?''

''काय सांगणार साहेब... लै मारायचा तो माझ्या बहिणीला. सतत संशय. म्हणे तुझं बाहेर लफडं हाय... साहेब, माझी बहीण तसली नव्हती. मीच तर कितींदा समजावला असेल त्याला. पण काऽऽही उपयोग नाय झाला. शेवटी त्या चांडाळानं जे करायचं तेच केलं.''

''बरं, तुम्हाला ही गोष्ट कुठून कळली? म्हणजे तुमच्या बहिणीवर तिच्या नवऱ्याने हल्ला केल्याचं तुम्हाला कसं कळलं?''

''माझा भाचा सांगत आला साहेब मगाशी. हे तिघं जण सरपण गोळा करायला इकडे आले होते. काहीतरी वादावादी झाली आणि त्याने तिला मारायला सुरुवात केली. आणि नंतर साडीने गळा आवळला. माझ्या भाच्याने मला येऊन सगळं सांगितलं. मग गावातल्या चार लोकांना घेऊन मी

इकडे आलो.''

''तुमचा भाचा कुठे आहे आत्ता?''

''घरी आहे तो. माझ्या बायकोजवळ.''

तेवढ्यात जमलेल्यांपैकी एकजण पुढे आला.

''साहेब, मी तिच्या नवऱ्याला तिकडे जंगलाकडे पळून जाताना पाहिलं. आता थोड्या वेळापूर्वीच.'' असे सांगत त्या जंगलाच्या दिशेने हाताने निर्देश केला.

साहेबांनी आपल्या सहकाऱ्यांना खूण केली आणि सगळेजण त्याचा शोध घेण्यासाठी जंगलात शिरले.

काही वेळातच पोलिसांना तो दिसला. त्याच वेळी त्याने मागे वळून पाहिले तेव्हा आपल्या मागावर असलेल्या पोलिसांशी त्याची नजरानजर झाली. जीव खाऊन त्याने पळायला सुरुवात केली. पण पळून पळून कितपत नि कुठवर पळणार! शेवटी तो पोलिसांच्या हाती लागलाच.

त्याला गाडीत घालून पोलिसांची गाडी शहादा पोलीस ठाण्याच्या दिशेने धावू लागली. गाडीतही तो मोठ्या दिमाखात बसला होता. उद्दामपणे पोलिसांच्या नजरेला नजर देत होता. त्याच्या चेहऱ्यावर भीती, लाज, शरम, पश्चात्ताप यापैकी काहीही नव्हते.

***

''बोल रे! का मारलंस तू तुझ्या बायकोला?''

''का मारलं म्हणजे? तिची तीच लायकी होती..'' भिवाच्या डोळ्यातली मग्रुरी कायम होती.

''तू कोण तिची लायकी ठरवणारा? असं काय केलं होतं तिने?''



**काही वेळातच पोलिसांना तो दिसला. त्याच वेळी त्याने मागे वळून पाहिले तेव्हा आपल्या मागावर असलेल्या पोलिसांशी त्याची नजरानजर झाली. जीव खाऊन त्याने पळायला सुरुवात केली.**

''तुम्हाला माहिती नाही साहेब...'' तो हळू आवाजात एखादे रहस्य सांगत असल्याच्या आविर्भावात म्हणाला, ''बाहेर लै लफडी होती तिची.''

''कुणाबरोबर लफडी करणारे ती? तू तर फार कोणाकडे जाऊ येऊ पण देत नव्हतास तिला...''

''कसा जाऊ देईन? कुठे बी टाका भिडवणारी बायको असली की तिला असं आकळावंच लागतं...''

''तुझ्याकडे पुरावा आहे काही तिचे कोणाबरोबर प्रेमसंबंध होते याचा?''

भिवा गप्प बसला.

दरम्यान पोलिसांनी बजरंग याचादेखील सीआरपीसी १६४ अन्वये जबाब नोंदवून घेतला. पोलिसांनी चौकशी पंचनामा तयार केला. गुन्ह्याच्या वेळी आरोपीच्या शरीरावर असणारे कपडे जप्त केले. तसेच मयताचे पीएम नोट्स प्राप्त केले. साक्षीदारांचा जबाब नोंदवण्यात आला. गुन्ह्याच्या तपासकामी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल तपासणीकरिता प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठवण्यात आला. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

आरोपीला भादंवि कलम ३०४ (भाग २) अन्वये आठ वर्षे सश्रम कारावास व १०,००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. शहादा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक दिनेश भदाणे व पोलीस अंमलदार संदीप लाडगे यांनी या प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे.


■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



मोनिका जेजोट
पोलीस उपनिरीक्षक
दिंडोरी पोलीस ठाणे,
नाशिक ग्रामीण

# कोडे

आईचे जग म्हणजे तिचे मूल. मुलाला जन्म दिल्यानंतर स्त्रीचे प्राधान्यक्रम बदलतात. निसर्गात सगळीकडेच ही गोष्ट दिसून येते. आपल्या मुलांवर आई केवळ मायाच करत नाही, तर त्यांच्याकडे बारीक लक्ष ठेवून असते. असे असताना चौदा पंधरा वर्षाची राणी गरोदर असलेली तिच्या आईला न समजणे हे पोलिसांना न उलगडलेले कोडेच होते. कुणाचे पाप ती वाढवत होती? या कोड्याचे उत्तर मिळाले का?



ऐन दुपारची वेळ. बाहेर कुण्या लहान बाळाच्या रडण्याच्या आवाजामुळे दिनकरची झोपमोड झाली. स्वत:च्याच नशिबाला शिव्या घालत त्याने कूस बदलून परत झोपण्याचा प्रयत्न केला खरा, पण व्यर्थ! काल नाईट शिफ्ट केल्यामुळे त्याचे डोळे जडावलेले होते. आत्ता त्याला झोपेची नितांत गरज होती. आणि तेच शक्य होत नव्हते.

खिडकीच्या बाजूने एका लहान बाळाच्या सतत रडण्याचा आवाज येत होता. पार बेंबीच्या



**कमलेश देशमुख**
पोलीस अंमलदार
दिंडोरी पोलीस ठाणे,
नाशिक ग्रामीण



**सुजित इंगळे**
पोलीस अंमलदार
दिंडोरी पोलीस ठाणे,
नाशिक ग्रामीण

देठापासून रडत असावे असा.

त्या रडण्याच्या आवाजातही मिश्र छटा होत्या. मध्येच मांजराच्या पिलासारखा केविलवाणा कुईऽ कुईऽ असा बारीक स्वर... मध्येच जोरदार पसरलेले भोकाड... मग क्वचित एखाद दोन सेकंदांची शांतता... झोप लागेना तसा दिनकर हेच ऐकत बसला. त्याच्या लक्षात आले की या रडण्यातही एक पॅटर्न आहे. पण मग पाचएक मिनिटे गेल्यानंतर त्या रडण्याचा त्याला चांगलाच वैताग व्हायला लागला. 'कोणाचं असेल हे मूल? आणि याची आई काय करतेय आता? त्याला भूकबिक लागली असेल तर खायला द्यावं ना! झेपत नाही तर जन्माला कशाला घालतात पोरं?' तो स्वतःशीच बडबडला आणि खिडकीचा पडदा दूर सारून त्याने आवाजाच्या दिशेला बघितले. मात्र तिथे सरळसरळ काही दिसत नव्हते. एक तर तिथे गच्च झाडी होती. त्यामुळे तिथे कोणी माणूसकाणूस असण्याची फारशी शक्यता नव्हती. बरे, त्या चाळीच्या पुढच्या भागात जी बिऱ्हाडे होती त्यांच्यापैकी कुणाचीही मुले इतकी लहान नव्हती. कुणाच्या घरी पाहुणे आले असतील आणि त्यांच्यातले एखादे लहान मूल रडत असेल तर गोष्ट वेगळी. पण सहा सात बिऱ्हाडांमध्ये कालपर्यंत तरी कोणी पाहुणे वगैरे आल्याचे त्याने ऐकले नव्हते.

शेवटी तो दार उघडून बाहेर



**दिनकर थबकला. आश्चर्याने त्याने आ वासला. कोणाचं मूल असेल हे? कोण असं याला टाकून गेलं असेल? त्याने घाईघाईने आजूबाजूच्या चाळीतल्या दोघा तिघांना बोलावून ते दृश्य दाखवले.**

पडला आणि आवाजाच्या रोखाने चालू लागला. जसजसा तो त्या झाडीकडे गेला तसतसा रडण्याचा आवाज अधिकाधिक स्पष्ट होत गेला. त्या झाडांच्या राईत त्याने पाऊल ठेवले आणि समोरच एक नवजात लहान मुलगी रडताना दिसली. जेमतेम एखाददोन दिवसांचे बाळ असेल. अंगावर एकही कपडा नव्हता तिच्या!

दिनकर थबकला. आश्चर्याने त्याने आ वासला. कोणाचं मूल असेल हे? कोण असं याला टाकून गेलं असेल? त्याने घाईघाईने आजूबाजूच्या चाळीतल्या दोघा तिघांना बोलावून ते दृश्य दाखवले. सगळ्यांनाच ते पाहून धक्का बसला. कोणी आपल्या एवढ्याएवढ्या मुलीला– जिने अजून धड डोळेही उघडले नव्हते तिला– इथे असे सोडून दिले होते? कोणालाच काही समजेना. अखेरीस त्यांच्यातल्या एकाने दिंडोरी पोलीस स्टेशनला फोन लावला.

नाशिक ग्रामीण अंतर्गत दिंडोरी पोलीस स्टेशनमध्ये या घटनेबाबत माहिती मिळाल्याबरोबर पोलीस घटनास्थळाच्या दिशेने निघाले. ते घटनास्थळी पोहोचले त्यावेळी तिथे बघ्यांची बऱ्यापैकी गर्दी झालेली होती. पोलिसांनी त्यातल्या एक दोघांकडे चौकशी केली त्यावेळी या बाळाला कोणी ओळखत नसल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान जवळच्याच ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांना पाचारण करण्यात आले. त्यांनी त्या बाळाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करून घेतले. दुसरीकडे पोलिसांनी दोन पंचांना घटनास्थळी बोलवून घेतले व त्या दोन पंचांसमक्ष गुन्ह्याच्या घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

आता सर्वप्रथम त्या बालिकेच्या आईवडलांचा पत्ता शोधणे गरजेचे होते.

''सगळ्यात आधी इथे जवळपास राहणाऱ्यांकडे चौकशी करायला हवी. मला वाटतं, हे जवळच राहणाऱ्या कुणाचं तरी काम असलं पाहिजे.'' दिंडोरी पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक मोनिका जेजोट यांनी मत मांडले.

त्याप्रमाणे चाळीतल्या प्रत्येक कुटुंबाकडे पोलिसांनी चौकशी सुरू केली. आणि त्यातूनच त्यांना या तपासाच्या दृष्टीने दिशा गवसली.

***

''तुमच्या घरी इतक्यात कुणाची डिलीव्हरी झाली का?'' मॅडम त्या बिऱ्हाडांपैकी एका ठिकाणी चौकशी करत असताना समोरच्या स्त्रीच्या चेहऱ्याचा रंग उडाला. काहीही न बोलता ती फक्त टकामका बघत राहिली.

ती बहुधा उत्तर भारतीय असावी असे तिच्याकडे पाहून वाटत होते. केसांमध्ये भागात सिंदूर भरलेला, नाकात ठसठशीत चमकी वगैरे. एकंदर साडी नेसण्याची पद्धतपण तशीच. तिचे वय चाळीस-पंचेचाळीसच्या आसपास असेल.

''जवाब तो दो मॅडम! आपके घर में हाल ही में किसी की डिलीव्हरी हुई है क्या? या ऐसी किसी औरत को आप जानती हो क्या?'' ती स्त्री नजर चोरू लागली.

''ज..जी.. क्या.. क्या बात है मैडम? हमे काहे पता? है ना रे दीपक?'' ती बाजूला उभ्या असलेल्या एका तरुणाकडे बघून बोलली.

नक्कीच काहीतरी गडबड होती. त्या स्त्रीची देहबोली बरेच काही



**ती बहुधा उत्तर भारतीय असावी असे तिच्याकडे पाहून वाटत होते. केसांमध्ये भागात सिंदूर भरलेला, नाकात ठसठशीत चमकी वगैरे. एकंदर साडी नेसण्याची पद्धतपण तशीच.**

सांगत होती.

''जरा इधर आओ... इस तरफ,'' मॅडमनी तिला सूचना केली. तरी ती जागची हालेना.

''इधर आओ! पूछताछ करनी है...'' त्यांचा आवाज चढला, तशी ती स्त्री घाबरत घाबरत त्यांच्यापाशी आली.

''ये किसकी बेटी है?''

''मेरी बेटी की...''

''तो? इसको ऐसे यहां क्यूं फेक दिया? त्या एवढ्याशा जिवाने काय पाप केलं होतं?''

''ती पोरगीच पापातून जलमली आहे. हम क्या करे?''

''तुमची मुलगी कुठे आहे? या बाळाची आई.. ती कुठे आहे?''

तिने आपल्या मुलीला हाक मारली तशी घरातून एक चौदापंधरा वर्षाची मुलगी बाहेर आली.

तिला बघून मॅडमना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना धक्का बसला. इतक्या लहान वयात तिच्यावर ही वेळ यावी!

''बाळ तुझं आहे?'' त्या मुलीने मान डोलावली.

''वडील कोण त्याचे?''

ती काही न बोलता गप्प बसली. मान खाली घालून.

''बोल लवकर. त्याशिवाय आम्ही जाणार नाही इथून.''

अखेर बरेच आढेवेढे घेतल्यानंतर तिने सांगितले, ''शेजारच्या हुकुमचंदजींचं...''

''तुझा आणि त्यांचा काय संबंध?''

''मी त्यांच्याकडे ट्युशनला जायची.''

''एकटीच?''

''हां. स्पेशल ट्युशन देईन म्हणाले आणि ते पण जास्त पैसे न घेता.''

''बरं पुढे?''

''पाचवीत असल्यापासून मी त्यांच्याकडे शिकवणीला जात होते. मी सहावीत असताना एकदा त्यांनी बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. मी खूप रडले, ओरडले, पण त्यांनी काहीच ऐकलं नाही माझं. वर सगळं झाल्यावर 'बाहेर कुठे बोलू नको, नाहीतर हे परत परत होत राहील' अशी धमकी दिली. म्हणून मी गप्प राहिले. पण तरी त्यांनी हे चालूच ठेवलं.''

''घरच्यांना माहिती नव्हतं?''

''नाही. मी कुठेच बोलले नाही.''

''तू प्रेग्नंट राहिल्याचं कधी कळलं घरच्यांना?''

''बरंच नंतर... पेट दिखने लगा उसके बाद.''

'कमाल आहे हिच्या आईची! हेच का लक्ष मुलांकडे? पोरीच्या आयुष्यात कुठे एवढंसं खुट्ट झालं, मुलगी लांब असेल आणि फोनवर बोलताना तिचा आवाज थोडासा लो वाटला तरी इकडे आईच्या काळजात धस्स होतं... आणि इथे ही पोरगी तिच्या आईच्या समोर पोटात एक जीव वाढवत होती, तरी त्या आईला कळलं नाही??' मॅडम स्वतःशीच आश्चर्य करत होत्या.

अखेरीस त्यांनी तिच्या आईलाही हा प्रश्न विचारला,

''हमको क्या मालूम ऐसा कुछ है? मुझे लगा, अच्छाखासा खाती पीती है, इसलिये वजन बढ रहा है... अगदी शेवटच्या शेवटच्या महिन्यात समजलं. आता



**पोरीच्या आयुष्यात कुठे एवढंसं खुट्ट झालं, मुलगी लांब असेल आणि फोनवर बोलताना तिचा आवाज थोडासा लो वाटला तरी इकडे आईच्या काळजात धस्स होतं...**

कोणाच्यातरी पापाचं पोर, आम्ही का म्हणून वाढवायचं? म्हणून ठरवलं, त्याला टाकून द्यायचं.'' तिची आई निर्विकारपणे बोलली.

''यांचा जबाब नोंदवून घ्या आणि फिर्यादी म्हणून यांची तक्रार दाखल करून घ्या. आणि हिची मेडिकल करण्याची व्यवस्था करा.'' त्यांनी आपल्या सहकारी अंमलदारांना सांगितले.

''येस मॅडम.''

मग त्या तिच्या आईकडे वळून म्हणाल्या,

''इसका बर्थ सर्टिफिकेट है? वयाचा दाखला लागेल आम्हाला.''

''जी हां..''

''वो दे दो इनको.''

''जी मॅडम जी..'' तिच्या डोळ्यांत अजूनही अविश्वास होता.

''केस फाईल करने के लिये लगेगा. तुमच्या मुलीचं वय अठरापेक्षा कमी आहे ना? जो कुणी गुन्हेगार आहे त्याला कडक शिक्षा व्हायला हवी ना?''

त्या बाईने होकारार्थी मान हलवली.

नंतर त्यांनी आजूबाजूला जमलेल्या लोकांना विचारले, ''हे हुकूमचंदजी आता कुठे असतील?''

''कंपनीत गेले असतील कामावर.'' एकाने सांगितले.

''कुठली कंपनी? नाव, ॲड्रेस सांगा.''

***

पोलीस दिलेल्या पत्त्यावर पोहोचले आणि त्यांनी हुकूमचंदला त्याच्या जागेवरूनच ताब्यात घेतले.

आता दुसरा धक्का बसण्याची पाळी आली. हुकूमचंद हा चक्क साठीचा म्हातारा माणूस होता. म्हणजे आपल्या मुलीपेक्षाही कमी वयाच्या मुलीबरोबर त्याने हे निंदनीय कृत्य केले होते.

''तुम्हाला कळतं का तुम्ही काय केलंय?''

''जी?''

''त्या शेजारच्या राणीबरोबर काय संबंध होते तुमचे? रेप केलात तुम्ही तिच्यावर! थोडीथोडकी नाही, तब्बल तीन–चार वर्षं. त्यातून तिला दिवस गेले. एका मुलीला जन्म दिला तिने...''

मॅडमच्या तोंडून हे सगळे ऐकत असताना हुकूमचंदचे डोळे आश्चर्याने विस्फारत गेले. आणि खरोखर त्याला आश्चर्याचा फार मोठा धक्का बसला असावा. राणीबरोबरचे संबंध, तिच्यावर त्याने केलेले अत्याचार त्याने कबूल केले. मात्र त्या संबंधांचा पुढे हा असाही परिणाम झाला आहे हे त्याच्या गावीही नव्हते. अर्थातच ही अविश्वसनीय गोष्ट होती. राणीचे गरोदर राहणे, तिच्या शरीरातले बदल या गोष्टी तिच्या आजूबाजूला वावरणाऱ्या कुणाच्याच कशा लक्षात आल्या नाहीत या कोड्याचे उत्तर अजूनही पोलिसांना मिळाले नव्हते.

आरोपित हुकूमचंद याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. पीडित मुलीचे आणि आरोपीचे गुन्हा घडतेवेळी अंगावर असलेले कपडे जप्त करण्यात आले. तसेच आरोपित व नवजात स्त्री बालक यांची डीएनए तपासणी करण्यात आली. सीआरपीसी १६४ अन्वये पीडित मुलगी आणि महत्त्वाचे साक्षीदार यांचा जबाब नोंदवण्यात आला. इतर साक्षीदारांचेही जबाब



**मॅडमच्या तोंडून हे सगळे ऐकत असताना हुकूमचंदचे डोळे आश्चर्याने विस्फारत गेले. आणि खरोखर त्याला आश्चर्याचा फार मोठा धक्का बसला असावा.**

नोंदवण्यात आले. गुन्ह्यातील पीडिता व आरोपित यांचे वैद्यकीय सॅम्पल आणि जप्त कपडे तपासणी करिता मा. संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडे पाठवण्यात आले. अल्पवयीन पीडितेवर आरोपिताने अत्याचार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याचप्रमाणे डीएनए चाचणीच्या अहवालातही नवजात स्त्री बालक हे आरोपिताचेच असल्याचे सिद्ध झाले. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपीच्या विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

आरोपीला मा. न्यायालयाने दोषी ठरवले असून त्याला भादंवि कलम ३७६ (२) (एन) आणि पोक्सो कलम ६ अन्वये आजन्म सश्रम कारावास व एक लाख रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

दिंडोरी पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक मोनिका जेजोट तसेच पोलीस अंमलदार कमलेश देशमुख आणि सुजित इंगळे यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# श्रद्धांजली

**३० ते ४० वर्षे कर्तव्यनिष्ठापूर्वक सेवा बजावून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले पोलीस अधिकारी अथवा अंमलदार यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबियांना व इतर सेवानिवृत्त पोलिसांना त्यांच्या सेवेची आठवण राहावी आणि त्यांचा सन्मान कायम राखला जावा, यासाठी त्यांना सन्मानाने अंतिम निरोप देणे हे महाराष्ट्र पोलीस दलाचे कर्तव्य आहे. त्या अनुषंगाने जानेवारी २०२६ दरम्यान निधन झालेल्या महाराष्ट्र पोलीस दलाच्या सेवानिवृत्त अधिकारी/अंमलदार यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**



सेवानिवृत्त दिवंगत पोलीस अंमलदार (सहायक फौजदार), लोहमार्ग नागपूर श्री. शिवसरन रामप्रसाद उपाध्याय यांना नागपूर पोलीस दलातर्फे आदरांजली वाहण्यात आली.



सेवानिवृत्त दिवंगत पोलीस अंमलदार (सहायक फौजदार), लोहमार्ग नागपूर श्री. रामदास गोविंदराव भोलवणकर यांना नागपूर पोलीस दलातर्फे आदरांजली वाहण्यात आली.



कै. रामराव नारायण हाटे

# दिवंगत
# हाटे दांपत्याच्या स्मरणार्थ



कै. लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे


# बक्षिस योजना

श्री. रामराव नारायण हाटे हे १९५८ पूर्वी मुंबई शहर पोलिसांच्या नियंत्रण गुन्हे (क्राईम ब्रँच२, सीआयडी) शाखेत पोलीस अधीक्षक (सुपरिंटेंडंट ऑफ पोलीस) म्हणून कार्यरत असतानाच निधन पावले. त्यांचे सुपुत्र श्री. रमेश रामराव हाटे, (Bombay Helpline Consultancy Services India Pvt. Ltd.(Civil & Criminal Matters) व Smt. Laxmidevi Ram Narayan Hate Charitable Trust, (Laxmisadan) Hate House, Marine Lines, Bombay 02) यांच्याकडून त्यांचे दिवंगत वडील रामराव नारायण हाटे आणि दिवंगत आई लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे यांचे स्मरणार्थ दिलेल्या रु. 4,00,032/- इतक्या रकमेतून दक्षता मासिकातील सर्वोत्कृष्ट तपासकथा, लेख/ कथा/ कविता यांच्यासाठी दरमहा बक्षीस योजना माहे जानेवारी २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे.

सदर बक्षीस योजनेअंतर्गत माहे फेब्रुवारी २०२६ मधील बक्षीसप्राप्त विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे:

| तपशील | तपासकथा/ लेख/कविता यांचे नाव | विजेत्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| सर्वोत्कृष्ट तपासकथा प्रथम क्रमांक | तिचा काय गुन्हा? | श्रीमती भाग्यश्री कुलकर्णी, सहा. पोलीस निरीक्षक, अड्याळ पोलीस ठाणे, नागपूर ग्रामीण | रु. ७,०००/- |
| सर्वोत्कृष्ट तपासकथा व्दितीय क्रमांक | नाइलाज | श्री. बबन मोहनदुळे, सहा. पोलीस निरीक्षक, कारंजा पोलीस ठाणे, वर्धा | रु. ५,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/कथा/ कविता प्रथम क्रमांक | कष्टाची किंमत | श्री. सचिन बेंडभर, पुणे | रु. ३,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/कथा/ कविता व्दितीय क्रमांक | देवमाणूस | श्री. प्रशांत जोशी, छत्रपती संभाजीनगर | रु. २,०००/- |

# शब्दकोडे



**आडवे शब्द**

१. आजन्म ५. चतुराई, कौशल्य ८. लोंगर, झुबका ९. संवेदना, जाणीव १०. हुकूमनामा १२. निमित्त १५. दरवाजा १७. धूर बाहेर टाकण्याचे नळकांडे १९. अस्वल २०. एक निशाचर प्राणी २२. कंटक २३. शुभ्र २५. अंडी, मटण यापासून विदर्भात बनवला जाणारा पदार्थ २७. एक रोग २८. अनुपम, अतुलनीय ३०. लाख ३२. तुरुंग ३३. फिरून, पुन्हा ३५. क्षारयुक्त ३६. वाया घालवणे

**उभे शब्द :**

१. वकिली २. एक मिष्टान्न ३. यज्ञ ४. जास्त जेवल्याने होणारी पोटफुगीची भावना ५. इस्लाममध्ये स्त्रिया चेहरा झाकण्यासाठी वापरतात ते वस्त्र ६. रज ७. बूड ११. एक क्रूर रानटी पशू १३. कसा, कप्पे असलेली पिशवी १४. पत्नी १६. निशाण १७. फसवणूक १८. तंबू, तात्पुरती वस्ती, शामियाना २१. दुसऱ्याच्या क्षेत्रात किंवा प्रदेशात अनधिकृतरीत्या केलेला शिरकाव २२. अंत:करण, मर्मस्थान २४. मध्यस्थ २६. पसारा, मांडणी २७. वात्रट, चहाटळ २९. उपयोग ३१. चार वर्णांमधील एक ३२. कावळा ३४. पसारा, विस्तार

## दक्षताच्या वाचकांसाठी खुशखबर...

दक्षता मासिकाशी वाचकांचा स्नेहबंध असाच टिकून राहावा व जास्तीत जास्त वाचक दक्षता परिवाराशी जोडले जावेत या हेतूने आम्ही काही उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकीच एक म्हणजे अचूक शब्दकोडे सोडवणाऱ्या तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले जाणार आहे आणि त्यांना रोख पारितोषिकही दिले जाणार आहे. त्यासाठी स्पर्धकांनी मूळ शब्दकोडे अचूक सोडवून त्याचे कात्रण, आपले नाव, अचूक पत्ता, पिन कोड, संपर्क क्रमांक तसेच बँकेचा अकाउंट नंबर व आयएफएससी कोड या माहितीसह आमच्या दक्षताच्या पत्त्यावर त्या महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. दर महिन्याला विजेत्यांची निवड केली जाईल व पुढील महिन्यामध्ये विजेत्यांची नावे जाहीर केली जाऊन त्यांचे बँक खात्यात ऑनलाईन बक्षिसाची रक्कम वर्ग करण्यात येईल. यासाठी आपला भरघोस प्रतिसाद अपेक्षित आहे.

**बक्षिसे : पहिले ₹५००/-, दुसरे ₹३००/-, तिसरे ₹२००/-**

# फेब्रुवारी २०२६ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या शब्दकोड्याचे उत्तर व स्पर्धेतील विजेत्यांची नावे

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________ मोबाईल : ______________________

अकाऊंट नं : ______________________ आयएफएससी कोड ______________________

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | ष्टा | ई | | का | क | स्प | र्श | | ना |
| र | | द | र | व | ळ | | | ता | क |
| ग | डू | | ण | | फ | स | ग | त | |
| ण | | | नी | | ल | ह | र | | नि |
| ती | | अ | ती | रे | क | | ग | र | ज |
| | ज | व | | वा | | भ | री | त | |
| | नि | गु | ती | | ह | | त | ला | व |
| का | त्र | ण | | ना | र | ळ | | म | स |
| नू | | | शा | व | क | | मा | | म |
| न | व | ला | ई | | त | ह | ह | या | त |



१. अविनाश चंद्रकांत मुंजे, नागपूर

# लाखो वाचक

## ज्याची आतुरतेने वाट पाहतात!

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

नागरिक आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातील महत्त्वाचा दुवा असलेले, सर्वोच्च खपाचे, ५१ वर्षांची दर्जेदार परंपरा असलेले मराठी मासिक

- रोमांचकारी सत्यकथा,
- विविध उत्कंठावर्धक सदरे,
- जनता व पोलीस यांच्यातील जिव्हाळा जपणारे वाङ्मय
- रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल असे दर्जेदार साहित्य...

आपली प्रत आजच राखून ठेवा!

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पत्रव्यवहारासाठी पत्ताः


महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय

शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

दूरध्वनीः ०२२-२२८३४५११/२२०४९७०१

mpd.dakshata@mahapolice.gov.in

वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२८३४५११

DAKSHATA Marathi Magazine March 2026. RNI Registration No. 21352/1974. Postal Reg.No. MCS/131/2024-26 Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office GPO, Mumbai - 400 001 on 5th and 6th of every month. Date of Publication is 1st of every month.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय




**प्रेषक :**
**सरसंपादक, दक्षता**
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१

**प्रति,**